पुणे, रविवार, २७ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 149 • वर्ष ४ थे, अंक १४९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



जहाल दहशतवादाच्या विळख्यात काश्मीर P३



आयसीसी स्पर्धांमध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध खेळू नये १२

At a Glance

### परत जाण्याच्या भीतीने पाकिस्तानी हिंदू अस्वस्थ

**जैसलमेर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. याचाच भाग म्हणून सरकाने पाकिस्तानी नागरिकांना लवकरात लवकर भारत सोडण्याचे आदेश दिले आहे. जशी जशी भारत सोडण्याची मुदत जवळ येत आहे, तशी तशी ज्या पाकिस्तानी नागरिकांना परत जायचे नाही त्यांची चिंता वाढली आहे. यातील काहींनी तर, "पाकिस्तानसारख्या नरकात जाण्यापेक्षा भारतात मरण आलेले बरे", असे म्हटले आहे.

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी पाकिस्तानस्थित संघटनेच्या दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केल्यानंतर, भारताने पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यासाठी रविवारीची मुदत दिली आहे.राजस्थानमधील जैसलमेरमधील निर्वासितांच्या एका छावणीत, अटारी सीमेवरून भारतात प्रवेश केलेली अनेक कुटुंबे आहेत. मूलसागर गावातील 'एकलव्य भिल बस्ती'मध्ये पाकिस्तानातून » पान ७ वर

# भारतीय लष्कर आक्रमक

## दहशतवाद्यांची एकूण पाच घरे जमीनदोस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण भारतभरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. भारतानेही पाकिस्तानविरोधात आक्रमक पावले उचलण्यास सुरुवात केली असून, आतापर्यंत दहशतवाद्यांची एकूण पाच घरे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. आधी दोन दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली होती, तर आता आणखी तीन दहशतवाद्यांची घरे उध्वस्त करण्यात आली आहेत.

लष्कर ए तोएबा या संघटनेत सक्रिय असलेल्या शाहिद अहमद कुट्टी याचे घर आयआयटी ब्लास्ट लावून उद्धवस्त केलं आहे. शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास तपास यंत्रणेचे अधिकारी यांनी शाहिद अहमद कुटे याच्या घरी जाऊन कुटुंबाला ताब्यात घेतलं. नंतर रात्री १ वाजेच्या सुमारास दहशतवाद्याच्या घरी ब्लास्ट करून घर उद्धवस्त केले. यासह पुलवामा भागातील एहसान उल हक शेख या दहशतवाद्याचं घर, कुलगाममधील झकीर अहमद गानियाचं घर, शोपियाँमध्ये शाहीद अहमद कुटे या दहशतवाद्याचं » पान ७ वर



### पहलगाममध्ये सर्च ऑपरेशन सुरू

● पहलगाममधील बैसरन घाटात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराचे जवान ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. बांदिपोरा भागात कुलनार येथे चकमकीत १ दहशतवादीची हत्या झाल्याची माहिती आहे. तर, २ सैनिक जखमी झालेत. दरम्यान अजूनही शोधमोहिम सुरू आहे. काश्मीरच्या शोपियाँ आणि पहलगाममधील दहशतवादी घरांची झडती सुरू असून, शेकडो संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### भारत युद्धाच्या उंबरठ्यावर ?

● या सर्व घटनांमध्ये, प्रश्न असा उद्भवतो की भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाचा अर्थ मोठ्या युद्धाची सुरुवात होऊ शकते का? पाकिस्तानकडे आता जास्त घातक शस्त्रे आहेत आणि त्यांना चीनकडून अधिक मजबूत पाठिंबा मिळू शकतो. अशा परिस्थितीत दोन्ही देशांमधील युद्धाचा धोका कधीही खरा ठरू शकतो. आणि याचा प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षेवर खोलवर परिणाम होऊ शकतो. भारत आणि पाकिस्तानमधील वाढता तणाव, पाकिस्तानला पुरवण्यात येत असलेली नवीन क्षेपणास्त्रे आणि चीनकडून मिळणारा वाढता पाठिंबा यावरून असे दिसून येते की ही परिस्थिती कधीही युद्धात बदलू शकते.

### पाकिस्तानला चीनची मदत

● पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव झपाट्याने वाढला आहे. पाकिस्तानला चीनकडून हवेतून हवेत मारा करणारे PL-15 लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र मिळाल्याची बातमी आहे. ज्यामुळे हा ताण आणखी वाढू शकतो. या क्षेपणास्त्रांची कमाल मारा क्षमता २०० किलोमीटरपर्यंत असल्याचे म्हटले जाते, जे पीएल-१२ पेक्षा खूपच जास्त आहे. पीएल-१२ ची मारा क्षमता १०० किलोमीटर होती आणि ती जेएफ-१७ विमानांसोबत वापरली जात होती. पाकिस्तानी हवाई दलाने पीएल-१५ क्षेपणास्त्राला जेएफ-१७ थंडर ब्लॉक-३ विमानात एकत्रित केले आहे, ज्यामुळे त्यांची मारक क्षमता आणखी वाढली आहे.

# निवृत्त होणार असला तरी बदली करेन

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आयुक्तांना इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री, मी आणि एकनाथ शिंदे यांनी सांगूनसुद्धा महापालिकेकडून बाणेर येथील जागेवरील राडारोडा उचलला नाही. त्यामुळे फुकट निधी मिळत असूनही प्रकल्प मार्गी लागत नाही. मग त्याचा फायदा काय? त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तीन दिवसांत त्या जागेवरील राडारोडा उचला. अन्यथा तुम्ही ३१ मे रोजी निवृत्त होणार आहे ना. तरी देखील तुमची बदली करेन. मी येथून मुंबईला जाण्याअगोदर तुमच्या बदलीची ऑर्डर आलेली असेल, अशा शब्दांत पवार यांनी पालिका आयुक्तांना बदलीचा इशारा दिला.

तीन दिवसानंतर सकाळीच सात वाजता येऊन मी प्रकल्पाचे भूमिपूजन करणार आहे, असा इशारा उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी दिला आहे.



ते म्हणाले, की निधी दिला, सूचना दिल्या, तरी कामे होत नाहीत. पर्वती जलशुद्धीकरण केंद्राजवळील शासन आणि महापालिकेच्या मालकीच्या प्लॉटवर राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा ठेवून जागा बळकावण्याचा प्रकार समोर आला आहे.

बाणेर येथे टाटा ग्रुपच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व फंडातून १६५ कोटी निधी आला असून, यामधून कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार आहे. याबाबतची सद्यस्थिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महापालिका आयुक्तांना विचारली. त्यावर पालिका आयुक्तांनी या जागेवरील राडारोडा काढून जागा मोकळी झाली नसल्याचे सांगितले. त्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उघड नाराजी व्यक्त केली.

जलशुद्धीकरण केंद्रातून होणारी गळती दुरुस्त करता येत नाही. यापूर्वीही पालकमंत्र्यांनी सूचना देऊनही कार्यवाही झाली नसल्याचा मुद्दा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी उपस्थित केला. गेल्या दोन वर्षांपासून पाठपुरावा करीत असून, तुम्ही सूचना देऊनही प्रशासन कारवाई करीत नसल्याचे मिसाळ यांनी या वेळी सांगितले.

तेव्हा संतापलेल्या पवार यांनी प्रशासनाला या विषयांबरोबरच बाणेर येथे टाटा ग्रुपच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व » पान ७ वर

### उपअधीक्षक अमरसिंह पाटील यांचे निलंबन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोट्यवधीचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने भूमिअभिलेख विभागातील उपअधीक्षक अमरसिंह पाटील वर महसूल विभागाने कारवाई केली असून, त्याच्या निलंबनाचे आदेश राज्य शासनाचे उपसचिव अश्विनी यमगर यांनी शुक्रवारी काढले आहेत. मोजणीमध्ये गोंधळ करणे, कार्यालयात कामानिमित्त आलेल्या नागरिकांशी अरेरावीपणे बोलणे, त्याचप्रमाणे कोणत्याही कामासाठी लाच मागणे, याबरोबरच पुण्यातील एका व्यापाऱ्याला हडपसर येथील मोजणीसाठी पन्नास लाख रुपयांची लाच मागणारा पुण्यातील हवेलीतील भूमिअभिलेख विभागातील उपअधीक्षक अमरसिंह पाटील याला अखेर निलंबित करण्यात आले आहे. भूमिअभिलेख » पान ७ वर

# दहशतवादी हल्ल्यावरून योगी यांचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** भारताने २३ एप्रिल रोजी काही महत्वाचे निर्णय घेत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश दिले. तसेच सिंधू पाणी करारही स्थगित केला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात बोलताना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी एक मोठा इशारा दिला आहे. 'भारत किसी को छेडता नहीं, लेकिन कोई छेड़ेगा तो उसको छोडेगा भी नहीं', असं योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं आहे. तसेच हा नवीन भारत असून पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना गुन्हेगारांना समजेल अशा भाषेत प्रत्युत्तर दिलं जाईल, असंही योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं.



"आपल्या समाजात दहशतवाद किंवा अराजकतेला स्थान नाही. भारत सरकारची सुरक्षा आणि सेवा आणि सुशासनाचे मॉडेल विकासावर आधारित आहे. ते गरिबांच्या कल्याणावर आणि सर्वांच्या संरक्षणावर आधारित आहे. मात्र, जर कोणी सुरक्षेचं उल्लंघन करण्याचं धाडस केलं तर हा नवा भारत आहे. त्याला समजेल अशाच भाषेत योग्य उत्तर देण्यास तयार आहे"
**— मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ**

### इराणच्या बंदर अब्बास पोर्टमध्ये भीषण स्फोट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तेहरान :** इराणमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. इराणमधील बंदर अब्बास शहरात भीषण स्फोट झाला. शनिवारी दुपारी येथील राजई बंदरावरील एका तेल शुद्धीकरण कंपनीत हा स्फोट झाला असून संपूर्ण शहर हादरले. प्राथमिक माहितीनुसार, या स्फोटात ४ जणांचा मृत्यू तर ५०० हून अधिक झाले आहेत. या भीषण स्फोटानंतर आकाशात धुराचे लोट उठले होते.

राजाई बंदर हे प्रामुख्याने कंटेनर शिपमेंटचे काम हाताळते. तसेच याठिकाणी तेलाच्या टाक्या आणि इतर पेट्रोकेमिकल सुविधांचा साठा देखील आहे.स्फोट खूपच भीषण होता. जखमींना होर्मोजगान येथील प्रांतीय रुग्णालयात भरती करण्यात आले आहे, अशी माहिती आहे.

### पिकअप व्हॅनने ११ स्वच्छता कर्मचाऱ्यांना चिरडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गुरुग्रामजवळील हरियाणाच्या नूह जिल्ह्यात दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर शनिवारी सकाळी एक भीषण रस्ता अपघात घडला. एका भरधाव पिकअप वाहनाने ११ स्वच्छता कर्मचाऱ्यांना चिरडले. या अपघातात ७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, ४ जण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. दरम्यान, अपघातानंतर आरोपी चालकाने पळ काढला असून, त्याचा शोध सुरू आहे.

# मृत पर्यटकांच्या कुटुंबियांचे मुख्यमंत्र्यांनी केले सांत्वन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जम्मू काश्मीरमधील पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे या पर्यटकांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिले त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावे, राज्य शासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यांना धीर दिला.

यावेळी गणबोटे यांच्या गंगानगर कोंढवा येथील घरी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार योगेश टिळेकर, सुनील कांबळे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नी संगीता गणबोटे, मुलगा तुषार, कुणाल, स्नुषा कोमल गणबोटे उपस्थित होते.



# शिवसेना UBTच्या पोस्ट ने खिळल्या नजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांपासून सातत्याने होणारी एकमेव मागणी आणि मतदारांच्या मनातली गोष्ट म्हणजे शिवसेनेमध्ये पडलेली दरी मिटणे. अर्थात उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येणे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं एकत्र यावं असा सूर आजवर अनेकांनी आळवला, अधूनमधून तसे संकेतही मिळाले. पण, प्रत्यक्षात मात्र या चर्चा हवेतच विरून गेल्या.

आता मात्र या चर्चांना अनुसरूनच एक सोशल मीडिया पोस्ट करण्यात आल्याने पुन्हा एकदा उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याबाबतच्या चर्चांनी जोर धरला आहे. शिवसेना UBTच्या अधिकृत पेजवरुन करण्यात आलेल्या एका पोस्टमुळं या सर्वांच्या नजरा इथं खिळल्या आहेत. » पान ७ वर

SYMBIOSIS
INTERNATIONAL (DEEMED UNIVERSITY)
॥वसुधैव कुटुम्बकम्॥
(Established under Section 3 of the UGC Act, 1956)
Re-accredited by NAAC with 'A++' Grade | Awarded Category - I by UGC

Launches
SAII (साई)
SYMBIOSIS
ARTIFICIAL INTELLIGENCE INSTITUTE

Symbiosis Artificial Intelligence Institute (SAII), located at Lavale, Pune, is a pioneering initiative by Symbiosis International (Deemed University) to offer an inclusive, interdisciplinary, and future-oriented model of AI education. With a strong emphasis on innovation, ethics, and social impact, SAII aims to play a transformative role in shaping India's AI future.

B.Sc. (AI): Health Sciences; Sports Sciences; Data Science; Cyber Security; Agriculture

B.B.A. (AI): Financial Technologies; Marketing Technologies; Technologies for Global Supply Chain; HR Technologies; Media & Creative Industries

Eligibility: Students from all academic streams (Science, Commerce, Arts) who have completed Std. XII with a minimum of 50% marks (45% for SC/ST) are eligible to apply.

Scan the QR code to register and apply for the preferred programme

Scan for Whatsapp
admissions@saii.siu.edu.in
02231044353
Scan for the Website
saii.siu.edu.in
Dr. M. S. Shejul
Registrar, SIU

# संकट निवारणासाठी बाप्पाला साकडे

### जे. पी. नड्डा यांनी घेतले दगडूशेठ गणपतीचे दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतातून दहशतवादाचे भय निर्वाण होवो... सर्वत्र कायदा सुव्यवस्था अबाधित राहो... परराष्ट्र शक्तींचे निर्वाण होवो... देशबांधवांना सुस्थिती प्राप्त होवो... असा संकल्प करीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा 'दगडूशेठ'गणपतीला अभिषेक केला. यावेळी दहशतवादाविरोधी लढण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शक्ती प्रदान व्हावी, याकरिता गणरायाचरणी साकडे घातले. » पान ७ वर



**गणरायाला अभिषेक:** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे स्वागत व सन्मान मंदिरात करण्यात आला. यावेळी त्यांनी गणरायाला अभिषेक करीत आरती देखील केली.

"बाप्पाचे आशीर्वाद घेण्यासाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात आलो. दहशतवाद्यांनी पेहलगाम मध्ये जे कृत्य केले, त्याला याला सडेतोड उत्तर देण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आमची अपेक्षा आहे. या संकटातून देश ताकतीने पुढे जाईल आणि जे यामागे दोषी आहेत, त्यांना योग्य उत्तर देण्याकरिता गणपती बाप्पाचा आशीर्वाद मिळो. याकरिता पंतप्रधान मोदी यांना शक्ती प्रदान होवो."
**— जे. पी. नड्डा**

## नवचैतन्य हास्य परिवारातर्फे आनंद मेळावा



**कर्वेनगर :** येथील परिवार यांच्या तर्फे चैतन्य भाषा प्रसार मंडळ संस्थापक अध्यक्ष अनिता जोशी यांनी चैत्र गौरी व हिंदू परंपरा सण व सोहळा याबद्दल सर्व महिलांना माहिती दिली व हळदी कुंकाचे महत्त्व समजावून सांगितले त्याचबरोबर सौ.संध्या बेनकर यांनी महाराष्ट्र सरकार च्या सर्व योजनांची माहिती सांगितली. या कार्यक्रमांमध्ये सर्व महिलांनी आनंदाने हास्याने उत्साहाने चैत्र गौरीचे हळदीकुंकू पार पाडले.नव चैतन्य हास्य क्लबच्या संस्थापक अध्यक्ष संजीवनी ताई उन्हाळे यांनी सर्व महिलांचे स्वागत करून हा कार्यक्रम आनंदाने पार पाडला सर्व महिलांचे आभार मानले व सर्वांना पन्हे, डाळ देऊ ओटी भरून फराळ दिला.

## कार्तिक लोणारे याच्यावार मकोका कारवाई

**खडकवासला :** धायरी येथील कार्तिक बाळकृष्ण लोणारे (वय २३ वर्षे) याच्यावर शहर पोलिसांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण (मोक्का) कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. कार्तिक बाळकृष्ण लोणारे (वय-२३ वर्षे, रा. खडक चौक, लोणारे वस्ती, धायरी) अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. तो २०२१ पासून जवळ कोयत्यासारखी घातक शस्त्रे जवळ बाळगत आहे. त्यातून खुन करणे, दुखापत करणे, मारामारी करणे, तोड-फोड करणे सारखे गुन्हे केले आहेत. त्यामुळे लोकांमध्ये त्याची मोठी दहशत निर्माण झाले आहे. लोणारे यांच्यावर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण (मोक्का) कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात स्थानबध्द करण्यासाठी, पोलीस आयुक्त अमितेश कुमार सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा आणि वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलिस निरीक्षक अतुल भोस यांचे मार्गदर्शनाखाली पाळत ठेवणाऱ्या पथकाचे फौजदार संतोष कदम पोलिस अंमलदार प्रथमेश गुरव व विजय विरणक यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण (मोक्का) कायद्याअंतर्गत प्रस्ताव तयार केला.

## घुंगरू टू ग्लोरी' कार्यक्रम २८ एप्रिल रोजी

**पुणे :** आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाच्या पूर्व संध्येला 'घुंगरू टू ग्लोरी' हा कथक नृत्यप्रस्तुतीचा कार्यक्रम अदिती कुलकर्णी यांच्या 'नृत्यास्मि स्कूल ऑफ कथक' च्यावतीने सादर केला जाणार आहे.हा विशेष कार्यक्रम सोमवार, २८ एप्रिल रोजी, सायंकाळी ५ वाजल्यापासून, पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे येथे पार पडणार आहे. या संध्याकाळी संस्थेच्या कुशल विद्यार्थ्यांकडून पारंपरिक कथक नृत्य सादरीकरण केले जाणार आहे.या कार्यक्रमाला ज्येष्ठ नृत्यगुरु पंडिता मनीषा साठे या उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय नृत्य दिन साजरा करण्याबरोबरच 'नृत्यास्मि' या संस्थेच्या दहा वर्षांच्या प्रवासाचे प्रतिबिंब आहे.

## मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश




**येरवडा :** खराडी-मुंढवा रोडवर मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू होता. त्यावर खराडी पोलिसांनी कारवाई करून चालवणाऱ्या दोघांवर गुन्हे दाखल केले. तर सहा महिलांची सुटका केली. खराडीतील थिटेनगर येथील गोल्ड प्लाझा इमारतीत सिल्व्हर सोल स्पा ब्यूटी अँन्ड वेलनेस नावाने मसाज सेंटर सुरू होते. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांना याबाबत माहिती मिळाली. त्यांनी त्या ठिकाणी बनावट ग्राहक पाठवून वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्री केली. त्यानंतर त्या सेंटर वर छापा टाकण्यात आला. ते सेंटर चालविणारे लेनखोकै किपगेन ( रा. मणिपुर ) व विकास किशोर ढाले ( रा अमरावती ) यांच्यावर गुन्हा दाखल केला. तेथे असणाऱ्या सहा महिलांची सुटका केली. त्यामध्ये तीन महिला थायलंड, एक मणिपूर, एक नागालँड व एक पुण्याची असल्याचे समोर आले. उपनिरीक्षक राहुल कोळपे, पोलिस कर्मचारी नवनाथ वाळके, सुरेद्र साबळे, अर्जुन बुधवंत, अमोल भिसे, सचिन पाटील, अक्षय गार्डे, सुरज जाधव, जयवंत श्रीरामे, महिला पोलीस अंमलदार ज्योती मेमाणे, पुजा डाहाळे, अर्चना गोफणे या पथकाने ही कामगिरी केली.

## कॅन्डल मार्चद्वारे निषेध...!




**पुणे** कॅम्प येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून शेकडोंच्या उपस्थितीमध्ये पहेलगाम दहशतवादी हल्ल्याच्या विरोधात कॅन्डल मार्च व निदर्शनाचे आयोजन नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीच्या वतीने करण्यात आले होते.

## पहलगाम हल्ल्या विरोधात कॅण्डल मार्च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पहेलगाम येथे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना हिंदूंना नव्हे तर भारतीयांना मारायचे होते, तसेच या घटनेच्या आधारे हिंदू मुस्लिम धृवीकरण करणारे यांचा व दहशतवाद्यांचा धर्म एकच असल्याची टीका नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केली.

याप्रसंगी माजी नगरसेवक रशीद शेख, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी नगरसेवक राहुल तुपेरे, मुक्तार शेख, रिपब्लिकन पक्षाचे परशुराम वाडेकर, कारी इद्रीस, जाहीद शेख, मुनव्वर कुरैशी, जुबेर मेमण, सुफियान कुरैशी, अहमद सय्यद, सलिम मौला पटेल अंजुम इनामदार, खिसाल जाफरी, लुकस केदारी, सुवर्णा डंबाळे, स्नेहा माने, इब्राहीम यवतमाळवाला, सिध्दांत सुर्वे , राम डंबाळे, सत्यवान गायकवाड, शाकीर शेख, अश्पाक शेख, राहुल नागटिळक, स्वाती गायकवाड, अर्चना केदारी, वसिम पैलवान उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन नॅशनल फॉर मायनॉरिटीच्या स्नेहा माने, शहाबुद्दीन शेख, आसिफ शेख, प्रतिक डंबाळे यांनी केले होते.

# विकासकामांना 'पोलीसी बळ'...!

## ६१ ठिकाणी कामे करण्यासाठी वाहतुक पोलसांची मंजुरी: पावसाळयापूर्वी होणार दुरुस्ती

पावसाळ्यापुर्वी करावयाची कामे वेळेत पुर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाचे प्रयत्न सुरु आहे. ६१ ठिकाणी कामे करण्यासाठी वाहतुक पोलिसांकडून मंजुरी दिली गेली आहे. यामुळे पाणी साठून राहणाऱ्या या ठिकाणी कामे लवकर पुर्ण करण्यास मदत होणार आहे. दरवर्षी पावसाळ्यात अनेक भागांत रस्त्यांवर पाणी साठून वाहतुक कोंडीत भर पडत असते. अशा प्रकारची २०१ ठिकाणे महापालिकेने पाहणी करुन निश्चित केली असुन, त्या ठिकाणी आवश्यक त्या उपाय योजना केल्या जाणार आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठी वाहीनी टाकण्यासारख्या उपाय योजना केल्या जातील. गेल्या काही वर्षातील अनुभव लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने घेतलेला हा निर्णय झोपडपट्टीतील नागरिक आणि सखल भागातील नागरिकांसाठी अतिशय फलदायी असाच ठरणार आहे, त्याचा फायदा महापालिका प्रशासनासह आपत्ती व्यवस्थापन आणि अन्य सरकारी यंत्रणांना होणार आहे. त्यामुळे त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली होती. या निश्चित केलेल्या ठिकाणांपैकी ६१ ठिकाणी काम करण्यासाठी वाहतुक पोलीसांची परवानी आवश्यक आहे. यासंदर्भात पोलीस प्रशासनाशी बैठक पार पडली असुन, पोलीसांनी काम करण्यास तत्वत: परवानगी दिली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन योजनेत २३ ठिकाणी कामे केली जाणार आहे. त्यापैकी २१ कामांसाठी खोदाई करण्यास पोलीसांनी तत्वत: परवानगी दिली आहे. तर महापालिकेमार्फत ४० ठिकाणी कामे केली जाणार आहे. सिंहगड रस्त्यावरील रांका ज्वेलर्स जवळ आणि वैभव टॉकीज जवळ अशा दोन ठिकाणी खोदाईची परवानगी मागितली होती. त्या पोलिसांनी परवानगी दिली नाही. ही खोदाईची परवानगी देताना संबंधित कनिष्ठ अभियंता, काम करणारा ठेकेदार यांचे जबाब घेतले जाणार आहे. तसेच महापालिकेच्या जबाबदारीवर ही परवानगी दिली जाणार आहे.

महापालिकेने पावसाळापुर्व कामे वेळेत पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. गेल्या आठवड्यात रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी ईस्टीमेट कमिटीने सुमारे ६५ कोटी रुपये मंजुर केले आहे. तसेच संरक्षण विभागाच्या हद्दीत महापालिकेला कोणतीही उपाययोजना करता येत नसल्याचा फटका काही नागरीवस्तींना बसत आहे. यासंदर्भात महापालिका आणि संरक्षण विभाग यांची बैठक पार पडली आहे. येरवड्यातील आंबेडकर सोसायटीतून बीईजीच्या परिसरात जाणाऱ्या नाल्याचा प्रवाह बंद केल्याने पावसाचे पाणी घरात शिरण्याची समस्या, धानोरीतील लक्ष्मीनगर सोसायटीत संरक्षण विभाग ग्रेफ सेंटर परिसरातील चऱ्होली डोंगरावरून पाणी येत असल्याने वाहतूक आणि व्यवसायिकांचे होणार नुकसान होते. तसेच, पाषाणमधील आयआयएसईआर आणि एनसीएल परिसरातून बाणेर रस्त्यावर साचणारे पाणी या समस्या सोडविण्यासाठी काम करणे गरजेचे असल्याचे महापालिकेकडून संरक्षण विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

पालिकेकडून संबंधित नाल्यांचे रुंदीकरण, सफाई, पावसाचे पाणी साठवण्यासाठी नवीन तलाव व चेंबर उभारणे, तसेच आवश्यक ठिकाणी नवीन नाल्यांची योजना करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून संरक्षण विभागास सांगण्यात आले आहे. मात्र, ती हद्द संरक्षण विभागाची असल्याचे ही कामे करण्यासाठी त्यांची परवानगी अनिवार्य असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले. तसेच,पावसाळ्यापूर्वी ही कामे झाल्यास या ठिकाणची पूरस्थिती रोखण्यास मदत होणार असल्याने ही परवानगी तातडीने मिळावी यासाठी पालिका प्रयत्नशील आहे.

> पावसाळयामध्ये सखल भागात पाणी साचण्याच्या अनेक घटना घडत असतात, त्यामुळे त्याचा परिणाम वाहतूक कोंडी होण्यावर होत असल्याने नागरिक आणि वाहनचालकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आता त्यासाठी वाहतूक पोलीसांनी परवानगी दिल्याने त्याचा प्रशासनासह नागरिकांनाही फायदाच होणार आहे.
>
> **-अनिरूद्ध पावसकर,** पथ विभाग, पुणे मनपा



> वाहतूक कोंडीमुळे शहरातील जनजीवन विस्कळीत होत असते, आता महापालिका प्रशासनाने ही कामे केल्यानंतर वाहतूक कोंडी टळण्यास मदत होणार आहे. त्यातूनच वाहतूक पोलीसांनाही दिलासा मिळणार आहे, हे वास्तव असले तरी महापालिका प्रशासनाने ही कामे कटाक्षाने करण्याची आवश्यकता आहे.
>
> **-अमोल झेंडे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग

## जास्त उंचीचे होर्डिंग काढा अन्यथा कारवाई

### सहआयुक्त दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांचा इशारा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्राधिकरण क्षेत्रात अवकाळी पाऊस, वादळी वारे आदींमुळे होर्डिंगपासून धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनधिकृत होर्डिंगवर कारवाईचा निर्णय घेण्यात आला आहे. वर्दळीच्या आणि रहदारीच्या ठिकाणाचे धोकादायक, मर्यादितपेक्षा जास्त उंचीचे, दुबार संरचना होर्डिंग काढून घ्यावेत, असे आवाहन सहआयुक्त दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी केले आहे. त्याबाबत हलगर्जीपणा केल्यास थेट कारवाई करण्यात येइल, असा इशाराही त्यांनी दिला.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) हवेली आणि मुळशी तालुक्यात तीन ठिकाणी एकाच वेळी अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे विकास परवाना विभागाकडे चलन भरण्याची धावपळ सुरू झाली असून, दहा होर्डिंगधारकांनी प्राधिकरणाकडे ४८ लाखांची रक्कम जमा केली आहे.

हवेली तालुक्यातील वडकी, मुळशी तालुक्यातील हिंजवडी येथून कारवाईस सुरुवात करण्यात आली. या कारवाईमुळे होर्डिंगधारक आणि जाहिरात कंपन्यांनी प्राधिकरणाच्या विकास परवानगीकडे अंतिम चलने भरण्यास सुरुवात केली आहे. एकूण १० होर्डिंगधारकांनी अंतिम चलनाची रक्कम ४८ लाखांपेक्षा अधिक रक्कम जमा केली आहे.

'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, सहआयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार रवींद्र रांजणे, तहसीलदार सचिन मस्के, अभियंता विष्णू आव्हाड, दीप्ती घुसे, प्रशांत चौगले, ऋतुराज सोनवणे, गणेश जाधव, तेजस मदने यांच्या पथकानेही ही कारवाई केली.

## ऑटोरिक्षा, टॅक्सी विशेष तपासणी मोहीम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** परवानाधारक ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांना गणेश परिधान करण्याचा आदेश काढण्यात आला. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ऑटोरिक्षा, टॅक्सी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांनी व्यवसाय करीत असताना पांढऱ्या रंगाचा शर्ट (बुश शर्ट) आणि खाकी रंगाची पँट असा गणवेश परिधान करण्यासोबतच ओळखपत्र प्रदर्शित करणे अनिवार्य आहे. तर वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे कामकाजासह मोटर तपासणीचे कामकाज करताना गणवेश असणे आवश्यक असल्याचेही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी सांगितले.

एवढेच नव्हे तर ऑटोरिक्षा, टॅक्सी परवानाधारकांच्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे कामकाजासह मोटर तपासणीचे कामकाज करताना गणवेश परिधान करून आपली गैरसोय टाळावी, असे आवाहनही आरटीओ प्रशासनाकडून करण्यात आले. ऑटोरिक्षा, टॅक्सी परवानाधारक वाहनचालकांनी आपल्या वाहनांची वैध कागदपत्रे सोबत बाळगावीत. असे स्वप्रिल भोसले यांनी स्पष्ट केले.




**पुणे** पहलगाम येथे झालेल्या दहशतवाद्याच्या भ्याड हल्ल्यात निष्पाप पर्यटकांना गोळ्या घालून ठार केले या निर्दयी भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ कॅन्डल लावून घोषणा देत पद्मावती चौक येथे निदर्शने केली. स्वाभिमानी युवक संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रशांतराव गायकवाड, तळजाई युवा फाउंडेशनचे अध्यक्ष निलेश खंडाळे, सुनील कांबळे, महेश देवकुळे, उद्धव कांबळे, भारत तुपसौंदर, सागर खंडागळे, सोनू साठे, बाबा पाटोळे, आशिक शेख. तसेच तळजाई वसाहतीमध्ये सर्व नागरिकांचा सहभाग दिसून आला.

# तुम्हावर केली मी मर्जी बहाल; नका सोडून जाऊ रंगमहाल...!

## वसंतोत्सवात पारंपरिक लोककलेला उजाळा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपण दोघं जोडीजोडीने बेल भंडारा वाहू... चला जेजुरीला जाऊ... चला जेजुरीला जाऊ; तुमच्या पुढ्यात कुटते मी हा ज्वानीचा मसाला... तुम्हावर केली मी मर्जी बहाल, नका सोडून जाऊ रंगमहाल अशा बहारदार लावण्यांचा खजिना आणि देवीचा जागर यासह महिलांचा पारंपारिक खेळ आणि फुगडी अशा अफलातून कार्यक्रमाच्या माध्यमातून वसंतोत्सवाची सुरूवात झाली.

फोकलोर अँन्ड कल्चरल हेरिटेज फाउंडेशन पुणे यांच्यावतीने एक दिवसीय वसंतोत्सवाचे आयोजन केले होते. वसंतोत्सवाचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे ललित कला केंद्राचे प्रमुख डॉ. प्रवीण भोळे यांच्या हस्ते उद्‌घाटन पार पडले. वसंतोत्सवाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून वसंतोत्सवाची उत्सवाची सुरुवात अत्यंत आनंददायक वातावरणात झाली. सर्वात प्रथम आधी चैत्र गौरी म्हणजे चैत्रांगणाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथी डॉ. जितेंद्र पानपाटील, प्रवीण भोळे, शैला खांडगे आणि फाउंडेशनच्या संचालक डॉ. सुनीता धर्मराव यांच्या



हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी वसंतोत्सवच्या कार्यक्रमाबद्दलची भूमिका आणि प्रास्ताविक डॉ. सुनीता धर्मराव यांनी केले.

या प्रसंगी मृणालिनी खंदारे, लोकसाहित्य अभ्यासक व उद्योजिका प्रा. शैला खांडगे, प्राचार्य, कृषी तज्ञ, पटकथालेखक, डॉ. सुवर्णा बिभीषण चवरे आदी उपस्थितीत होते.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. सुखदा खांडगे यांनी कथ्थक केले, गौरी वनारसे व निकिता बहिरट यांच्या संबळ वादन करून देवीचा जागरण करण्यात आले. त्याच बरोबर स्त्रियांचे पारंपारिक खेळ, फुगडी, भोंडला, मंगळागौरी या पारंपरिक लोककलेला अश्विनी छत्रपती आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केल्या. रेश्मा परितेकर यांनी बहारदार लावणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यामध्ये भाग्यश्री देसाई, नीलिमा पटवर्धन, संध्या पुजारी, ममता सपकाळ यांना सन्मानित करण्यात आले. फोकलोर ॲण्ड कल्चरल हेरिटेज फाउंडेशनच्या संचालक डॉ. सुनीता धर्मराव म्हणाल्या की महाराष्ट्राला खूप मोठा पारंपरिक लोककलेचा वारसा लाभला आहे. हा वारशाचे आम्ही जतन, संवर्धनसाठी प्रयत्नशील आहोत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्मयी जोशी यांनी केले.



> वसंतोत्सवात पारंपरिक लोककलेला उजाळा मिळाला याचा मला मनसोक्त आनंद आहे. फोकलोर ॲण्ड कल्चरल हेरिटेज फाउंडेशनच्या वतीने पारंपरिक लोककलेला उजाळा मिळत आहे. आपल्या माती, नीती आणि संस्कृतीचा हात सुटता कामा नये असे मला वाटते. ती नाळ कायम जपली पाहिजे.
>
> **— ममता सिंधुताई सकपाळ**

# मनोरंजनाचा तडका



कोरोना काळात, ओटीटी प्लॅटफॉर्मने लोकांच्या रंगहीन जीवनात रंग भरले. तेव्हा थिएटर बंद होती पण ओटीटीवरील चित्रपट आणि मालिकांनी लोकांचे मनोरंजन करण्यात कोणतीही कसूर ठेवली नाही. तेव्हापासून हा प्लॅटफॉर्म सामान्य माणसाच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. यायोगे बदलत्या काळानुसार लोकांना दुहेरी मनोरंजनाचे साधन मिळाले. आता दर आठवड्याला थिएटरमध्ये नवीन चित्रपट प्रदर्शित होतात तर ओटीटीवरही थ्रिलरपासून सस्पेन्स, हॉरर आणि कॉमेडीपर्यंत वेगवेगळ्या शैलींचे चित्रपट आणि मालिका प्रदर्शित होतात.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात, 'जाट' ते 'छावा' पर्यंतचे अनेक चित्रपट आणि मालिका ओटीटीवर प्रदर्शित झाल्या ज्या प्रेक्षकांनी मोठ्या उत्सुकतेने पाहिल्या. आता २० तारखेपर्यंत प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांची आणि मालिकांची यादीही प्रेक्षकांचे चांगले मनोरंजन करताना दिसत आहे.

या यादीत पहिले नाव अक्षय कुमार–अनन्या पांडे आणि आर माधवन यांचा 'केसरी चॅप्टर २' चे आहे. सध्या त्याची मोठी चर्चा आहे. यामध्ये 'खिलाडी कुमार' जालियनवाला बाग हत्याकांडाचे सत्य जगासमोर आणताना दिसणार आहे. १८ एप्रिल रोजी तो प्रदर्शित होत आहे. दुसरीकडे रजत कपूर, चुम दरंग, सुची मल्होत्रा आणि रिया शुक्ला यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या 'खौफ'चा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांसमोर आला. ही हॉरर शैलीतील मालिका असून हिंसाचाराची पार्श्वभूमी असणाऱ्या वसतिगृहाच्या खोलीभोवती ती फिरते. त्या खोलीत राहणारी मुलगी भूतकाळाशी तसेच अनेक अलौकिक शक्तींशी लढते. १८ एप्रिल रोजी प्राइम व्हिडिओवर ही मालिका बघायला मिळेल.

# 'जाट' ला मजल मारावी लागेल

कोणत्याही चित्रपटाचे भवितव्य प्रदर्शनानंतरच्या पहिल्या आठवड्यातच ठरते, असे म्हणतात. लोक कुटुंबासह चित्रपट पाहण्यासाठी थिएटरमध्ये जातात, परंतु एखादा चित्रपट कामाच्या दिवशी म्हणजेच सोमवारी चांगले कलेक्शन करत असेल तर समजून घ्या की तो बॉक्स ऑफिसवर नवीन कथा लिहिण्याची तयारी करत आहे. सनी देओलचा 'जाट' त्यापैकीच एक आहे.

'जाट'ला 'गदर २' सारखे ब्लॉकबस्टर ओपनिंग मिळाले नसले तरी पहिल्याच आठवड्यात चित्रपटाने कमाई कायम ठेवली. त्याने पहिल्या रविवारी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर सुमारे १४ कोटींची कमाई केली होती. या ॲक्शन ड्रामामध्ये सनी देओलला केवळ 'पुष्पा २' च्या निर्मात्याचा पाठिंबा मिळाला नाही तर दक्षिणेतील अनेक स्टार्सनीही या चित्रपटात काम केले आहे. तेव्हा पुन्हा एकदा लोकांना सनीची ९० च्या दशकातील शैली आवडली आहे, असेही आपण म्हणू शकतो. म्हणूनच आठवड्याच्या प्रारंभीही चित्रपटाला गर्दी पहायला मिळाली. रविवारी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करणाऱ्या सनी देओलच्या 'जाट' ने पहिल्या सोमवारीही चांगली कमाई केली. आकडेवारीनुसार, या दिवशी चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर पाच कोटींची कमाई केली जी सोमवारच्या आकडेवारीनुसार आणि सनी देओलच्या स्टारडमचा विचार करता खूपच चांगली आहे.



सनी देओलच्या या ॲक्शन ड्रामाने रिलीजच्या पाच दिवसांमध्ये देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ४६ ते ४७ कोटी रुपयांची कमाई केली आहे. १०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होण्यासाठी त्याला अजूनही ५० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय करायचा आहे. त्यामुळे 'जाट' ने कामाच्या दिवशीही अशाच गतीने काम केले तर या आठवड्याच्या शेवटी चित्रपट १०० कोटींचा टप्पा ओलांडू शकेल.

कथेबद्दल बोलायचे झाले तर 'जाट' ही एका माणसाची कथा आहे जो चेन्नईहून अयोध्याला ट्रेनने प्रवास करत असतो. परंतु अपघातामुळे त्याची ट्रेन एका गावात थांबते. तो ट्रेनमधून उतरतो आणि चालायला लागतो, नंतर तो एका माजी डेप्युटी कमांडरला भेटतो. काही कारणाने त्याच्याशी हाणामारी होते आणि कथा पुढे सरकते. यामध्ये सनी देओल आणि रणदीप हुड्डा यांची अदाकारी लक्षवेधी ठरत आहे.

# महवशचा मंत्र



सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आणि निर्माती आरजे महवश तिच्या डेटिंग लाईफमुळे चर्चेत आहे. गेल्या काही महिन्यांपासून तिचे नाव प्रसिद्ध क्रिकेटपटू युजवेंद्र चहलशी जोडले गेले. मात्र डेटिंगच्या अफवांमध्येच आरजे महवशच्या नव्या पोस्टने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यात ती ब्रेकअपबद्दल बोलली आहे.

आरजे महवश सोशल मीडियावर खूप सक्रिय असून मनातील भावना चाहत्यांसोबत न डगमगता शेअर करते. अलिकडेच, महवाशने कटु ब्रेकअप आणि पुढे जाऊ न शकण्याबद्दलची एक पोस्ट शेअर केली. महावाशची पोस्ट सोशल मीडियावर वाऱ्यासारखी पसरत आहे. तिने इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला ज्यामध्ये ब्रेकअपमधून कसे बाहेर पडायचे याबद्दल सल्ला दिला. आरजे महवश व्हिडिओमध्ये म्हणते, 'आजच्या पिढीमध्ये ब्रेकअप इतके वाईट का आहे? ब्रेकअपला आयुष्याचा सर्वात लहान भाग बनवा. माझ्यावर विश्वास ठेवा, हे नक्कीच शक्य आहे. तुम्ही एका छोट्या कथेचे शेवटचे पान इतके कटूपणे का लिहिता? हे आयुष्य आहे मित्रा, असे वाटते की ते तुमच्या हातात आहे, परंतु सर्व काही अनिश्चित असते.'

युजवेंद्र चहलसोबतच्या डेटिंगच्या अफवांमध्ये महवश पुढे म्हणते, मला माहीत आहे की त्याने दुखावले आहे. पण तुम्ही एखाद्याला माणूस समजून माफ करत नाही तोपर्यंत प्रत्येक माणसात देव शोधत राहाल. आणि माणूस देव असता तर तो देवासमोर रडला नसता. तेव्हा तुम्हाला अहंकार, दु:ख, द्वेष किंवा आनंद, प्रेम, क्षमा आणि शांती ठेवायची आहे की नाही हे तुमच्यावर अवलंबून आहे. तुम्हाला दुखावणाऱ्या व्यक्तीला क्षमा करा आणि पुढे जा. शेवटी ती म्हणते, तुमचा जोडीदार असणाऱ्या पण आता दूर जाऊ पाहणाऱ्या व्यक्तीला सांगण्याचा प्रयत्न करा की आता प्रेम नाही, द्वेष नाही, काहीही नाही. मी तुला माफ केले आहे. मला तुला मिळवण्याची इच्छा नाही. तुला गमावण्याचे कोणतेही दुःख नाही... या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये महवशने 'मी तुला माफ केले आहे, आता तू इथे नाहीस' असेच म्हटले आहे.

# करिनाचा 'दायरा'



'तलवार' आणि 'राझी' सारखे लोकप्रिय चित्रपट दिग्दर्शित करणारी मेघना गुलजार तिच्या पुढील चित्रपट 'दायरा' मध्ये अभिनेत्री करिना कपूर खान आणि अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन यांना दिग्दर्शित करणार आहे. हा एक क्राइम–ड्रामा थ्रिलर चित्रपट असल्याचे सांगण्यात येत असून अलीकडेच करिना कपूरनेही आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून 'दायरा' मध्ये काम करण्याची घोषणा केली आहे.

करिना कपूरने इन्स्टाग्रामवर 'दायरा' चित्रपटाची घोषणा केली आणि कॅप्शनमध्ये लिहिले, 'असे वाटते की, मी दिग्दर्शक सांगेल त्याप्रमाणे काम करणारी कलाकार आहे. यावेळी मी आजच्या सर्वोत्तम दिग्दर्शकांपैकी एक असणाऱ्या मेघना गुलजार आणि हुशार पृथ्वीराज सुकुमारन यांच्यासोबत काम करत असून हा अनुभव घेण्यास अतिशय उत्सुक आहे. मी या दोघांच्याही कामाची चाहती आहे. माझ्या ड्रीम टीम 'दायरा'ला फक्त एवढेच सांगू इच्छिते की चला एकत्र पुढे जाऊ या.'

याविषयी सविस्तर बोलताना करिना म्हणाली, हिंदी चित्रपटसृष्टीत २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मेघना गुलजार दिग्दर्शित माझा पुढचा चित्रपट 'दायरा' ची घोषणा करताना मला खूप आनंद होत आहे. 'तलवार'पासून 'राजी'पर्यंत मी तिच्या कामाची प्रशंसक असून तिच्या प्रकल्पात काम करणे खरोखरच एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे.

# चर्चेतील 'सुशीला सुजीत'

अभिनेता स्वप्नील जोशी आणि सोनाली कुलकर्णी यांच्या प्रमुख भूमिका असणारा 'सुशीला सुजीत' हा चित्रपट सध्या खूप चर्चेत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांना आवडला असून सोशल मीडियावर प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी उत्सुक



दिसत आहेत. एका समारंभात या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च करण्यात आला होता. तेव्हापासून 'सुशीला सुजीत' चित्रपटाविषयी लोक व्यक्त होत आहेत. हा चित्रपट प्रेक्षकांना कॉमेडीचा डब्बल डोस देणार आहे. या चित्रपटातून स्वप्नील जोशी आणि सोनाली कुलकर्णी हे पहिल्यांदा पडद्यावर एकत्र दिसणार आहे. त्यामुळे त्यांचे चाहते खूप खुश आहेत. या चित्रपटाची कहाणी जरा हटके असणार आहे.

चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये सुरुवातीला एक आई पोलिसांकडे जाते आणि आपला मुलगा हरवलाय म्हणून तक्रार दाखल करते. यानंतर पोलिस तिला विचारतात घरात भांडण वगैरे काही झाले होते का? या पार्श्वभूमीवर आवाज येतो की, मुलगा तब्बल ३५ तासांपासून हरवला आहे. ट्रेलरमध्ये पुढे स्वप्नील आणि सोनाली कुलकर्णी एका घरात बंद दाराआड अडकल्याचे दिसत आहे. या दोघांचे मोबाईल देखील बाहेर राहिले आहेत. यानंतर घरातून सुटका करून घेण्याचे दोघेही नाना प्रकारे प्रयत्न करतात.

दोघेही लॅच उघडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात, मात्र यात ते फेल होतात. यानंतर ते गॅलरीतून काही मार्ग निघतो का, हे पाहतात मात्र गॅलरीतील कुंडी खाली राहणाऱ्या माणसाच्या डोक्यात पडते. ट्रेलरमध्ये अशा अनेक गमतीजमती दाखविण्यात आल्या असल्यामुळे प्रत्यक्षात चित्रपटात किती गमतीजमती बघायला मिळतील, याबाबत प्रेक्षकांच्या उत्सुकता आहे. ट्रेलरचेच इतके कौतुक होत असल्यामुळे प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी चांगली गर्दी करतील आणि तो हिट होईल अशी आशा करायला हरकत नाही.

# काळजी नसावी...



रिॲलिटी शोच्या जगात 'बिग बॉस' आणि 'खतरों के खिलाडी १५' बद्दल सर्वाधिक चर्चा आहे. एका वृत्तानुसार हे दोन्ही शो रद्द केले जातील, असे कळवण्यात आले होते. यामागील कारण म्हणजे एका निर्मात्याने रिॲलिटी शोमधून माघार घेतल्याचे म्हटले जात होते. मात्र आता या दोन्ही शोबद्दल एक मोठी अपडेट आली असून ती जाणून चाहते सुटकेचा नि:श्वास सोडतील.

'खतरों के खिलाडी'साठी नवीन निर्मात्याचा शोध घेतला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. अशा परिस्थितीत, लवकरच एका नवीन उत्पादकाची नियुक्ती केली जाऊ शकते. यामुळे शो काही काळासाठी निश्चितच पुढे ढकलला जाऊ शकतो, परंतु तो रद्द केला जाणार नाही. तथापि, निर्मात्यांनी अद्याप शो रद्द करण्याबाबत किंवा पुढे ढकलण्याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. टीव्हीनंतर ओटीटीवरही लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस'ला खूप पसंती दिली जात आहे. 'बिग बॉस १८' नंतर, टीव्ही प्रेमी ओटीटीच्या चौथ्या सीझनची वाट पाहत आहेत. मध्यंतरी तो रद्द करण्यात आल्याचा दावाही करण्यात आला. मात्र आता ताज्या अहवालावरून हे स्पष्ट झाले आहे की सध्या शो रद्द करण्याबाबत कोणतीही चर्चा सुरू नाही. 'बिग बॉस' नियोजित वेळेवर येईल पण 'खतरों के खिलाडी १५' थोडी पुढे ढकलली जाऊ शकते. दोन्ही लाडके शो रद्द झाल्याची बातमी व्हायरल झाली तेव्हा त्याच्या प्रेमींना चांगलेच वाईट वाटले होते.

# भाईजानला पुन्हा धमकी

बॉलिवूडचा भाईजान म्हणजेच अभिनेता सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने त्याच्या चाहत्यांमध्ये अस्वस्थता पसरल्याचे दिसत आहे. मुंबईच्या वरळी वाहतूक विभागाच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर ही धमकी पाठवण्यात आली आहे. आपण अभिनेत्याच्या घरात घुसून मारु, असे धमकी देताना सांगण्यात आले आहे. एवढेच नाही तर सलमान खानची गाडी बॉम्बने उडवून देण्याची धमकीही देण्यात आली आहे. आता वरळी पोलिस ठाण्यात फोन करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुपरस्टारला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानंतर पोलिसही सतर्क झाले आहेत. अधिकारी सध्या धमकीचा स्रोत आणि सत्यता तपासत असून धमकी लॉरेन्स बिश्नोईकडून आली आहे की नाही हे जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र अद्याप काहीही स्पष्ट झालेले नाही. यापूर्वी अशाच प्रकारच्या त्याला अनेक वेळा धमक्या मिळाल्या आहेत. त्यात लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष धमक्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये दोन जणांनी सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार केला होता. तसेच बिश्नोई टोळीकडून खानला एक नवीन धमकीही देण्यात आली होती. यामध्ये त्याने एकतर मंदिरात जाऊन काळवीट हत्येबद्दल सार्वजनिक माफी मागावी किंवा पाच कोटी रुपये द्यावे अशी मागणी करण्यात आली होती. गेल्या ३० ऑक्टोबर रोजी अभिनेत्याला पुन्हा एका अज्ञात व्यक्तीने धमकी दिली आणि दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर गेल्याच वर्षी दोन अज्ञात व्यक्तींनी बनावट ओळखपत्र वापरून सलमान खानच्या पनवेल फार्महाऊसमध्ये जबरदस्तीने प्रवेश करण्याचा प्रयत्नही केला होता. त्यापूर्वी म्हणजेच २०२३ आणि २०२२ मध्येही अभिनेत्याच्या घराजवळील एका बाकावर धमकीचे पत्र सापडले होते. सलमानला सतत मिळणाऱ्या जीवे मारण्याच्या धमक्यांमुळे त्याच्याभोवती सुरक्षा वाढवण्यात आली आहे.




# आता राहा 'किंग'च्या घरात

अमेरिकेतील बेव्हरली हिल्स येथील शाहरुखचे आलिशान घर सध्या माध्यमांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. यातील खास गोष्ट म्हणजे आता चाहत्यांना या शाही बंगल्यात राहण्याची संधी मिळू शकते.

शाहरुख खानची ही मालमत्ता अमेरिकेतील सर्वात महागड्या आणि प्रतिष्ठित असणाऱ्या भागात म्हणजेच बेव्हरली हिल्समध्ये आहे. या सुंदर हवेलीमध्ये एकूण सहा बेडरूम, एक खाजगी स्विमिंग पूल, टेनिस कोर्ट आणि आकर्षक अशी आतील सजावट आहे. त्याची ही मालमत्ता सर्वसामान्यांना निवासासाठी उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळेच कोणताही चाहता काही काळासाठी या शाही घरात राहण्याचा आनंद घेऊ शकतो. हा अनुभव शाहरुखच्या चाहत्यांसाठी खूप खास असणार हे वेगळे सांगायला नको.

अर्थात तुम्हाला शाहरुख खानच्या घरात शाही शैलीत रात्र घालवायची असेल तर यासाठी प्रति रात्र सुमारे १.९६ लाख खर्च करावे लागतील कारण हे



आलिशान निवासस्थान भाड्याने घेण्यासाठी इतकी अवाढव्य किंमत ठेवण्यात आली आहे. ती अधिक असली तरी चाहते त्याच्या प्रेमापोटी ही संधी सोडणार नाहीत, अशी अटकळ बांधली जात आहे. अर्थात ही काही पहिली वेळ नाही. शाहरुख खानच्या आधीही काही बॉलिवूड सेलिब्रिटींनी आपल्या मालमत्ता चाहत्यांसाठी खुल्या केल्या आहेत. अभिनेत्री जान्हवी कपूरने नुकतेच तिचे चेन्नईतील घर भाड्याने उपलब्ध करून दिले आहे.

प्रेक्षकांचा लाडका शाहरुख खान लवकरच 'किंग' चित्रपटात एका नवीन अवतारात दिसणार आहे. याशिवाय, मुलगा आर्यन खानच्या एका प्रोजेक्टमध्येही तो दिसणार आहे. 'किंग' मध्ये दीपिका पदुकोण सुहानाच्या आईची भूमिका साकारणार आहे. तेव्हा ही अभिनेत्री शाहरुख खानच्या पत्नीच्या भूमिकेत कशी दिसेल याविषयी देखील प्रेक्षकांना उत्सुकता आहे.

## At a Glance

### उन्हाचा कडाका वाढतोय

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी,धामणी,लाखणगाव, जारकरवाडी परिसरात भरदुपारी अघोषीत संचारबंदी असल्याचे चित्र सध्य पाहलला मिळत आहे. सकाळच्या सत्रात बाजारपेठेत थोडी फार वर्दळ असते.पण दुपारी बारानंतर मात्र बाजारपेठा ओस पडत आहे. दुपारी नागरिक आणि वादनांची वर्दळ कमी होत असल्याने अघोषित संचारबंदीसारखी स्थिती निर्माण होत आहे.शेतकरी शेतातील कामे सकाळच्या सत्रात करीत आहे. मात्र दुपारी कडक उता असल्याने घरी रहाणे पसंत करीत आहे सध्या डिंभा धरणाच्या उजव्या कालव्याला पाणी असल्याने कालव्याच्या परिसरातील शेतकरी सकाळ किंवा दुपारच्या सत्रात बागायती पिकांना पाणी देत आहे.वाढत्या उष्णतेमुळे बॅका,पोस्ट ऑफिस,हॉटेल,दुकाने रसवंती गृहे येथेही शुकशुकाट पहायला मिळत आहे.

### प्रमोद थोपटे यांचे दुःखद निधन

**नीरा :** पिंपरेखुर्द ( ता.पुरंदर) येथील प्रमोद यशवंत थोपटे (वय -५१) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई- वडील, दोन विवहित मुली , जावई असा परिवार आहे. पिंपरेखुर्द येथील हॉटेल शिवम ढाब्याचे ते मालक होते.



# शेतकऱ्यांसाठी स्टॉल उभारत प्रबोधन

## परिंचे येथील शिवशंभो शेतकरी गटाकडून कौतुकास्पद उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**सासवड :** पुरंदर तालुक्यातील परिंचे येथील शिवशंभो शेतकरी गटाने परिंचे गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ यात्रेच्या निमित्ताने गावात पंचक्रोशीतील शेतकरी बांधवांसाठी एक कृषिविषयक माहितीपर स्टॉल उभारत वेगळ्या उपक्रमाची नोंद केली. या गटाला नुकताच पाणी फाउंडेशनचा फार्मर कप २०२५ अंतर्गत तालुका स्तरीय ५० हजारांचे रोख बक्षीस प्राप्त झाले आहे त्यांच्या या यशाबद्दल शाबासकीची थाप म्हणून न्युझीलंड येथील उद्योजक संजय जोशी यांनी ६४ हजार रुपये किंमतीच्या अत्याधुनिक कांदा पेरणी मशीनची भेट गटाला दिली आहे सदर बक्षिसांचा करंडक व पेरणी मशीन यांसह अनेक कृषिविषयक माहिती पत्रके या स्टॉलमध्ये मांडण्यात आली होती.

शेतकरी बांधवांनी शेती व्यवसायात आधुनिकता, सहकार तत्व, विविध शासकीय योजना, पाण्याचे नियोजन या आणि या सारख्या अनेक महत्वपूर्ण गोष्टी आत्मसात करणे काळाची गरज आहे याच उद्देशाने या स्टॉलची मांडणी करण्यात आल्याचे संजय जाधव यांनी सांगितले स्टॉल मधील माहितीतून शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी तसेच गट निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा असेही जाधव यांनी स्पष्ट केले. गावच्या सरपंच अर्चना राऊत यांच्या हस्ते स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. कृषी सहाय्यक संदेश समगीर यांसह बबूसाहेब माहूरकर, पुष्कराज जाधव, प्रवीण जाधव, संभाजी नवले, पी एस जाधव, सुरेश दुधाळ, पाणी फाउंडेशनचे मयुर साळुंखे, कृषी सखी महिला गटाच्या सर्व सदस्य. शिवशंभो शेतकरी गटाचे सभासद व ग्रामस्थ

या प्रसंगी उपस्थित होते. एका वेगळ्या स्वरूपातील या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक केले.`

# धानोरे ग्रामस्थांनी यात्रेतून जपली सामाजिक बांधिलकी



**शिक्रापूर :** धानोरे ता. शिरुर येथील श्री घनोबा महाराज यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला असून यावेळी ग्रामस्थांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनाठायी खर्च टाळून गावासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सामाजिक बांधिलकी जप्त आदर्श निर्माण केला आहे.


शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी परिसरातील गावातील ग्रामस्थांनी यात्रेतील खर्चामध्ये काटकसर करत गावच्या सुरक्षिततेसाठी गावामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आवाहन केले अस्याना नुकत्याच धानोरे येथील श्री घनोबा महाराज यात्रा उत्सव पार पडत असताना ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत गावामध्ये तीन सीसीटीव्ही संच गावामध्ये बसवून आदर्श निर्माण केला. सदर यात्रेच्या निमित्ताने श्रींचा महाअभिषेक, बैलगाडा शर्यत, श्रींचा छबीना मिरवणूक, ऑर्केस्ट्रा तसेच निमंत्रित कुस्त्यांचा जंगी आखाडा पार पडला असून सदर यात्रेमध्ये तब्बल १७५ बैलगाडे सहभागी झाले होते, तर कुस्त्यांच्या आखाड्यात शेवटच्या कुस्तीला श्री घनोबा केसरी चांदीची गदा व पंचवीस हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले असून शेवटची कुस्ती शिरुर केसरी श्रेयस होळकर व पुरंदर केसरी अमित गायकवाड या दोघांमध्ये झाली असताना श्रेयस होळकर याने श्री घनोबा केसरी चांदीची गदा व रोख बक्षीस देण्यात पटकावले, तर ग्रामस्थांनी यात्रा उत्सव आनंदात पार पाडून सामाजिक सलोखा देखील जपला असल्याने धानोरे ग्रामस्थांचे पुणे जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

# बिबट्या पासून शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी : गव्हाणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील इनामगाव येथे पहाटेच्या सुमारास घराबाहेर असलेल्या कुत्र्यावर बिबट्याने हल्ला केला त्यावेळी कुत्रे बाजूला पाळले मात्र घराच्या अंगणात झोपलेल्या वृध्द लक्ष्मीबाई भोईटे या महिलेवर बिबट्याने शिकार समजून हल्ला केल्याने महिला मृत झालेली असल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांनी बिबट्या पासून विशेष काळजी व खबरदारी घ्यावी असे आवाहन शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी केली आहे.



शिरुर तालुक्यातील अनेक ठिकाणी बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात असल्याने वनविभागाकडून बिबट प्रवण क्षेत्रात नियमित गस्त घालत जनजागृती करत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे, अनेकदा पशुधानांवर बिबट्याचे हल्ले होत असताना यापूर्वी अंधारात झोपलेल्या किंवा अंधारात बेसावधपणे बाहेर पडलेल्या नागरिक व बालकांवर बिबट्याचे हल्ले घडले असल्याने शेतकरी व नागरिकांनी बिबट्यापासून खबरदारी घेण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले असून शेतकऱ्यांनी शेतात काम करताना मोबाईलवर गाणी लावावी तसेच मोठ्याने बोलावे, बसून कामे करत असताना आजूबाजूला वारंवार लक्ष द्यावे, ऊसतोड कामगार अथवा शेतात काम करणाऱ्या महिलांनी मुलांना शेतात झोपवू नये, शेतकऱ्यांनी घराच्या परिसरात प्रकाशासाठी दिवे लावावे, घराच्या बाहेर अथवा अंगणात उघड्यावर झोपू नये, उघड्यावर शौचास जाऊ नये, रात्री लहान मुलांना एकटे सोडू नये, घराच्या आजूबाजूला मोठे झुडपे असल्यास ते काढून टाकावे, रात्री घराबाहेर पडताना हातात टॉर्च, काठी बाळगावी, बिबट्या निदर्शनास आल्यास आरडाओरडा करावा आणि बिबट्या पासून बचाव करण्यासाठी विशेष काळजी व खबरदारी घ्यावी असे आवाहन शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी केली आहे.

### बिबट्याला पकडण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील

● इनामगाव येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेची वनविभागाने दखल घेतली असून घटनास्थळी सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी भेट देत ग्रामस्थांशी चर्चा करत ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने बिबट्याचा शोध सुरु करुन बिबट्या जेरबंद करण्यासाठी पाच पिंजरे, नऊ ट्रॅप कॅमेरे, चार अनायडर, तसेच दोन फिरते कॅमेरे लावले असून बिबट्याला पकडण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील असल्याचे देखील वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

# टि. जे. महाविद्यालयाच्या 'टिजम' या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खडकी :** कोणत्याही महाविद्यालयाने यापूर्वी वार्षिक नियतकालिकामध्ये न आलेला 'मैत' विषय घेतलेला आहे, हा एक आगळा वेगळा आणि 'हटके' विषय विद्यार्थ्यांना देऊन संपादक मंडळाने विद्यार्थ्यांना लिहायला प्रवृत्त केले याचा अधिक आनंद होतो आहे. विविध जाती धर्मामध्ये जन्म संस्कार व मृत्यू विधीच्या संकल्पना वेगवेगळ्या आहेत. हिंदू धर्मामध्ये मृत्यू विषयीच्या विविधचाली, रीती, रूढी,परंपरा जशा आहेत, उदाहरणार्थ अंत्यसंस्कार सावरण्याचा विधी, दशक्रिया विधी,तेरावा याप्रमाणेच मुस्लिम ख्रिश्चन शीख, जैन व बौद्ध धर्मीयांच्याही मृत्यूनंतरच्या विधी विषयीची माहिती या विशेष अंकामध्ये विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण अशी दिलेली आहे. त्याबद्दल मनापासून आनंद वाटला, महाराष्ट्रातील संपूर्ण महाविद्यालय विश्वामध्ये असा आगळावेगळा विषय वार्षिक नियतकालिकासाठी नक्कीच यापूर्वीही आलेला नसेल,याची खात्री आहे खरे तर जगणं खूप सुंदर आहे,परंतु अखेरचा निरोप घेताना मरणालाही हसत हसत सामोरे जावे हेच खरे सत्य आहे." असे प्रतिपादन खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी केले

खडकी येथील टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयाच्या मैत या विषयावरील वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन आज कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते झाले, यावेळी भारत भारतीय संस्थेचे पुणे जिल्हाध्यक्ष अचल जैन, भारत भारती पुणे शहराचे समन्वयक समीर पंड्या, किरण अस्तगावकर, खडकी शिक्षण उपाध्यक्ष अनिल मेहता, चिटणीस आनंद छाजेड, रमेश अवस्थे, राजेंद्र भुतडा, प्राचार्य डॉक्टर संजय चाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ संजय चाकणे यांनी या विषयाची अभिनव संकल्पना या मनोगतातून सांगितली. अचल जैन यांनीही हा वेगळ्या धाटणीचा विषय वार्षिक नियतकालिकामधून महाविद्यालयाने हाताळलेला आहे. हा अंक वृत्तपत्रानी नोंद घेण्यासारखाच आहे, असे गौरवोदगार काढले. उपप्राचार्य महादेव रोकडे यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

# बी.जे.एस. महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने बी.जे.एस. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली यांना 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दि.२३ एप्रिल २०२५ रोजी अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथे ही सभा पार पडली. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शिक्षण व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

या प्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी सहायक क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके, अधिसभा सदस्य डॉ. रमेश गायकवाड, समितीचे अध्यक्ष डॉ. महेंद्र अवघडे, सचिव डॉ. उमेश पनेरू, बी.जे.एस. कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड, तळेगाव ढमढेरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अर्जुन मुसमाडे आदी उपस्थित होते.

पुणे जिल्ह्यातील ८० महाविद्यालयांमध्ये बी.जे.एस. महाविद्यालयाची कामगिरी विशेष ठरली. या यशाबद्दल भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलालजी मुथ्था, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अरुण नहार, सदस्य विलास राठोड, सुरेश साळुंके यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा संचालक, क्रीडा समिती सदस्य व सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

पान १ वरून

### उपअधीक्षक अमरसिंह पाटील यांचे निलंबन

विभागाच्या पुण्यातील हवेली या विभागात अमरसिंह पाटील हा उपअधीक्षक या पदावर कार्यरत होता. शिरस्तेदार, भूकरमापक तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरून बिनधास्तपणे कोणत्याही प्रकरणात लाच दिल्याशिवाय काम न करणे, अशी त्याची ख्याती होती. याबरोबरच कार्यालयात विविध कामांसाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांशी गैरवर्तन करणे, अरेरावीपणे बोलणे, मालमत्तेच्या मोजणीत अफरातफर करणे, लाच दिल्यावर लागलीच मोजणीची तारीख बदलणे, मोजणीमध्ये बदल करणे, अशी बेकायदा कामे करीत होता. दरम्यान, पुण्यातील एका व्यापाऱ्याकडे लाच मागण्याच्या प्रकरणावरून फसवणुकीवरून 'भूमिअभिलेख'चे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची प्रकरणाची दखल घेऊन निलंबनाचा प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठविला होता. मात्र, अजून तपासणीचे काम सुरूच आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, सूर्यकांत मोरे यांची पदोन्नती झाली असून, ते सध्या उपसंचालक या पदावर भूमिअभिलेखच्या पुणे मुख्यालयात कार्यरत आहेत.

### भारतीय लष्कर...

घर ब्लास्ट घडवून आणून जमीनदोस्त केलं. दरम्यान, शुक्रवारी दहशतवादी आसिफ शेख आणि आदिल गुरी याचंही घर पाडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

### जे. पी. नड्डा यांनी घेतले दगडूशेठ...

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे स्वागत व सन्मान मंदिरात करण्यात आला. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राजेश पांडे, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, तुषार रायकर, सचिन आखाडे आदी उपस्थित होते. यावेळी ट्रस्टचे सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांनी जे. पी. नड्डा यांनी ट्रस्टच्या सामाजिक उपक्रमांची माहिती देखील दिली.

### निवृत्त होणार असला तरी...

फंडातून दिलेले १६५ कोटी रुपये आणि भिडे वाडा स्मारकासाठी महापालिकेच्या उपलब्ध करून दिलेल्या २०० कोटी रुपयांच्या निधीवरून धारेवर धरले. तिक्रमणाच्या मुद्यावरून बोलताना पवार म्हणाले, वेळीच लक्ष घातले पाहिजे. पुढे जाऊन तो भावनिक मुद्दा होतो. त्याचे पडसाद मग राज्यभर उमटतात, असे पवार म्हणाले.

### शिवसेना UBTच्या पोस्ट ने खिळल्या नजरा

वेळ आली आहे एकत्र येण्याची.....

अशा आशयाची पोस्ट शिवसेना UBTच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून करण्यात आली आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी राज आणि उद्धव ठाकरेंनी दिलेले एकत्रीकरणाचे संकेत लवकरच प्रत्यक्षात उतरतील का ? आणि गेल्या अनेक वर्षांपासून असलेली प्रतीक्षा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या एकत्र येण्याने पूर्ण होईल का? हाच सवाल या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

### परत जाण्याच्या भीतीने पाकिस्तानी...

अल्पकालीन व्हिसावर भारतात आलेले हजाराहून अधिक हिंदू निर्वासित कुटुंबे राहतात.

दरम्यान, पाकिस्तानी नागरिक पंजाबमधील अमृतसरमधील अटारी-वाघा बॉर्डर क्रॉसिंगद्वारे पाकिस्तानात परत जा आहेत. आतापर्यंत १११ हून अधिक पाकिस्तानी नागरिक भारतातून पाकिस्तानात गेले आहेत. तर २८७ हून अधिक भारतीय नागरिकी पाकिस्तानातून भारतात परतले आहेत.

# पहलगामच्या घटनेचा शिक्रापूरच्या मस्जिदमध्ये निषेध

**शिक्रापूर:** पहलगाम मध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात काही पर्यटकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असताना सदर घटनेचा शिक्रापूर येथील मुस्लीम समाजाकडून निषेध व्यक्त करण्यात आला आहे.




शिक्रापूर ता. शिरुर येथील जामा मस्जिदमध्ये दुपारच्या सुमारास नमाज पठण करत काश्मीर मध्ये पहलगाम येथे नुकत्याच दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करत घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला, यावेळी जामा मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष सिराजभाई शेख, आयुब तांबोळी, सलिम तांबोळी, फारुख तांबोळी, अमन शेख, सोहेल शेख, फिरोज तांबोळी, महंमद तांबोळी, चांदभाई तांबोळी, इलियास शेख, इम्रान इनामदार यांसह आदी उपस्थित होते. तर नमाज दरम्यान देशात शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी तसेच सदर दुर्दैवी घटना करणाऱ्यांवर कठोर शासन व्हावे यासाठी प्रार्थना करण्यात आली, दरम्यान हातामध्ये निषेध चा फलक घेत मुस्लीम बांधवानी घटनेचा निषेध व्यक्त केला, यावेळी जामा मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष सिराजभाई शेख यांनी सर्वांचे आभार मानले.

# पुणे जिल्ह्यात राबविलेले गुणवत्ता संवर्धन अभियान राज्याला दिशादर्शक ठरेल- डॉ. कारेकर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक शैक्षणिक वर्ष २०२४.२५ मध्ये १५०३ माध्यमिक विद्यालयाची गुणवत्ता संवर्धन अभियान अंतर्गत तपासणी करण्यात आली होती. या तपासणीमध्ये ज्या विद्यालयांचा पुणे जिल्ह्यात व तालुक्यात प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक आलेला होता अशा विद्यालयाचा पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर,उपशिक्षणाधिकारी छाया महेंद्रकर, निलेश धानापुरे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तसेच पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर,आय. आय.बी चे संचालक महेश लोहारे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्यसचिव, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नंदकुमार सागर यांनी केले. यावेळी शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर म्हणाले की,या गुणवत्ता अभियानात सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी मोलाचे सहकार्य लाभले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत फ्लॅट न. 406, चंद्रमा बिल्डिंग डी, डीएसके विश्व, किरकटवाडी, पुणे 411041 ही मिळकत श्री. विनायक रामकृष्ण कुडतरकर व वसुधा विनायक कुडतरकर, यांनी खरेदी केली सदर मिळकतीचा प्रथम खरेदीदस्त हा डीएसके डेव्हलपर्स व श्री. विनायक रामकृष्ण कुडतरकर व वसुधा विनायक कुडतरकर, यांच्यामध्ये झालेला असून सदर दस्त क्रमांक 1409/2001, दिनांक 18/04/2001, रोजी सब रजिस्ट्रार ऑफिस बीबीएम 1409/2001, मुंबई येथे नोंदविण्यात आलेला आहे.

परंतु सदर मिळकतीचे खरेदीदस्त करारनामा हा डीएसके डेव्हलपर्स व श्री. विनायक रामकृष्ण कुडतरकर व वसुधा विनायक कुडतरकर यांच्यामध्ये झालेला दस्त हा सिंहगड रस्ता, पुणे या परिसरात प्रवास करीत असताना दिनांक 02/04/2025 रोजी विनायक रामकृष्ण कुडतरकर यांच्याकडून गहाळ झालेला असून त्याबाबतची तक्रार हवेली पोलीस स्टेशन, सिंहगड रोड, पुणे यांच्याकडे ऑनलाईन नोंदवली असून त्याचा लॉस्ट रीपोर्ट न. 75778-2025 असा आहे. गहाळ झालेली मूळ कागदपत्रे पुढील प्रमाणे :

१. मूळ दस्त व इंडेक्स II न. 1409/2001, दिनांक 18/04/2001, डीएसके डेव्हलपर्स व श्री. विनायक रामकृष्ण कुडतरकर व वसुधा विनायक कुडतरकर यांच्यामध्ये झालेला करारनामा. तसेच वरील दस्तावेज कोणास मिळाल्यास त्यांनी खालील पत्तावर किंवा मोबाईल वर संपर्क करून सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून 7{सात} दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रत्यक्ष संपर्क साधून आणून देणे. तसेच सदर दस्त सापडलयास त्याचा गैरवापर करू नये तसे केल्यास फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल याची नोंद घ्यावी.

वकील
**शिल्पा एम. मुक्कावार,**
हॉल न. २, रोहिणी सोसायटी ऑफिस समोर, रोहिणी ए बिल्डिंग, डीएसके विश्व, धायरी, पुणे ४११०४१. मोबाईल न. ८७९३६५१०६३,

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविणेत येते की, पुढील वर्णन केलेली मिळकत हि तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत फ्लॅट न. ७०३, वरुण बिल्डिंग बी, डीएसके विश्व, धायरी, पुणे 411041 ही मिळकत कै. विश्वनाथ परशुराम जाधव, यांनी खरेदी केली होती परंतु विश्वनाथ जाधव यांचे दि. 24/05/2017 रोजी निधन झाले तसेच असून त्यांच्या पश्चयात खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकतीचे कायदेशीर वारस उषा विश्वनाथ जाधव व राजश्री विनोद गायकवाड असे आहे. तसेच सदर मिळकतीचे कायदेशीर वारस १. उषा विश्वनाथ जाधव (पत्नी) व राजश्री विनोद गायकवाड (मुलगी) असून यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. सदर मिळकतीचा प्रथम खरेदीदस्त हा डीएसके डेव्हलपर्स व कै. विश्वनाथ परशुराम जाधव, यांच्यामध्ये झालेला असून सदर दस्त क्रमांक 4106/2003, दिनांक 19/09/2003, रोजी सब रजिस्ट्रार हवेली १६, पुणे येथे नोंदविण्यात आलेला आहे.

परंतु सदर मिळकतीचे खरेदीदस्त करारनामा हा डीएसके डेव्हलपर्स व कै. विश्वनाथ परशुराम जाधव यांच्यामध्ये झालेला दस्त हा सिंहगड रस्ता, पुणे या परिसरात प्रवास करीत असताना दिनांक 25/03/2024 रोजी कै. विश्वनाथ परशुराम जाधव यांच्याकडून गहाळ झालेला असून त्याबाबतची तक्रार हवेली पोलीस स्टेशन, सिंहगड रोड, पुणे यांच्याकडे ऑनलाईन नोंदवली असून त्याचा लॉस्ट रीपोर्ट न. 73774-2025 असा आहे. गहाळ झालेली मूळ कागदपत्रे पुढील प्रमाणे

१. मूळ दस्त व इंडेक्स II न. 4106/2003, दिनांक 19/09/2003, डीएसके डेव्हलपर्स व कै. विश्वनाथ परशुराम जाधव यांच्यामध्ये झालेला करारनामा.

तसेच वरील दस्तावेज कोणास मिळाल्यास त्यांनी खालील पत्तावर किंवा मोबाईल वर संपर्क करून सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून 7{सात} दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रत्यक्ष संपर्क साधून आणून देणे. तसेच सदर दस्त सापडलयास त्याचा गैरवापर करू नये तसे केल्यास फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल याची नोंद घ्यावी.

**वकील शिल्पा एम. मुक्कावार,**
हॉल न. २, रोहिणी सोसायटी ऑफिस समोर, रोहिणी ए बिल्डिंग, डीएसके विश्व, धायरी, पुणे ४११०४१. मोबाईल न. ८७९३६५१०६३,

### उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय

**जाहीर प्रसिध्दकरण**

जा.क्र. फौज/कावि/१२५/२०५
दिनांक- २३/४/२०२५

१) श्री. हनुमंत किसन भगत
रा. सायबाचीवाडी ता. बारामती जि. पुणे — अर्जदार
विरुध्द
२) ग्रामसेवक / निंबधक
ग्रामपंचायत सांयबाचीवाडी
ता. बारामती जि. पुणे — सामनेवाला

**विषयः - जन्म- मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज**

ज्याअर्थी, यातील अर्जदार **श्री. हनुमंत किसन भगत,** हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहेत. अर्जदार **यांचे पंजोबा निवृत्ती बयाजी भगत यांचा मृत्यू दिनांक ०१/०८/१९९३ रोजी गाव मौजे सांयबाचीवाडी ता. बारामती जि. पुणे** येथील अर्जदार यांचे राहत्या घरी झालेला आहे. **त्यांची ग्रामपंचायत** कार्यालयात मृत्युचे रजिस्टरला नोंद नसल्यामुळे अर्जदार यांनी जन्म - मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना **मृत्यु** दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख **२८/५/२०२५** रोजीपर्यंत स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक- **२३/४/२०२४** रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे

ठिकाण:- बारामती
दिनांक :- २३/४/२०२४

शिक्का

**सही**
**उपविभागीय अधिकारी**
तथा उपविभागीय
दंडाधिकारी बारामती

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार www.rashtrasanchar.com @rashtrasanchar 27•04•2025

# जहाल दहशतवादाच्या विळख्यात काश्मीर



दि २२ एप्रिल ला, मंगळवारी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादाचा विकराळ चेहरा पुन्हा एकदा जगासमोर आला. काश्मीरमध्ये आर्टिकल ३७० हटवून जेमतेम साडेपाच वर्षे झाली आहेत. यादरम्यान तेथील दहशतवाद आणि दहशतवादी बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आलेला दिसतोय. गेल्या वर्षीच तिथे शांततेत निवडणुका सुद्धा पार पडल्या. लोकांनी निवडून दिलेले नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला सरकार या केंद्रशासित प्रदेशात आता सत्तेवर आहे. आर्टिकल ३७० हटवल्यानंतर काश्मीरचे विभाजन करून लेह- लडाख हा प्रदेश सुद्धा केंद्रशासित प्रदेश म्हणून वेगळा करण्यात आला. याशिवाय भारताच्या नकाशात दाखवला जाणारा स्कारडू, गिलगिट- बाल्टिस्थान हा भाग १९४७ च्या पाकी आक्रमणापासूनच पाकिस्तानच्या ताब्यात आहे. त्याशिवाय आपल्या काश्मीरच्या उत्तरेला असलेले, मुजफ्फराबाद ही राजधानी असणारे काश्मीरचे खोरे सुद्धा पाकिस्तानच्या ताब्यात आहे. त्यालाच आपण'पाक व्याप्त काश्मीर'असे म्हणतो. मुळात येथूनच आपल्या ताब्यातील काश्मीरमध्ये दहशतवाद्यांची घुसखोरी होते. शिवाय याच भागात मुख्यतः पाक पुरस्कृत दहशतवाद्यांचे तळ आणि प्रशिक्षण केंद्र आहेत. या सर्व भूभागात जम्मू चा भाग थोड्या कमी प्रमाणात दहशतवादाने त्रस्त आहे. मुख्यतः हा भाग हिंदू बहुल असल्याने असे असावे .

पहलगाम ला २२ एप्रिलला निरपराधांवर झालेला भ्याड हल्ला'द रेजिस्टन्स ग्रुप'या संघटनेने केल्या चे त्यांनी जाहीर केले. ही संघटना तशी लष्करे तोयबा आणि हिजबुल मुजाहिदिन या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांचेच'ऑफ शूट'म्हणजे अपत्य आहे. मागील पाच साडेपाच वर्षांपासूनच या संघटनेचे नाव अधून मधून समोर येते. यावेळी, काश्मीरची लोकसंख्याघनता जाणून बुजून भारत सरकार बदलत आहे, नुकतेच तिथे साधारण ८५,००० बाहेरचे नागरिक वसवले आहेत, असा त्यांचा मुख्य आक्षेप आहे. अर्थातच या त्यांच्या आक्षेपाला भारत सरकार आणि येथील जनता यत्किंचितही गांभीर्याने घेत नाही, हे उघड सत्य आहे. पहलगामला मंगळवारी २२एप्रिल ला झालेला दहशतवादी हल्ला एवढा निर्दयी आणि राक्षसी पद्धतीने झाला की संपूर्ण जगाचे लक्ष त्याकडे गेले. भारत सरकार आणि समस्त भारतीयांवर हा एक मोठा आघात होता. काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना त्यामुळे मोठा धक्का बसला. महिला आणि लहान मुलांना वेगळे काढून पहलगामच्या बैसारण या ठिकाणी जमलेल्या निष्पाप पर्यटकांना एक, एक करून, त्यांचा धर्म विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या . या क्रूर आणि भ्याड हल्ल्यात देशभरातून तिथे गेलेले २८ पर्यटक मृत्युमुखी पडले आणि कित्येक इतर जखमी झालेत. महिला आणि लहान मुलांसमोर त्यांच्या कुटुंबीयांना आणि मुख्यत: घरातील कर्त्या पुरुषांवर गोळ्या झाडण्यामागे दहशतवादाची व्यापकता वाढवणे, एक क्रूर संदेश या प्रकारे जगाला देणे, हा एकमेव उद्देश दिसून येतो.

मंगळवारी पहेलगाम येथे झालेला हल्ला हा याचेच एक पुढचे पाऊल होते. या सर्वांमधून मिळणारा संदेश स्पष्ट होता की काश्मीरला भारतापासून वेगळे काढायचे आहे. वास्तविकत: आजचे काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुला हे त्यांच्या सत्ताधारी घराण्यातील, तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात.'शेरे काश्मीर' असे बिरुद मिरवणारे शेख अब्दुल्ला आणि त्यांची नॅशनल कॉन्फरन्स १९८३ पर्यंत, त्यांच्या निधनापर्यंत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कायमच जम्मू-काश्मीरच्या सत्ताधारी वर्तुळात होते . त्यांच्या निधनानंतर त्यांचे सुपुत्र डॉक्टर फारूक अब्दुल्ला मुख्यमंत्री झाले. आजचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला जे काही काळ, अटल बिहारी वाजपेयी यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळातही होते आणि डॉक्टर फारूक अब्दुल्ला यांचेच वारस आहेत, ते मुख्यमंत्री आहेत. शेख अब्दुल्ला आणि स्वर्गीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची मैत्री हा सुद्धा बऱ्याचदा चर्चेचा विषय असायचा. याशिवाय पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे असणारे, मुफ्ती मोहम्मद सईद यांची पीडीपी ही सुद्धा घराणेशाही चालवणारी काश्मिरी राजकीय पार्टी आहे . माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती या त्याच्या आता सर्वेसर्वा आहेत. काश्मीरच्या राजकीय परिघावर सज्जाद लोन यांच्यासारखे वेगळे नेतृत्व सुद्धा आता दिसून येते. आर्टिकल ३७० च्या समाप्तीनंतर, नवीन नेतृत्व उदयास येण्याची आशा वाढीला लागली आहे, हे मात्र निश्चित.

एका आणखीन महत्त्वाच्या घडामोडी मध्ये अमेरिकन सरकारच्या प्रवक्त्याने'द न्यूयॉर्क टाइम्स'मध्ये याविषयी आलेल्या बातमीची दखल घेत त्यांना आरसा दाखवण्याचे पाऊल उचलले, ही बाब महत्त्वाची आहे. आखाती देशांमधील मुस्लिम राष्ट्रे सुद्धा भारताला सहानुभूती व्यक्त करतात, ही बाब लक्षवेधी ठरते.

पाकिस्तान सध्या राजकीय यादवी पासून फार लांब नाही, बलोच नॅशनल आर्मी आणि टीटीपी तालिबान यांचे रोजचे हल्ले, इम्रान खान यांच्या पक्षाच्या सदस्यांचा विरोध, तसेच महागाईने होरपळलेली जनता यांची रोजची निदर्शने या सर्वांमध्ये, त्यांना जर भारताने पुकारलेल्या दहशतवाद विरोधी मोहिमेचा सामना करावा लागला, तर ते त्यांच्यासाठी एक प्रकारे अंगलट येण्याची दाट शक्यता आहे. बलुचिस्तान हा प्रांत पूर्वापारपासून स्वतःला वेगळा प्रदेश समजतो. याशिवाय खैबर पख्तुनवा या प्रांताची स्थिती ही वेगळी नाही. म्हणूनच तेथील त्या वेळेचे गांधीवादी नेते खान अब्दुल गफार खान यांना भारत जवळचा वाटत होता. भारताने त्यांना यासाठी भारतरत्न हा किताब सुद्धा बहाल केला होता. अशा प्रकारे पाकिस्तानसाठी सध्याची परिस्थिती आत्मघातकी अशीच आहे या सर्व बाबींचा आणि घडामोडींचा विचार केल्यास या सर्वातून सरते शेवटी जहाल दहशतवादाच्या विळख्यातून काश्मीर कायमचा मुक्त होतो काय, हे बघणे महत्त्वाचे ठरते.

pritishpandit@gmail.com

### काश्मीरचा इतिहास रक्तरंजित

● काश्मीरला दहशतवादाचा मोठाच पूर्व इतिहास आहे जानेवारी १९९० मध्ये पंडितांचे शिरकाण मोठ्या प्रमाणात घडवले गेले. त्यानंतर काश्मीर खोऱ्यातून काश्मिरी पंडितांचे पलायन सुरू झाले. याच दरम्यान देशाचे तेव्हाचे गृहमंत्री मुफ्ती मोहम्मद सैद यांच्या मुलीचे अतिरेक्यांनी अपहरण सुद्धा केले. १९९० नंतरचा काश्मीरचा इतिहास हा अतिशय रक्तरंजित इतिहास आहे. १४सप्टेंबर १९८९ रोजी जम्मू चे भाजपा आमदार आणि वकील टीकालाल टपलू यांची निर्घृण हत्या, त्यानंतर ४ नोव्हेंबर १९८९ रोजी निवृत्त न्यायाधीश निळकंठ गांजू यांची हत्या, त्याच वर्षी दूरदर्शनच्या निर्देशक लसा कौल यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. १९९० नंतरच्या दशकात तर काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायांचे सत्र च आरंभले गेले .१९९९ ला प्राणकोट, छापनारी आणि चंबा येथील हत्याकांड हा तर दहशतवादाचा कळस होता. २० मार्च २०००चे छत्तीसिंगपुरा हत्याकांड, त्याच वर्षी ऑगस्ट महिन्यात अमरनाथ यात्रे करू न वर झालेला भ्याड हल्ला ही दहशतवादाची परिसीमा होती.

● पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर जागतिक जनमत मोठ्या प्रमाणावर भारताच्या बाजूने झालेले आहे. जगभरातील नेत्यांनी या दहशतवादी हल्ल्याची कठोर शब्दात निंदा केली आहे आणि भारत सरकारसाठी सहानुभूती व्यक्त केली आहे. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिओ मेलोनी, इस्त्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू, तसेच फ्रान्सचे राष्ट्रपती मॅक्रोन यांनी स्वतःहून आपल्या पंतप्रधानांशी फोनवर चर्चा केली आणि भारतावर विश्वास व्यक्त केला. भारताने युरोपियन युनियन, रशिया, चीन, जपान ,अमेरिका देशांसह सर्वच महत्त्वाच्या देशांच्या राजदूतांना बोलावून या दहशतवादी हल्ल्याच्या परिणामांची आणि तीव्रतेची कल्पना दिली. नुकतेच अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे डी व्हान्स भारताला भेट देऊन गेलेत. तेथील सिनेटर तुलसी गब्बर्ड या सुद्धा भारतात येऊन गेल्यात.त्यांनी भारताच्या नीती धोरणांवर एक प्रकारे विश्वासच व्यक्त केला .चिनी राष्ट्रपती झिनपिंग यांनीही बदलत्या जागतिक रचनेत भारत -चीन एकत्र येण्याची अपेक्षा व्यक्त केली. या सर्व पार्श्वभूमीवर पाक पुरस्कृत हा दहशतवादी हल्ला पाकिस्तानसाठी आत्मघातकी ठरू शकतो.

### भारताचे 'सिंधू पाणी करार'बाबत धोरण

● या दहशतवादी हल्ल्यानंतर झालेल्या महत्त्वाच्या घडामोडी मध्ये भारताने 'सिंधू पाणी करार' तात्पुरत्या स्वरूपात रोखून धरला, हे खूप महत्त्वाचे आहे १९६० चा हा करार रद्द करण्याची मागणी कायमच अधून मधून डोके वर काढते .या निमित्ताने सरकारने हे पाऊल उचलले, हे चांगले झाले, असाच सर्वसाधारण सूर आहे. सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान जगाच्या राजकारणात बाजूला पडला आहे. त्यामुळे दहशतवादी हल्ल्यानंतरच्या परिस्थितीत त्यांना जागतिक जनमत गोळा करणे खूप कठीण आहे. याशिवाय पाकिस्तानची अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी च्या मदतीवर अवलंबून असल्याने युद्धजन्य परिस्थिती त्यांच्या हिताची नाही, या विपरीत भारताचे जागतिक स्थान आज खूपच वरचे आहे. शिवाय जागतिक जनमत आपल्या बाजूने आहे. आपली सैन्य क्षमता जगात चौथ्या क्रमांकाची आहे. शिवाय अर्थव्यवस्था सुद्धा अतिशय बळकट आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानला या निमित्ताने धडा शिकवणे, आपल्याला कठीण नाही. भारताने सिंधू पाणी करार स्थगित करून, अटारी सीमा बंद केली आणि पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द केलेत. आयएनएस विक्रांत ही विमानवाहू युद्ध नौका आणि आयएनएस सुरत ही युद्ध नौका अरबी समुद्रात तैनात केली.



प्रासंगिक

प्रितीश पंडित
राष्ट्रसंचार

# बहरलेले अर्थकारण कोमेजणार...

प हलगाममधील नृशंस अतिरेकी हल्ला हा जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कालखंडातील गेल्या 35 वर्षांमधील पर्यटकांवरील हा सर्वात मोठा आहे. पहलगाम हल्ल्याने अनेक आव्हाने उभी केली आहेत. जम्मू आणि काश्मीरचा सर्वांगीण विकास आणि राजकीयदृष्ट्या स्थिर करण्याच्या उद्देशाने सहा वर्षांपूर्वी येथिल विशेष दर्जा रद्द करण्यात आला. यामुळे इथल्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आणि जगाला खात्रीही मिळाली, की हा प्रदेश भारताशी जोडला जात आहे. या क्षणी जम्मू आणि काश्मीरमधील लोकांसाठी शांतता अजूनही दूर आहे तर दहशतवाद कायम आहे. पर्यटन हा राज्याचा कणा आहे; परंतु पर्यटन हंगाम पुन्हा विस्कळीत झाल्याने आणि देशी-विदेशी पर्यटक काश्मिरमधून परतत असल्याने पर्यटनावर अवलंबून असलेल्या स्थानिक कुटुंबांवर तसेच एकूण व्यापार, व्यवहारावर गंभीर परिणाम होणार आहे. विशेष राज्याचा दर्जा काढून घेतल्यानंतरही काश्मीर तुलनेने शांत होते. तिथल्या निवडणुकाही शांततेत पार पडल्या. काश्मीरचा पर्यटन उद्योग बहरात आला होता. चित्रपट सुरू झाले होते. गुंतवणूक वाढत होती.

ताजा अतिरेकी हल्ला घडेपर्यंत पहलगाम खोऱ्यातील परिस्थिती नेहमीप्रमाणे सामान्य होती. पर्यटन उद्योगही जोमात होता. हॉटेल्समध्ये रेलचेल होती. दाल सरोवरावर शिकाऱ्यांनी गर्दी केली होती, तर विमानतळापासून पहलगामपर्यंत सर्वत्र पर्यटक दिसत होते; पण हा भ्याड हल्ला झाला आणि काश्मीरच्या खोऱ्यात सर्वत्र शांतता आणि दहशतीचे वातावरण पसरले. जम्मू आणि काश्मीरमधील पर्यटनक्षेत्राची वृद्धी पाहिली, तर गेल्याच वर्षी येथे पर्यटनक्षेत्राला मोठा नफा मिळाला होता. 2019 मध्ये कलम 370 रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि पर्यटन अस्थिर झाले होते. त्यानंतर कोविडचाही फटका बसला होता. 2021 पासून परिस्थितीत सुधारणा झाली होती. 2021 मध्ये येथे एकूण 1.13 कोटी पर्यटक आले होते. 2022 मध्ये 1.88 कोटी आणि 2023 मध्ये 2.11 कोटींचा आकडाही गाठला होता. 2024 मध्ये तर पर्यटकांमध्ये विक्रमी वाढ झाली. या वर्षी 2.36 कोटी पर्यटकांनी जम्मू आणि काश्मीरला भेट दिली. त्यापैकी 27 लाख पर्यटकांनी एकट्या काश्मीरला भेट दिली होती. वाढत्या पर्यटनामुळे खोऱ्यात हॉटेल्सची मागणीही एवढी वाढली होती की, काही पर्यटकांची राहण्याची सोय खासगी घरांमध्ये केली जात होती. गुलमर्ग, सोनमर्ग, पहलगाम अशा ठिकाणचे पर्यटन पुन्हा बहरू लागले होते. हॉटेल व्यवसायाला याचा मोठा फायदा होत गेला आणि वृद्धी होत गेली. यातच गुलमर्गचा आशियातील'टॉप स्की डेस्टिनेशन' मध्ये समावेश झाला.

जम्मू आणि काश्मीर पर्यटन धोरण 2020 च्या माहितीनुसार, राज्यातील'जीएसडीपी' मध्ये पर्यटनाचा सात टक्क्यांहून अधिक वाटा आहे. 2018-19 मध्ये जम्मू आणि काश्मीरचा अंदाजे जीएसडीपी 1.57 लाख कोटी होता. त्यात पर्यटनाचा थेट वाटा 11 हजार कोटींपेक्षा जास्त आहे. त्याच वेळी, 2019-20 मध्ये पर्यटनाचा वाटा 7.84 टक्के होता. 2022-23 मध्ये वाढून तो 8.47 टक्क्यांवर पोहोचला. खोऱ्यातील हजारो कुटुंबे पर्यटन उद्योगाशी जोडलेली आहेत. सर्व शिकाराचालक, मार्गदर्शक, टॅक्सीचालक, हॉटेल कर्मचारी, रेस्टॉरंट्स, कारागीर, हस्तकला विक्रेते यांचे जीवनमान यावर अवलंबून आहे. सरकारचा अंदाज आहे की पर्यटनक्षेत्र दर वर्षी सुमारे 50 हजार नवीन रोजगारसंधी निर्माण करते. याशिवाय, पुढील दहा वर्षांमध्ये चार हजार पर्यटन सेवा देणाऱ्यांना प्रशिक्षित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. पर्यटनाला चालना देण्यासाठी काश्मीरमधील पर्यटन क्षेत्र केवळ नैसर्गिक सौंदर्यावर अवलंबून नाही, तर साहसी पर्यटन, कल्याण पर्यटन, केशर पर्यटन, बागायती पर्यटन, वारसा आणि सांस्कृतिक पर्यटनालाही विशेष प्राधान्य दिले जाते. यासोबतच ट्रेकिंग, स्कीइंग, राफ्टिंग, रॉक क्लाइंबिंग, कॅम्पिंग आणि माउंटन टुरिझम यासारख्या धाडसी खेळांमध्येही पर्यटक रुची दाखवतात. त्यामुळे पर्यटनाची वृद्धी होते. आता मात्र काश्मीर या वृध्दीला मुकणार आहे. पर्यटकांनी पाठ फिरवल्याने आणि काश्मीरवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन सातत्याने होत असल्याने राज्याला मोठ्या आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागू शकते.

आंतरराष्ट्रीय

जनार्दन पाटील
राष्ट्रसंचार


'सीएए' आणि 'एनआरसी' कायद्यानंतरही काश्मिरमध्ये काहीच झाले नाही. काश्मीरबाहेरच्या लोकांचे रोजगारानिमित्त काश्मीरमध्ये स्थायिक होण्याचे प्रमाण वाढले होते. देशाचा एक भाग म्हणून काश्मिरचा उल्लेख व्हायला लागला होता. दहशतवादी गटात सामील होण्याचे स्थानिक तरुणांचे प्रमाण कमी झाले होते. दहशतवाद्यांना आश्रय मिळणे कमी झाले होते. अशातच हा हल्ला होण्यामागील कारणे मात्र स्पष्ट आहेत.

अलिकडच्या काळात काश्मिरमध्ये उच्च शिक्षणाच्याही सुविधा वाढत होत्या. तेथील दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले असे वाटत असतानाच पाकिस्तानमधील दहशतवादी रावळकोटमधून कट रचत होते. पाकिस्तानमध्ये घुसून भारताच्या शत्रूंना यमसदनी धाडले जात असताना भारतात घुसून अतिरेकी मोठे कांड करणार असल्याचा सुगावा लागू नये, हे मात्र आश्चर्य आहे. या हल्ल्याचे टायमिंग लक्षात घेण्याजोगे आहेअमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी वान्स भारताच्या दौऱ्यावर असताना ही घटना घडली. बिल क्लिंटन अमेरिकेचे अध्यक्ष असताना भारत दौऱ्यावर येण्याआधी काश्मीरमध्ये 35 शीखांचे नृशंस हत्याकांड घडवून आणण्यात आले होते. श्रीनगरजवळ घडलेल्या या घटनेनंतर 25 वर्षानंतरचा पहलगाममधील हा दुसरा मोठा हल्ला आहे. पुलवामा येथे 44 जवानांना आयईडी स्फोटात हौतात्म्य आले होते. तो हल्ला आणि आताच्या हल्ल्यात फरक आहे. त्यात जवानांना टार्गेट करण्यात आले होते, तर आताच्या हल्ल्यात सामान्य पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. हा काश्मिरच्या अर्थव्यवस्थेरचा हल्ला आहे. जम्मू-काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी हा दहशतवादी हल्ला अलीकडच्या काही वर्षांमधील नागरिकांवरील हल्ल्यापेक्षा मोठा असल्याचे म्हटले आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे स्थानिक नागरिकांनी दहशतवाद्यांच्या घटनेचा निषेध केला. ते रस्त्यावर आले. लोकांनी मेणबत्त्या पेटवून कँडल मार्च काढला. काश्मिरचा लाल चौक सतत उपक्रमांनी गजबजलेला असतो. तो रिकामा दिसत होता. पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर सीमेजवळ पाकिस्तानच्या संशयास्पद लष्करी हालचालींबाबत'सोशल मीडिया'वर अनेक दावे समोर आले. मात्र आता या भागाची आर्थिक कोंडी अधिक बोलकी ठरणार आहे



**१९७० च्या दशकात संगणकांचा वापर – अत्यंत मर्यादित प्रमाणात – सुरू झाला आणि गेल्या पाच दशकात त्यांचे स्वरूप कसे आमूलाग्र बदलले हे वेगळे सांगण्याची काहीच गरज नाही. एकविसाव्या शतकाची सुरूवात होउन आता २५ वर्ष झाली आहे . तरीही, गेल्या पंधरावीस वर्षांत ज्या प्रकारे बदल झाले तितके त्याआधीच्या ५० वर्षांतही झाले नव्हते असे म्हणता येईल.**

# एआय चे नियंत्रण काळाची गरज



तंत्रज्ञान
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार
deepak@deepakshikarpur.com
संगणक तज्ञ

कॉंप्यूटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन व ह्या तीघांचे जमलेले त्रिकूट ह्यांसारख्या घटकांमुळे – महानगरांपासून खेड्यांपर्यंत – सर्वांच्याच जीवनात फरक पडला. संगणक आणि संगणकीय प्रणाली पूर्वीप्रमाणे फक्त सांगकाम्या न राहिल्या नसून मानवी व्यवहार जास्त चांगल्या पद्धतीने समजून घेण्याची क्षमता त्यांना दिली जात आहे बदलत्या तंत्रज्ञानाचे परिणाम अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तने होणार आहेत. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. त्यामुळेच ह्या तंत्राचे व्यावहारिक उपयोग देखील वाढताना दिसणार आहेत. आज भारत जगभरात 'आयटी हब' म्हणून ओळखला जातोच. तसेच डिजिटल व्यवहारांतही भारताने गेल्या काही काळात मोठी झेप घेतली. हे एक असे युग आहे जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. ह्या युगात, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे आपल्या जगण्याचा आणि काम करण्याची पद्धत बदलत आहे. आता अशी बरीचशी कामे 'ऑनलाईन' होऊ घातल्याने येत्या फक्त दहा ते २० वर्षांमध्ये आपणांस कल्पनाही करता येणार नाही, इतक्या बाबी संगणकाद्वारे हाताळता येणार आहेत. सर्वप्रथम कीबोर्ड आणि माऊसचा वापर खूपच कमी होऊन स्पर्शाने (टच-स्क्रीन), आवाजाद्वारे किंवा हातांच्या हालचालीने आज्ञा स्वीकारणारे संगणकही वापरले जातील. संगणक आपणांस विविध कामांची (म्हणजे त्याने करून उरलेल्या कामांची!) आठवण करून देईल. आपणांस हवी ती माहिती फटाफट काढून देईल (आत्ताही देतच आहे), आपल्या आरोग्याची काळजी घेईल, आपल्या तसेच आपल्या मालमत्तेच्या सुरक्षिततेकडे लक्ष देईल, विविध ठिकाणी आपली ओळख पटवेल ('आधार' या 'युआयडी' कार्डचे उदाहरण घ्या), आपली सर्वप्रकारे करमणूक करेल. एवढेच नाही तर चक्क आपली स्वप्नेदेखील रेकॉर्ड करून सवडीने ती आपणांस दाखवेल. जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ कै स्टीफन हॉकिंग हे बहुविकलांग असूनही तंत्रज्ञानाच्या करामतीने आपल्याशी संवाद साधू शकत आणि त्यांच्याकडील ज्ञानाचा फायदा लोकांना मिळाला .ज्ञानावरून आठवले, शिक्षण आणि ते देण्या-घेण्याच्या संकल्पनांमध्ये संगणकीय क्रांतीमुळे फार मोठा फरक पडेल. विद्यापीठांची विचार आणि व्यवस्थापन पद्धती बदलेल आणि कदाचित सायबर विद्यापीठेही निर्माण होतील. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत न जाता शिक्षण घेणे सोपे होईल आणि मुख्य म्हणजे ते साचेबंद, कंटाळवाणे न वाटता हसतखेळत घेता येईल. (याला 'एज्युटेनमेंट' (एज्युकेशन अधिक एंटरटेनमेंट म्हणतात). 'मल्टिमीडिया' तसेच 'इंटरॲक्टिव्ह थ्री-डी' (परस्परसंवादी त्रिमिती) मुळे शिक्षणक्रमात 'एक्सबॉक्स' किंवा 'प्लेस्टेशन'सारख्या 'गेमिंग सॉफ्टवेअर्स'वर आधारित तंत्राचाही समावेश राहील. त्याचप्रमाणे छापील पुस्तके, वृत्तपत्रे यांची संख्या कमी होऊ लागेल व त्याजागी 'ई-बुक्स' वा 'ई-न्यूजपेपर्स'चा वापर वाढेल. यामुळे इंटरनेटवरील साहित्याचे तसेच शैक्षणिक पुस्तकांचे स्वरूप अधिक मनोरंजक आणि देखणे बनेल व त्यामध्ये चटकन बदल घडवणेही शक्य होईल. सौर वा इतर ऊर्जास्रोतांवर आधारित संगणक तसेच स्मार्टफोन उपलब्ध झाल्याने हे शिक्षण तसेच वाचनाचे वेड अगदी दुर्गम भागांपर्यंत पोहोचू शकेल.

तंत्रज्ञान हे एक शक्तिशाली साधन आहे. याचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी केला पाहिजे. तंत्रज्ञान आणि नैतिकता यांच्यातील संतुलन राखणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. संगणकाला 'विचारक्षमता' नसते असे मानणार्यांचाही गट मोठा आहे. कितीही वेगवान, कार्यक्षम असले आणि सर्वगुणसंपन्न भासले तरी अखेरीस ते एक यंत्र आहे. मानवी संशोधक डेटा गोळा करण्यात आणि त्याचे विश्लेषण करण्यात बराच वेळ घालवतात. एआय तंत्र जागतिक डेटाबेसमधून माहिती शोधून जलद निष्कर्ष काढते. वापरकर्ता ह्या वेगामुळे खुश होतो. उद्योगही पैसे वाचल्याने समाधानी आहेत . पण कळीचा मुद्दा आहे की हे निष्कर्ष काढण्याची प्रक्रिया पूर्णपणे गोपनीय असते. कदाचित त्यामुळे अनेक देशांच्या कॉपीराईट कायद्यांचा भंग झाला असेल. हेच मुद्दे सूचित बालाजी ह्या संशोधकाने ऑक्टोबर 2024 मध्ये व्यक्त केले होते . ओपनएआयने लोकप्रिय चॅटजीपीटी ऑनलाइन चॅटबॉट विकसित करताना यूएस कॉपीराइट कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप त्यांनी केला होता. सूचीत त्या उद्योगात चार वर्ष संशोधक म्हणून कार्यरत होता . त्यामुळे त्याचे मुद्दे गांभीर्याने घ्यायला हवेत. आता त्याच्या संशयास्पद मुत्यूमुळे ह्या सर्व बाबी अजून शंकास्पद झाल्या आहेत. जनरेटिव्ह एआय टूल्स वापरकर्त्यांच्या प्रॉम्प्ट (यूजर इनपुट) नुसार माहितीचे पृथकरण करून नवनिर्मिती करतात (ऑडिओ, टेक्स्ट , व्हिडीओ, फ़ोटॅा ). हे निर्माण केलेली गोष्ट मानवनिर्मित नाही असे स्पष्ट करण्याचे बंधन नसल्याने त्याच्या सत्यतेवर सर्वांचा विश्वास बसू शकतो .


एआय चा धोका असा आहे की ते बनावट परंतु वास्तविक दिसणाऱ्या प्रतिमा आणि व्हिडिओ तयार करून चुकीची माहिती सर्वत्र प्रसार करू शकते . ह्यामागे प्रतिगामी, गुन्हेगारी, दहशतवादी अथवा व्यावसायिक स्पर्धक असू शकतात पण ते पाठीमागे राहून शांतपणे अदृश्य राहू शकतात. त्यामुळे जनमत प्रभाव सहज शक्य आहे . माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडविण्याची क्षमताही प्राप्त झाली. ह्या प्रकाराला (खरं तर गैरप्रकाराला) वेळीच आळा घातला नाही तर अराजक घडू शकते. परिणामी सत्य लपवणे, ते वेगळ्या रूपात दाखवणे किंवा स्वतःला सोयीचा असेल तेवढाच भाग सांगणेही अगदी सहजशक्य होईल. ह्यामध्ये प्रगत राष्ट्रांमध्ये उहापोह होऊन जागृती झाली आहे. १ ऑगस्ट २०२४ रोजी, युरोपियन कृत्रिम बुद्धिमत्ता कायदा (AI कायदा) अंमलात आला. या नवीन नियमांचा एक भाग म्हणून, AI कायदा प्रतिबंधित AI अस्वीकार्य पद्धतींची यादी तयार करतो ज्यामुळे धोका आहे . ह्या प्रतिबंधाचा उद्देश लोकांच्या सुरक्षेसाठी अस्वीकार्य पातळीच्या धोका असलेल्या AI सिस्टीमवर किंवा अनाहूत किंवा भेदभाव करणाऱ्या प्रणालींवर आहे. आपल्या देशातही ह्या विषयावर मंथन सुरु आहे . कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकास आणि वापरासाठी स्पष्ट धोरण तयार करणे आवश्यक आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय ह्याची कायदेशीर व्याख्या करण्याची वेळ आली आहे. ह्यासाठी सरकारने व स्वयंसेवी संस्थांनी खरेपणा तपासण्यासाठी काही वेबसाईट्स तयार करणे जरुरीचे आहे. तसेच सायबर कायदे बदलून त्यात फेक न्यूज , व्हिडिओचा प्रसार करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना जबर शिक्षा व्हायला हवी. हे सर्व प्रकार फक्त राजकीय अथवा देशांतील स्पर्धे पुरतेच नाहीत. उद्योग विश्व ह्यातून अलिप्त राहू शकत नाही. उद्योग आपले उत्पादन लोकप्रिय व अधिक लाभदायी करण्यासाठी स्पर्धक उद्योगांबद्दल गैरसमज, फेक माहिती सोशल मीडिया वर पसरवू शकतो .व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षण पद्धतीत , व्यवस्थापन उच्च शिक्षणात अंतर्भूत केलेच पाहिजे नीतिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान ही बाब शालेय, महाविद्यालयीन शिक्षणात अंतर्भूत करायची हीच वेळ आहे .

# पुण्यात 'ग्रंथ भिशी'ची क्रांती

## "शाल-श्रीफळ नव्हे, पुस्तक द्या!"

**पारंपरिक सण समारंभ, वाढदिवस, सत्कार-प्रसंगी हातात येणारी शाल, श्रीफळ किंवा बुके... किती वेळा आपण हे स्वीकारलं? आणि किती वेळा ते मनापासून उपयोगात आणलं? बहुतेक वेळा ते एखाद्या कोपऱ्यात ठेवून दिलं जातं. पण कल्पना करा, याच क्षणी तुम्हाला एखादं प्रेरणादायी, जीवन बदलणारं पुस्तक भेट मिळालं तर? पुण्यातील किरण काळे आणि निलाक्षी काळे-सालके यांची हीच कल्पना 'ग्रंथ भिशी' आणि 'ग्रंथदान मोहीम'च्या माध्यमातून वाचनप्रेमींसाठी सजीव केली आहे.**



उपक्रम
किरण काळे
राष्ट्रसंचार

**कात्रज** येथील अजिंक्य मित्र मंडळ आणि 'मातृगंध' या संस्थेच्या माध्यमातून सुरू झालेल्या या उपक्रमाचा मूळ उद्देश आहे – वाचनसंस्कृती पुनर्जीवित करणं. किरण काळे यांनी या उपक्रमाची सुरूवात खूप साध्या आणि सुंदर पद्धतीने केली. मंडळात येणाऱ्या पाहुण्यांना पारंपरिक भेटवस्तू न देता, थेट पुस्तक भेट दिलं जातं. एवढंच नव्हे तर सदस्यांच्या वाढदिवसाला केक नाही, पार्टी नाही – एक सुंदर पुस्तक त्यांच्या हातात दिलं जातं. या छोट्याशा कृतीतून जो संदेश दिला जातो, तो फार मोठा आहे – 'पुस्तक हा सर्वात मौल्यवान खजिना आहे!'

आपण पैसे जमा करतो तशीच ही पुस्तकांची भिशी ! प्रत्येक महिन्याला सदस्य एक किंवा अधिक पुस्तके "जमा" करतात. ही पुस्तके मग ग्रामीण भागातील गरजू शाळांमध्ये पोहोचवली जातात. आणि हे फक्त पुस्तक देणं नाहीये – ही एक वाचनाची चळवळ आहे, जी शहरातून गावाकडे पोहोचते आहे.

या मोहिमेने एक वेगळा ट्रेंडच तयार केला आहे. वाढदिवस, लग्न, naming ceremony, सत्कार – कशाही निमित्ताने पुस्तकं भेट देणं ही आता प्रतिष्ठेची गोष्ट बनते आहे. "पुस्तकं म्हणजे status symbol नाही, पण culture symbol नक्की आहे." लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना वाचनाची सवय लागावी म्हणूनच हे प्रयत्न आहेत. आणि त्यात तुम्ही, आम्ही, आपण सगळे सामील होऊ शकतो. 'CSR' किंवा सामाजिक जबाबदारीचा एक भाग म्हणूनही अनेक कंपन्या आता 'ग्रंथ भिशी'सारख्या उपक्रमात रस घेत आहेत. अनेक आयटी कंपनीतील कर्मचारी स्वतः पुढाकार घेत आहेत. ज्ञान हेच खरे CSR गिफ्ट आहे, हे ते समजून घेत आहेत.

'ग्रंथ भिशी' आणि 'ग्रंथदान मोहीम' हे उपक्रम केवळ पुस्तकांची देवाणघेवाण नाही, तर एक सांस्कृतिक चळवळ आहे – वाचन वाचवा! अशी एक आर्त हाक आहे. पुस्तकांची भेट ही मौनातली संवादाची सुरुवात असते. ती कधी प्रेरणादायी ठरते, कधी वाट चुकलेल्या विचारांना दिशा देते, तर कधी आत्म्याला स्पर्श करणारी ठरते.

जर तुमच्या घरी वाचलेली, सुस्थितीत असलेली पुस्तकं असतील... किंवा तुम्हाला एखाद्या मित्राच्या वाढदिवसाला काहीतरी हटके द्यायचं असेल... तर पुढच्यावेळी बुके किंवा शोपीस न घेता, एक पुस्तक हातात घ्या – आणि वाचनसंस्कृतीच्या या लाटेचा भाग बना!

पुस्तकांच्या या मैत्रीला, तुमच्या हृदयातून सलाम ठेवा – आणि एक पुस्तक पुढच्या हातात द्या...


**कधी कधी स्टाईल म्हणजे महागडं असणं नाही, तर किफायतशीर असणं सुद्धा एक स्टाईलच असते! आणि त्यातही ट्रेंडी ज्वेलरी अंडर ₹199 – ही तर आपल्या सारख्या कॉलेज गर्ल्ससाठी जणू फॅशनची ट्रीटच! चला तर मग, अशीच काही हटके, ट्रेंडी आणि बिनधास्त स्टाईलिंग करणारी ज्वेलरी एक्स्प्लोर करूया – जी आपल्या खिशाला त्रास न देता स्वॅगला स्पार्कल देते!**

# ट्रेंडी ज्वेलरी अंडर ₹199



फॅशन
- ज्योती हांडगे, पुणे
राष्ट्रसंचार





- **ऑक्सिडाइज्ड झुमके** – पाचव्या मजल्यावरून पाहिलं तरी दिसतील! कधी विचार केलाय का की आईची जुनी साडी + ऑक्सिडाइज्ड झुमके = डेडली कॉम्बिनेशन? हे झुमके फक्त ₹99-₹149 मध्ये मिळतात आणि कोणत्याही सिंपल कुर्त्याला देतात रॉयल आणि देसी टच!
- **मिनिमल पेंडंट** – 'लहान पण महत्त्वाचं' चं खरं उदाहरण
- कोरियन लुक्समध्ये जी साधी-सोबर, छोट्या हारची ट्रेंड आहे, ती आज सगळीकडे दिसते.
- ₹89-₹129 मध्ये मिळणारे हे पेंडंट्स डेली कॉलेज लूकला देतील सॉफ्ट फेमिनिन वाइब.
- **स्टेटमेंट ईअरकफ्स** – कानात घालायचे, पण लक्ष सगळ्यांचं मिळवणारे!
- कोणतीही पिअरसिंग न करता कूल दिसायचंय?
- ₹149 च्या आत मिळणारे हे ईअरकफ्स रेड टॉप + ब्लॅक जीन्ससाठी परफेक्ट मॅच! आणि हो, इन्स्टा रीलमध्ये नक्की दिसणार!
- **मल्टीरिंग सेट्स** – एक बोट नाही तर सगळी बोटं शोभली पाहिजेत!
- ₹199 मध्ये मिळणारे 5-6 रिंग्सचे सेट्स म्हणजे किफायतशीर रॉयल्टी! कॉफी घेणारी हातातली पोज + हे रिंग्स = लुक पूर्ण झाला म्हणायचा!
- **नाकातलं छोटं नथसदृश पिन** – देसीपणा थोडासा ग्लॅमरस!
- ही ट्रेंडिंग गोष्ट ₹49-₹99 मध्ये मिळते, आणि फेसकट फोटोंमध्ये ती कॅमेऱ्याला जास्त आवडते!
- भारतीय लुकमध्ये लहान नथ एक वेगळीच कमाल दाखवते.
- **फंकी चोकर** – 'कॉलेजच्या कॅन्टीनची क्वीन' व्हायला हवं का?
- ब्लॅक, बेल्ट स्टाईल, बीडेड... चोकर ट्रेंड मध्ये आहेतच!
- ₹129 मध्ये मिळणारा एक चोकर तुझं फॅशन स्टेटमेंट अपग्रेड करेल, लगेच!
- **मिक्स अँड मॅच ब्रेसलेट्स** – हात हलवला की फॅशन पण हलते!
- **फॅब्रिक, मेटल, कुंदन** – ब्रेसलेट्सच्या ही भरपूर स्टाइल्स!
- ₹99 मध्ये दोन-तीन घेता येतील आणि रोज एक नवीन लूक!
- **हेअर ॲक्सेसरीज** – ओपन केसांपेक्षा हे जास्त बोलकं असतं!
- क्लिप्स, बीडेड पिन्स, मिनी रबर बँड्स – हे सगळं under ₹50! आणि स्टाइलला देतात 'क्लिकबेट' इफेक्ट!
- **ज्वेलरी शॉपिंग हॅक्स** – हे लक्षात ठेव, गर्ल! लोकल मार्केट्सचं मॅजिक: रस्त्यावरील ठेलेवाले किंवा छोटे बुटिक – इथेच खरे ट्रेझर्स मिळतात!
- **ऑनलाइन डील्स:** Instagram shops, Meesho, Flipkart वर ₹199 च्या आत खूप स्टनिंग ऑप्शन्स असतात. मैत्रीणींबरोबर बॅच बायिंग: दोनजणी मिळून एक सेट विकत घेऊन अर्धा-अर्धा वापरायचा – स्मार्ट, ना?
- 10. ट्रेंड्सपेक्षा तू महत्त्वाची!
- काही ट्रेंड्स सगळ्यांवर चालत नाहीत... पण तू काही ट्रेंड्सवर चालतेस!
- हे लक्षात ठेव – ज्वेलरी ही केवळ शोभा नसते, ती व्यक्तिमत्त्वाची शिंपण असते!
- कधी निळ्या ड्रेसवर सिल्व्हर झुमके घाल, तर कधी पांढऱ्या टॉपवर एक छोटासा पेंडंट...
- फील करत जा, स्टाईल करत जा! शेवटी एक mantra – '₹199 च्या आतली ज्वेलरी, पण स्वॅग ₹1999 चा!'
- **किंमत म्हणजे दर्जा नाही** – आणि फॅशनसाठी मोठं बजेट नाही तर मोठं मन लागतं! तुझा कॉन्फिडन्स, तुझी स्टाईल सेन्स आणि थोडासा क्रिएटिव्ह टच –बस्स, एवढंच पुरेसं आहे गर्ल्सची ज्वेलरी लिस्ट फुल करण्यासाठी!

# सनस्क्रीन लावण्याच्या टिप्स...



- - घराबाहेर पडण्यापूर्वी ३० मिनिटे आधी सनस्क्रीन वापरा कारण सनस्क्रीन तुमच्या त्वचेत शोषून घेण्यासाठी वेळ लागतो.
- - तुम्ही सुमारे ३५ मिली सनस्क्रीन लावावे. दुसऱ्या शब्दांत, तुम्ही सुमारे २ किंवा ३ बोटांच्या किमतीचे सनस्क्रीन वापरावे.
- - नेहमी १५ पेक्षा जास्त एसपीएफ पातळी असलेले सनस्क्रीन वापरा कारण जास्त एसपीएफ तुमच्या त्वचेला सूर्यापासून अधिक संरक्षण देईल. ५० एसपीएफ अंदाजे ९८% यूव्हीबी किरणांपासून संरक्षण करते.
- - सूर्याच्या हानिकारक किरणांपासून तुमच्या त्वचेचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी सनस्क्रीन पुन्हा लावणे देखील महत्त्वाचे आहे. जर तुम्ही पोहायला गेलात किंवा व्यायाम केलात तर तुम्ही पुन्हा सनस्क्रीन लावावे.

**सरत्या आठवड्यामध्ये सोन्याच्या दरांचा वेलू अक्षरश: गगनावर गेला. वर्षभरातील किंमतींची तुलना करता सोन्याने 31 टक्क्यांचा परतावा दिला, असे म्हणता येते. दरम्यान, तुरीच्या डाळींच्या किमती उतरण्याची शक्यता असल्याचे बाजारात पहायला मिळाले. तिकडे रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये घरांच्या विक्रीत घट झाल्याची आकडेवारी पहायला मिळाली. सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीतील या घडामोडी लक्षवेधी ठरल्या...**

# सोने आकाशात, डाळी जमिनीवर...

**आर्थिक**
**-महेश देशपांडे, अर्थतज्ज्ञ**
**राष्ट्रसंचार**

सरत्या आठवड्यामध्ये सोन्याच्या दरांचा वेलू अक्षरशः गगनावर गेला. वर्षभरातील किंमतींची तुलना करता सोन्याने ३१ टक्क्यांचा परतावा दिला, असे म्हणता येते. दरम्यान, तुरीच्या डाळींच्या किमती उतरण्याची शक्यता असल्याचे बाजारात पहायला मिळाले. तिकडे रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये घरांच्या विक्रीत घट झाल्याची आकडेवारी पहयला मिळाली. अर्थनगरीतील या महत्वाच्या घडामोडींचा आढावा लक्षवेधी ठरला.

सोन्याचा शोध लागल्यापासून हा धातू अमूल्य असल्याचे मानवाच्या लक्षात आल्यापासून सोने हे अक्षय धन मानले जाते. अक्षय तृतीयेला सोनेखरेदी शुभ मानण्यात येते. गेल्या एप्रिल महिन्यापासून आतापर्यंतच्या काळाचा विचार केला असता एका वर्षात सोन्याने ३१ टक्क्यांचा परतावा दिला आहे. गेल्या वर्षी अक्षय तृतीयेला २४ कॅरेट सोन्याची किंमत सुमारे ७३ हजार रुपये प्रति तोळा होती. दिवाळीनंतर सोन्याने मोठी उसळी घेतली. सोन्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने दर प्रति तोळा एक लाख रुपयांपेक्षा अधिक झाला. म्हणजे एका वर्षात सोन्याने ३१ टक्क्यांहून अधिक परतावा दिला. पारंपारिक गुंतवणुकीच्या प्रकारात सोन्यातील गुंतवणूक उजवी ठरली आहे.व्या वर्षात सोन्याने मोठी मुसंडी मारली. ट्रम्प धोरणापासून तर सोन्याला विशेष झळाळी आली आहे. त्याच्या दराने १६ एप्रिल रोजी ९९० रुपये, १७ एप्रिल रोजी सोने 1140 रुपये तर 18 एप्रिल रोजी 250 रुपयांची वाढ नोंदवली. या दरामध्ये अजुनही वाढ होत आहे. दरम्यान, चांदीनेही प्रति किलो दरामध्ये एक लाखाचा टप्पा ओलांडला. चांदीने यापूर्वीही लाखाचा टप्पा ओलांडला होता. चांदी 1 लाख 5 हजारांच्या घरात पोहचली होती. त्यानंतर त्यात घसरण झाली. आता चांदीने पुन्हा उसळी घेतली आहे. 'गुड रिटर्न्स'नुसार एक किलो चांदीचा भाव एक लाख रुपयांच्या आसपास आहे. वायदे बाजारात आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सोने आणि चांदीवर कुठलाही कर, शुल्क नसते, तर सराफा बाजारात शुल्क आणि कराचा समावेश होत असल्याने भावात तफावत दिसून येते.

दरम्यान, तुरीच्या डाळींच्या किमती उतरण्याची शक्यता दिसून येत आहे. देशातील तूर डाळीच्या किंमती नियंत्रित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठी घोषणा केली आहे. सरकारने किंमत समर्थन योजने (पीएसएस) अंतर्गत या वर्षी आतापर्यंत तीन लाख 40 हजार टन तूर खरेदी केली आहे. त्यामुळे आगामी काळात तुरीच्या डाळीची किंमत कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. कृषी मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीमध्ये ही माहिती समोर आली आहे. सरकारने 'पीएसएस'अंतर्गत किमान आधारभूत किंमतीवर (एमएसपी) तूर डाळ खरेदी केली आहे. मंत्रालयाने नऊ राज्यांमधून 13.22 लाख टन तूर खरेदीला मंजुरी दिली आहे. किंमती नियंत्रित ठेवण्यासाठी खुल्या बाजारात सोडण्यासाठी दहा लाख टन तूर डाळीचा बफर स्टॉक ठेवण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार 13 एप्रिलपर्यंत तूर खरेदी तीन लाख 40 हजार टनांवर पोहोचली. सर्वाधिक एक लाख तीस हजार



टन खरेदी कर्नाटकमधून करण्यात आली. तिथे शेतकऱ्यांना 7,550 रुपये प्रति क्विंटलच्या 'एमएसपी'पेक्षा जास्त आणि 450 रुपये प्रति क्विंटल राज्य बोनस मिळत आहे.

याशिवाय आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश येथून खरेदी करण्यात आली. सरकारने तेलंगणा आणि मध्य प्रदेशमधून 17 हजार टन हरभरा खरेदी केला आहे. 27 लाख टन हरभरा खरेदीला मंजुरी मिळूनही खरेदी संथ सुरू आहे. कारण दहा टक्के आयात शुल्क लागू केल्यानंतर देशांतर्गत किमतींनी 5,650 रुपये प्रति क्विंटलच्या 'एमएसपी'ची पातळी गाठली आहे.

आठपैकी पाच शहरांमधील नव्या गृहप्रकल्पांच्या संख्येत वार्षिक घट दिसून आली. पुणे, हैदराबाद आणि अहमदाबादमध्ये संख्येच्या दृष्टीने सर्वात तीव्र घसरण झाल्याचे या अहवालात स्पष्ट झाले आहे. पुणे, हैदराबाद आणि अहमदाबादमध्ये 2024 च्या तुलनेत नवीन गृहप्रकल्पांच्या संख्येत क्रमशः 15,543 (-38 टक्के), 10,156 (-33 टक्के), 2,384 (-23 टक्के) घट झाली आहे. इतर प्रमुख शहरे, जसे की चेन्नई 4,070 (-14 टक्के), मुंबई 31,322 (-15 टक्के) येथेही नवीन लॉंच प्रकल्पांमध्ये घट झाली असल्याचे पहायला मिळाले. याउलट बंगळुरू, दिल्ली एनसीआर आणि कोलकाता येथे मात्र नवीन प्रकल्पांमध्ये वाढ झाली आहे.

याच सुमारास व्यापारयुध्दाच्या कुरुक्षेत्रावरुन एक बातमी आली. त्यानुसार अमेरिका आणि चीनमध्ये सुरू असलेल्या व्यापारयुद्धादरम्यान चीनने अमेरिकेसोबत कोणत्याही प्रकारच्या व्यापार करारावर स्वाक्षरी करू इच्छिणाऱ्या देशांना इशारा दिला आहे. ट्रम्प प्रशासनाच्या शुल्कामुळे दबावात असलेल्या देशांशी चीन बोलणी करू इच्छित आहे. याच सुमारास डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने सांगितले की शुल्क कमी करण्यासाठी अनेक देश अमेरिकेशी चर्चा करत आहेत. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने सांगितले की ते अमेरिका आणि इतर देशांच्या सर्वसमावेशक आर्थिक कराराला पूर्णपणे विरोध करत आहेत. कारण ते त्यांच्या हिताच्या विरोधात आहे. व्यापार भागीदार देशांवर प्रथम शुल्क लादण्याच्या आणि नंतर त्यांच्यावर वाटाघाटीसाठी दबाव आणण्याच्या अमेरिकेच्या निर्णयावर चीनने टीका केली आहे. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे की आम्ही आपले हित आणि अधिकारांचे रक्षण करण्यास पूर्णपणे सक्षम असून सर्व पक्षांसोबत एकजुटीने ते आणखी मजबूत करू इच्छितो.

### रिअल इस्टेट क्षेत्र

- देशभरात जानेवारी ते मार्च महिन्यामध्ये घरांची विक्री मंदावली असल्याचे दिसून आले आहे. 'प्रॉपटायगर डॉटकॉम'ने याबाबतचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला. मालमत्तेच्या वाढत्या किंमतींमुळे नवीन लॉंच प्रकल्पही रखडल्याचे 'प्रॉपटायगर'ने म्हटले आहे. 'डिजिटल रिअल इस्टेट ट्रांझॅक्शन अँड ॲडव्हायझरी प्लॅटफॉर्म प्रॉपटायगर डॉटकॉम'च्या अलिकडच्या अहवालानुसार गेल्या वर्षाच्या तुलनेत देशभरातील आठ प्रमुख बाजारपेठांमध्ये घरांची विक्री १९ टक्क्यांनी कमी झाली. त्याचे कारण आहे मालमत्तेच्या वाढत्या किंमती आणि मंदावलेल्या वृद्धीमुळे खरेदीदार सावधगिरी बाळगून आहेत. जानेवारी ते मार्च या कालावधीमध्ये घरांच्या विक्रीचा वेग खूपच कमी झाला आहे. विकासकांनी गेल्या काही वर्षांमध्ये किंमतीत झालेल्या वाढीनंतर स्वतःच्या अपेक्षाही वाढवल्या. त्यामुळे जगातील सर्वाधिक लोकवस्ती असलेल्या आपल्या देशात मोठ्या भागाच्या खरेदीदारांसाठी घर खरेदी करणे परवडण्याजोगी राहिले नाही.
- 'हाऊसिंग डॉटकॉम आणि प्रॉपटायगर डॉटकॉम'चे ग्रुप चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर ध्रुव अग्रवाल म्हणाले, "वाढत्या महागाईचा विपरीत परिणाम विक्रीवर आधीच दिसू लागला आहे. त्यात जागतिक ट्रेड-वॉरमुळे नवी अनिश्चितता आली आहे. त्यामुळे खरेदीदार गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगत आहेत आणि विशेष करून रिअल इस्टेटसारख्या मोठ्या गुंतवणुकीच्या बाबतीत अधिक सावध झाले आहेत. भारतीय रिझर्व बँकेने फेब्रुवारीमध्ये 25-बेसिस पॉइंटने दर कमी केल्याचे जाहीर केले नसते, तर विक्रीतील ही घट अधिक तीव्र झाली असती." या अहवालानुसार जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तिमाहीमध्ये एक लाखपेक्षा कमी घरे विकली गेली. या विश्लेषणात समाविष्ट करण्यात आलेल्या बहुतांश शहरांमध्ये ही संख्या घटल्याचे दिसते. बंगळुरू आणि चेन्नईमध्ये हा ट्रेंड दिसला नाही, तर हैदराबाद, मुंबई आणि पुण्यात ही विक्री तीव्रतेने कमी झालेली दिसली. बंगळुरूमध्ये 2024 च्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत 11,731 घरांच्या विक्रीसह 13 टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली.

---

**स्वित्झर्लंडस्थित आयक्यू एअर संस्थेने जागतिक पातळीवरील हवा प्रदूषणाचा व्यापक अहवाल प्रसिद्ध केला असून त्यात भारताचा पाचवा क्रमांक आहे. छाड, बांगलादेश, पाकिस्तान व डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कॉंगो हे जगभरातील पहिले चार सर्वाधिक प्रदूषण असलेले देश आहेत. त्या खालोखाल भारताचा नंबर लागत असला तरी आजच्या घडीला आपल्या देशातील हवेचे प्रदूषण चिंताजनक आहे. भगीरथ प्रयत्न करून त्यावर मात करण्याची आवश्यकता आहे. अहवालाच्या निमित्ताने या समस्येचे केलेले विवेचन.**

# "हवा प्रदूषणात" भारताची स्थिती चिंताजनकच !

हवेची गुणवत्ता मोजण्याची उपकरणे तयार करणाऱ्या स्वित्झर्लंडमधील आय क्यू एअर या कंपनीने 2024 या वर्षाचा जागतिक हवा प्रदूषण अहवाल नुकताच प्रसिद्ध केला. त्याचबरोबर इंग्लंड मधील 'अवर वर्ड इन डेटा' या ऑक्सफर्ड विद्यापीठाची संबंधित असलेल्या संस्थेनेही जागतिक हवा प्रदूषणा बाबतचा अहवाल प्रसिद्ध केला. आजच्या घडीला दरवर्षी काही लाख व्यक्ती, प्राणी व पक्षी हवेच्या प्रदूषणाने मृत्यू पावतात. जगामध्ये सर्वात प्रदूषित असलेला देश छाड हा आहे. त्यानंतर बांगलादेश व पाकिस्तान यांचा क्रमांक लागतो. भारतापाठोपाठ ताजिकिस्तान,नेपाळ, युगांडा,रेवांडा,बुरुंडी, नायजेरिया,व इंडोनेशिया या देशांचा उल्लेख सर्वाधिक हवेचे प्रदूषण असलेले देश म्हणून या अहवालात केला गेला आहे. हे सर्व विकसनशील देश आहेत.

भारतातील वायु प्रदूषण अहवालाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की आपली स्थिती खूप चिंताजनक होताना दिसत आहे. भारतात दरवर्षी सुमारे १५ लाख मृत्यू केवळ वायू प्रदूषणामुळे होतात. विविध उद्योगांमुळे हवेचे प्रदूषण सातत्याने वाढत असते. वाहतूक क्षेत्र,औद्योगिक क्षेत्र, कोळशापासून वीज निर्मिती, कृषी क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, देशभरातील कचरा, जहाज उद्योग, स्थानिक व आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक सेवा क्षेत्र व रसायने म्हणजे सॉल्व्हन्टस या प्रदूषणास कारणीभूत ठरत आहेत.

सॉल्व्हन्ट्समध्ये विविध रंग उत्पादन कंपन्या, स्वच्छतेसाठी वापरली जाणारी उत्पादने आणि केमिकल उत्पादन प्रकल्प यामुळे प्रदूषणात भर पडते. भारताची राजधानी दिल्ली हे शहर तर सर्वाधिक प्रदूषण निर्माण करणारे शहर आहे. अर्थात भारतातील सर्व शहरे व ग्रामीण भागांमध्येही प्रदूषणाचे प्रमाण जागतिक आरोग्य संस्थेने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वांपेक्षा जास्त आहे. एका अर्थाने भारतातील वायु प्रदूषण ही महत्त्वाची वाढती चिंता असून त्याचा प्रतिकूल परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर व त्यांच्या कल्याणकारी योजनांवर होताना दिसत आहे. गेल्या काही दशकातील वेगाने वाढणारे शहरीकरण, औद्योगीकरण व लोकसंख्या वाढीमुळे प्रदूषकांचे उत्सर्जन सातत्याने वाढत असून त्यामुळे हवेची गुणवत्ता सातत्याने खराब होताना दिसत आहे. बायोमास म्हणजे वनस्पती व प्राणी तसेच इतर जैविक पदार्थांचे रूपांतरण करून तयार केलेले इंधन व कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू असे जीवाश्म इंधन याचा मर्यादे बाहेर जाऊन केलेला वापर हे प्रदूषणाचे प्रमुख अन्य स्त्रोत आहेत.

अनेक वेळा थेट प्रदूषण किंवा पार्टिक्युलेट मॅटर (पीएम) म्हणजे कण प्रदूषण हवेत आढळणारे घन कण व द्रव बिंदू यांचे मिश्रण होय. त्याची

- वायु प्रदूषणामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांमध्ये श्वसनाच्या समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवत आहेत. त्यामध्ये खराब हवेच्या संपर्कात आल्याने दमा व क्रॉनिक ऑबस्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सी ओ पी डी) यासारख्या श्वसनाच्या समस्या उद्भवल्याची आकडेवारी मोठी आहे. त्याचप्रमाणे हृदय व रक्तवाहिन्या संदर्भातील रोगांमध्ये व्यापक प्रमाणावर वाढ झालेली असून नागरिकांच्या रक्तवाहिन्या संबंधी रोगांचा धोका गेल्या काही वर्षात वाढलेला आहे. हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूटने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार भारतात अकरा लाखापेक्षा जास्त अकाली मृत्यू होत असून त्याला वायू प्रदूषण कारणीभूत आहे. दिल्ली खालोखाल मुंबई, कोलकत्ता, बंगलोर व पुण्यासारख्या शहरांमध्येही वायू प्रदूषणाचे प्रमाण निकषांपेक्षा जास्त आहे. या वायू प्रदूषणाचा सर्वात मोठा धोका लहान मुले, वृद्ध नागरिक आणि कोणत्या ना कोणत्या कारणाने आजारी असलेले नागरिक वायू प्रदूषणाच्या प्रतिकूल परिणामांना जास्त संवेदनशील असल्याने त्यांच्यात मृत्यूचे प्रमाण वाढलेले दिसते. हवेचे प्रदूषण जास्त वाढण्यासाठी सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, ब्लॅक कार्बन, मिथेन, अमोनिया यांचा मोठा वाटा आहे. वाहनांचे उत्सर्जन,औद्योगिक प्रक्रिया, शेतकऱ्यांनी पिके जाळल्याने हवेची गुणवत्ता कमी होते. तसेच कोळशावर चालणारे वीज प्रकल्प, देशातील प्रत्येक शहरात व ग्रामीण भागात कचऱ्यावर केल्या जाणाऱ्या प्रक्रिया व बायोमास जाळल्यामुळे शहरी, निमग्रामीण भागात प्रदूषण होताना दिसत आहे. यामुळे मानवी आरोग्याला हानी पोहोचवणारे प्रदूषक उत्सर्जित होतात.





**विश्लेषण**
**प्रा. नंदकुमार काकिर्डे**
**राष्ट्रसंचार**

होणारी अपरिमित निर्मिती तसेच ओझोन निर्मिती यामुळे हवेचे प्रदूषण जास्त होताना दिसते. या अहवालातील आकडेवारीनुसार 2021 या वर्षात जगभरात ८० लाख मृत्यू केवळ हवेच्या प्रदूषणामुळे झालेले होते. एकंदरीत हवेच्या प्रदूषणाच्या बाबतीत आपल्याकडे उच्च स्तरावरून व्यापक प्रमाणावर उपाययोजना केल्या जात असूनही अनेक शहरांमध्ये प्रदूषणाचे प्रमाण मार्गदर्शक मापदंडापेक्षा जास्त आहे. पुणे व राजकोट यासारख्या शहरांमध्ये वाहने व बांधकाम प्रदूषणामुळे संपूर्ण शहर प्रदूषित झाल्याची भावना तेथे कोठेही प्रवास करताना आढळते. यामध्ये उपाययोजना म्हणून स्वच्छ ऊर्जा किंवा हरित अक्षय ऊर्जा निर्मिती व आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर महत्त्वाचे आहे. त्यात सौर, पवन ऊर्जा हे दोन महत्त्वाचे प्रकार आहेत. विद्युत वाहनांचा वाढता वापर त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्याचप्रमाणे कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक यंत्रणा वापरणे, ऊर्जा कार्यक्षम घर व उद्योग बनवणे व कचरा व्यवस्थापनामध्ये व्यापक सुधारणा करणे या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. जगातील अनेक देशांनी त्यांचे हवेचे प्रदूषण अशा उपाययोजनांद्वारे लक्षणीय रित्या कमी केलेले आहे.

वापरात नसताना दिवे बंद करणे, कमी वीज वापर करणे किंवा ऊर्जा बचत करणारे फ्लोरोसंट दिवे वापरणे, नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे त्यांचा पुनर्वापर वाढवणे, पर्यावरणासाठी प्लास्टिक उत्पादनांचा वापर हानिकारक ठरत असल्याने त्याचा वापर कमी करणे, जंगलातील आगी, धूम्रपानाच्या सवयीमुळे मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होते, हवेची गुणवत्ता बिघडते व आरोग्याला हानी पोहोचते. याबाबत समाजामध्ये आजही आवश्यक तेवढी जागरूकता निर्माण झालेली नाही. उलट पक्षी तरुण वर्ग व युवतींमध्ये धुम्रपानाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. वातानुकूलित यंत्रणांच्या ऐवजी पंख्यांचा वापर वाढवला पाहिजे. सण व लग्न समारंभामध्ये फटाक्यांचा होणारा वापर हा वायू प्रदूषणाच्या सर्वात मोठ्या कारणांपैकी एक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशात वनीकरणाची सर्वत्र अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

आपल्याकडे याबाबतचे कायदे केंद्र व राज्य शासनाने केलेले आहेत पण त्याची अंमलबजावणी मात्र गंभीरपणे केली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच हवेच्या प्रदूषणाबाबतीत भारताची स्थिती चिंताजनक होत असून आपण वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर आपल्या पुढील पिढ्यांचे भवितव्य आपणच धोक्यात आणत आहोत. यासाठी गांभीर्याने राष्ट्रीय मोहीम राबवली गेली पाहिजे.

---

# क्रिकेटचा 'देव'

**क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. नुकताच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५२ वा वाढदिवस पार पडला . आणि त्याच्या दमदार क्रिकेट च्या अदाकारीच्या क्रिकेट प्रेमींना आठवणी जाग्या झाल्या.**

**क्रीडा विश्व**
**- श्याम ठाणेदार**
**राष्ट्रसंचार**

मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली.

रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धावांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला.

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे. २००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले.

सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही. आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर , सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्याला गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य.



# बांगलादेश-पाकमध्ये भरपाईचा मुद्दा कळीचा



**बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये परराष्ट्र सचिवांच्या पातळीवरील बैठकीमध्ये बांगलादेशने ४३२ कोटी रुपयांच्या भरपाईची मागणी केली. हा माध्यमांमध्ये चर्चेचा मुद्दा झाला आहे. बांगलादेशमधील शेख हसीना यांचे सरकार गेल्यानंतर आलेल्या हंगामी सरकारच्या काळात पाकिस्तान आणि बांगलादेशचे संबंध सुरळीत होत असताना भरपाईचा मुद्दा कळीचा ठरला आहे.**

बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये परराष्ट्र सचिव स्तरावरील बैठका नियमितपणे होत होत्या; मात्र या वेळी तब्बल 15 वर्षांनी ही बैठक झाली. पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांनी बांगलादेशची राजधानी ढाका येथे बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन यांच्याशी औपचारिक बैठक घेतली. याशिवाय त्यांनी परराष्ट्र व्यवहार सल्लागार आणि मुख्य सल्लागार यांच्याही स्वतंत्र बैठका घेतल्या. उभय देशांमधील संबंधांचा नवा अध्याय सुरू झाल्यानंतर पहिल्या औपचारिक चर्चेत त्यांच्यातील न सोडवलेल्या ऐतिहासिक मुद्द्यांवर चर्चा झाली, तर परस्परसंबंध दृढ करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही चर्चा झाली. बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जसीमुद्दीन यांनी सांगितले की, बांगलादेशने स्वातंत्र्यपूर्व काळातील कृत्यांची भरपाई म्हणून पाकिस्तानकडून 4.32 अब्ज डॉलर्स म्हणजेच 36 हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. आमना बलोचसोबतची बैठक आटोपल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 1971 मध्ये दोन्ही देश एक असतानाच्या संयुक्त मालमत्तेतून पाकिस्तानने बांगलादेशला ही रक्कम दिली पाहिजे, असे बांगलादेशने या बैठकीमध्ये सांगितले.

यासोबतच ते म्हणाले की, 1970 मध्ये आलेल्या चक्रीवादळाच्या वेळी बांगलादेशला (तत्कालीन पूर्व पाकिस्तान) मदत करण्यासाठी मिळालेले 200 दशलक्ष डॉलर (सुमारे 2400 कोटी रुपये) पाकिस्तानने द्यावेत. दुसरीकडे, स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या आकडेवारीनुसार या महिन्याच्या चार तारखेला पाकिस्तानचा परकीय चलन साठा 15.75 अब्ज होता. याचा अर्थ बांगलादेशची मागणी पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानला आपल्या परकीय चलनाच्या गंगाजळीच्या एक चतुर्थांशपेक्षा जास्त रक्कम खर्च करावी लागेल.

याशिवाय बांगलादेशने 1971 च्या मुक्तिसंग्रामात पाकिस्तानने केलेल्या अत्याचाराबद्दल औपचारिक माफी मागण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित केला; मात्र पाकिस्तानने या मुद्द्यावर जाहीरपणे काहीही सांगितले नाही. जवळपास दीड दशकानंतर परराष्ट्र सचिव स्तरावर होणाऱ्या या बैठकीकडे अनेकांच्या नजरा खिळल्या होत्या; मात्र बांगलादेश आणि पाकिस्तानचे संबंध कधीच थेट राहिले नाहीत. अवामी लीग सरकारच्या गेल्या तीन टर्ममध्ये ते रसातळाला पोहोचले होते. गेल्या वर्षी 5 ऑगस्ट रोजी अवामी लीग सरकारला सत्तेतून काढून टाकल्यानंतर बांगलादेश आणि पाकिस्तानमधील राजनैतिक संबंधांचे नूतनीकरण करण्याचे प्रयत्न दिसून आले. ही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांनी ढाका गाठले होते.



बांगलादेशच्या स्वातंत्र्याचा इतिहास पूर्व पाकिस्तान काळापासून बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांशी अतूट जोडलेला आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्यानंतरही दोन्ही देशांच्या अंतर्गत राजकारणात आणि द्विपक्षीय मुत्सद्देगिरीमध्ये हा इतिहास वारंवार चर्चिला गेला आहे. परराष्ट्र सचिव स्तरावरील ताज्या बैठकीत बांगलादेशने उभय देशांमधील परस्परसंबंध अधिक दृढ करण्यासाठी न सुटलेले प्रश्न सोडवण्याची मागणी केली आहे.

यावेळी बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन म्हणाले की बैठकीदरम्यान अविभक्त मालमत्तेचे समान विभाजन, येथे

**विश्वभ्रमण**
प्रा. जयसिंग यादव
राष्ट्रसंचार

अडकलेल्या पाकिस्तानींचे प्रत्यार्पण, 1970 च्या चक्रीवादळामुळे प्रभावित झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी परदेशातून आलेल्या मदतीचे पैसे देणे आणि 1971 मध्ये तत्कालीन पाकिस्तानी सैन्याने केलेल्या सामूहिक हत्याकांडासाठी जाहीर माफी या मुद्द्यांवर चर्चा झाली. मोहम्मद जशीमुद्दीन पुढे म्हणाले, मी परराष्ट्र सचिवांसोबतच्या बैठकीत या आकडेवारीचा उल्लेख केला. बांगलादेशमध्ये अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांना पर्याय दिल्यास काहींना बांगलादेशमध्ये राहायचे आहे तर काहींना पाकिस्तानमध्ये परतायचे आहे. अशा प्रकारे देशात अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांची संख्या सुमारे 3.25 लाख आहे. जशीमुद्दीन यांच्या म्हणण्यानुसार, या न सुटलेल्या मुद्द्यांवर चर्चा सुरू ठेवण्याचे आश्वासन पाकिस्तानने दिले आहे. बांगलादेश आता भारताऐवजी पाकिस्तानकडे झुकत आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले की, सद्यस्थितीमध्ये पाकिस्तानसोबतच्या बांगलादेशच्या संबंधांचा पाया मजबूत करण्यासाठी न सुटलेले प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

पाकिस्तान आणि बांगलादेशदरम्यान थेट विमानसेवा सुरू झाल्याचा उल्लेख करताना ते म्हणाले की, एका देशातील लोक दुसऱ्या देशात गेले तर त्याला सबमिशन म्हणता येणार नाही. एकमेकांचा आदर आणि परस्परहीत हाच पाकिस्तानसोबतच्या आमच्या संबंधांचा आधार आहे. आम्ही यामध्ये आमचे फायदेशीर पैलू पहात आहोत. आपली भूमिका स्पष्ट करणे आणि त्यासोबत पुढे जाणे हे मुत्सद्देगिरीचे काम आहे. या मुद्द्यांवर भविष्यात चर्चा सुरू ठेवू इच्छित असल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी व्यापाराच्या शक्यतांचा शोध घेण्यासाठी पाकिस्तानशी संबंध अधिक दृढ करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. युनूस यांनी 'नॅशनल गेस्ट हाऊस'मध्ये पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान हे आवाहन केले. युनूस म्हणाले, काही अडथळे नक्कीच आहेत; पण आम्हाला त्यावर मात करून पुढे जाण्याचे मार्ग शोधावे लागतील. दुसरीकडे आमना बलोच म्हणाल्या, बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील व्यवहारांच्या शक्यतांचा फायदा घेण्यासाठी मार्ग शोधावे लागतील. आमच्याकडे खूप मोठी प्रादेशिक बाजारपेठ आहे. आम्ही त्याचा पुरेपूर वापर केला पाहिजे. आम्ही प्रत्येक वेळी ही संधी सोडू शकत नाही. बांगलादेश आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिवांची बैठक ढाका येथे झाली. ही बैठक 15 वर्षांनी झाली. बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या माध्यमांमध्ये या भेटीबाबत बरेच काही बोलले जात आहे. बहुतांश बांगलादेशी वृत्तपत्रांनी याबाबतच्या बातम्यांना प्रसिध्दी दिली आहे. पाकिस्तानमधील प्रमुख वृत्तपत्र असलेल्या 'द डेली स्टार'ने लिहिले आहे की 1971 पूर्वीची पाकिस्तानची भूमिका बांगलादेशींसाठी वेदनादायक होती. दोन्ही देशांमध्ये वास्तविक आणि प्रभावी नातेसंबंध निर्माण करण्यात हा अडथळा आहे. पाकिस्तानी सैन्याने मारलेले नागरिक आणि बांगलादेशच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात कराव्या लागलेल्या दडपशाही आणि क्रूरतेचा सामना ही ऐतिहासिक नोंद आहे. बांगलादेशसाठी औपचारिक माफी किंवा नुकसानभरपाई हा बदला नाही, तर ऐतिहासिक शोकांतिका आहे, हे मान्य करून खऱ्या सलोख्याच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. यात गुंतागुंत आहे आणि त्यासाठी विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत. या वृत्तपत्राने पाकिस्तानने माफी मागावी या मागणीचे समर्थन केले असून अशा समस्या असतानाही बांगलादेशाने पाकिस्तानसोबतचे संबंध सुधारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे म्हटले आहे.

बांगलादेशच्या 'ढाका ट्रिब्यून'ने लिहिले आहे की, पाकिस्तान आणि बांगलादेशदरम्यान संपर्क प्रस्थापित करण्याला प्राधान्य देऊन हे सिद्ध झाले आहे की दोन्ही देशांना खरेच संबंध सुधारायचे आहेत. बांगलादेशमधील कराची आणि चितगावदरम्यान थेट शिपिंग लाइन आणि हवाई संपर्क स्थापित करण्यावर भर देणे हा एक चांगला उपक्रम आहे. जवळपास 15 वर्षांनंतर दोन्ही देशांमधील परराष्ट्र सचिव स्तरावरील बैठक संबंध रुळावर आणण्यासाठी दोन्ही देशांची वचनबद्धता दर्शवते. 'डेली सन'च्या वृत्तानुसार, बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांच्या भेटीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात काश्मीरचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. यामध्ये पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावांच्या आधारे काश्मीर प्रश्न सोडवण्याबाबत भाष्य केले. गाझामधील इस्रायलच्या हल्ल्याचा दोन्ही देशांनी निषेध केला. पॅलेस्टिनी प्रदेशातील मानवी हक्कांच्या उल्लंघनाबद्दल त्यांनी इस्रायलचा निषेध केला. 2026 मध्ये इस्लामाबादमध्ये दोन्ही देशांच्या परराष्ट्र सचिवांची बैठक होणार असल्याचे वृत्त या वृत्तपत्राने दिले आहे. बांगलादेशने 1971 च्या मुक्तिसंग्रामात पाकिस्तानने केलेल्या अत्याचाराबद्दल औपचारिक माफी मागण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित केला गेला; मात्र पाकिस्तानने या मुद्द्यावर जाहीरपणे काहीही सांगितले नाही.

# 'वेव्हज २०२५'

**प्रासंगिक**
वर्षा फडके-आंधळे, उपसंचालक (वृत्त)
राष्ट्रसंचार

## माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ

देशातील माध्यम व मनोरंजन (Media & Entertainment) क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या 'WAVES 2025' या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ मे रोजी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

१ ते ४ मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

**महाराष्ट्र – 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी'कडे वाटचाल :** बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'WAVES 2025' च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील १०० पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

**माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला दिशा देणारा मंच :** 'WAVES 2025' ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन (M&E) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

परिषदेतील एक विशेष आकर्षण 'WAVES बाजार' : 'WAVES बाजार' – एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.




### परिषदेत काय असणार?

- १. परिषद सत्रे – जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील.
- २. मीडिया मार्केटप्लेस – भारताच्या माध्यम व मनोरंजन (M&E) क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन.
- ३. तंत्रज्ञान प्रदर्शन – नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो.
- ४. सांस्कृतिक कार्यक्रम – भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम.
- 'WAVES 2025' : उद्योगाला बळकटी देणारी संजीवनी'
- माध्यम आणि मनोरंजन उद्योग सध्या मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. 'WAVES 2025' ही परिषद नव्या कल्पनांना दिशा देऊन, भारताला जागतिक M&E सुपरपॉवर बनवण्याचा पाया रचणार आहे. सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागीदारी यांचा मेळ घालून, भारताला 'ग्लोबल कंटेंट डेस्टिनेशन' बनवण्याचे स्वप्न या मंचाद्वारे प्रत्यक्षात उतरणार आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारी ही परिषद भारताच्या सृजनशील भविष्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरणार आहे.

# साडेतीन मुहूर्तांपैकी एक : अक्षय्य तृतीया


**अक्षय्य तृतीया हा हिंदू धर्मात साजरा केला जाणारा अतिशय पवित्र सण आहे. सर्व हिंदू मोठ्या उत्साहाने साजरा करतात. हिंदू धर्मासोबतच अक्षय्य तृतीयेचा दिवस जैन धर्मासाठीही महत्त्वाचा आहे. हिंदू पंचांगानुसार वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीयेला अक्षय्य तृतीया हा सण साजरा केला जातो. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी शुभ कामाची सुरुवात, पूजा-आराधना, जप-तप, दान केल्याने अक्षय्य पुण्याची प्राप्ती होते, असे म्हटले जाते. तसेच या दिवशी सोने-चांदी, वाहन, प्रॉपर्टी खरेदी करणेदेखील शुभ मानले जाते.**



**श्रीकृष्णाने** युधिष्ठिराला असे सांगितले होते की, या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही. म्हणून ही तिथी अक्षय्य मानली गेली आहे. देव आणि पूर्वज यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय्य (अविनाशी) होते. जो मनुष्य या दिवशी गंगा स्नान करेल, तो सर्व पापांतून मुक्त होतो, अशी मान्यता आहे. या दिवशी विष्णूंचा सहावा अवतार परशुराम यांची पूजा करून त्यांना अर्घ्य दिले जाते. वैशाख महिना हा अत्यंत उष्ण असतो. त्यामुळे अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने मातीचे माठ किंवा रांजण दान करावे. मातीच्या माठातील पाणी आरोग्यासाठी उत्तम राहते. तसेच फळांचा राजा आंबा प्रामुख्याने अक्षय्य तृतीयेपासून खाण्यास सुरुवात होते. अक्षय्य तृतीयेला केलेले नामस्मरण किंवा मंत्र पठण अखंड टिकून राहते, अशा मान्यता आहे. याशिवाय अक्षय्य तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा देवी प्रकट झाली होती, असेही सांगितले जाते.

## अक्षय्य तृतीयेला काय खरेदी करावी ?

- अक्षय्य तृतीया हा नवीन सुरुवातीसाठी शुभ दिवस असला तरी, तुम्ही स्वतःसाठी तसेच तुमच्या प्रियजनांसाठी नवीन वस्तू खरेदी करण्याचा विचार करू शकता.
- तुमच्या खरेदीचे मार्गदर्शन करण्यासाठी येथे एक निवडलेली खरेदी यादी आहे:
- १. घरगुती उपकरणे: जर तुमची जुनी उपकरणे खराब झाली असतील किंवा जुनी झाली असतील, तर अक्षय्य तृतीया हा तुमच्या घराचे आणि दैनंदिन जीवनाचे सौंदर्य वाढविण्यासाठी नवीन उपकरणे खरेदी करण्यासाठी एक चांगला काळ असू शकतो. रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन किंवा एअर कंडिशनर सारख्या नवीन घरगुती उपकरणे खरेदी करा आणि तुमच्या घरात सुविधा आणा.
- २. सेकंड-हँड कार खरेदी करा: जर तुम्ही तुमच्या स्वप्नातील कार खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर आता वेळ आली आहे! अक्षय्य तृतीया हा एक शुभ दिवस आहे आणि अनेकांचा असा विश्वास आहे की ही तुमची स्वतःची कार खरेदी करण्यासाठी सर्वोत्तम वेळ आहे. तुम्ही कार खरेदी करण्याचा विचार करत असताना, प्री-ओन्ड कार निवडणे तुमच्यासाठी एक हुशार पर्याय आहे.
- ३. इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स: जर तुम्हाला नवीन लॅपटॉप, फोन किंवा इतर कोणत्याही आवश्यक इलेक्ट्रॉनिक उपकरणाची आवश्यकता असेल, तर अक्षय्य तृतीयेच्या विक्रीत आकर्षक डील मिळू शकतात. या दिवशी नवीन इलेक्ट्रॉनिक गॅझेट्समध्ये गुंतवणूक केल्याने तुमच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक प्रयत्नांमध्ये यश मिळू शकते.
- ४. मालमत्ता: अनेक वास्तु तज्ज्ञांच्या मते, अक्षय्य तृतीया हा रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सर्वोत्तम दिवसांपैकी एक मानला जातो. तो मालकाला दीर्घकालीन समृद्धी आणि सौभाग्य आणतो. मालमत्ता खरेदी करण्यासाठी आणि दीर्घकालीन लाभ मिळविण्यासाठी या दिवशी शुभ मुहूर्त निवडता येतो.
- ५. चांदीची भांडी: अक्षय्य तृतीयेच्या दिवशी तुम्ही चांदीची भांडी, कलाकृती आणि सजावटीच्या वस्तू खरेदी करू शकता. वास्तुशास्त्रानुसार, चांदीची भांडी सकारात्मकता आणि समृद्धी आकर्षित करतात.



**सण-उत्सव**
सारिका महाले रोजेकर
राष्ट्रसंचार



- अक्षय्य तृतीयेची तिथी २९ एप्रिल रोजी संध्याकाळी ५ वाजून ३१ मिनिटांनी सुरू होईल आणि ३० एप्रिल रोजी दुपारी २ वाजून १२ मिनिटांनी समाप्त होईल. उदय तिथीनुसार ३० एप्रिल (बुधवार) रोजी अक्षय्य तृतीयेचा सण साजरा केला जाईल.



## जागतिक मलेरिया दिवस' निमित्त जनजागृती उपक्रम

**पुणे :** जागतिक मलेरिया दिनानिमित्त, जेठेज अकॅडमीच्या धनकवडी शाखेत आरोग्य जागरूकता आणि स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणारा विशेष जनजागृती उपक्रम उत्साहात पार पडला.कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मलेरियाविषयी जागरूकता निर्माण करणे, स्वच्छतेच्या सवयी बळकट करणे आणि "स्वच्छता व प्रतिबंध हाच सुरक्षिततेचा मार्ग" हा संदेश रुजवणे, असा होता. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. आनंद जेठे (संस्थापक व संचालक, जेठेज अकॅडमी) म्हणाले, "मलेरिया हा प्रतिबंध करता येण्याजोगा आजार असून, योग्य माहिती, स्वच्छतेची काळजी आणि वेळेवर खबरदारी घेतल्यास आपण त्यावर नियंत्रण मिळवू शकतो. प्रा. दिपाली जेठे (संचालिका, जेठेज अकॅडमी) यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले, "मलेरियावर विजय मिळवायचा असेल, तर औषधांपेक्षा आधी आपली जीवनशैली सुधारावी लागेल. कार्यक्रमात माजी सैनिक आणि सह-संस्थापक दिलीप सुर्यवंशी यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, "शिस्त आणि जागरूकता या दोन्ही गोष्टींनीच आरोग्यपूर्ण जीवनशैली घडते.



## ढोल ताशा पथकांचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन पुण्यात

**पुणे :** महाराष्ट्रातील सर्व ढोल ताशा पथकांचे एकत्रीकरण करण्यासोबतच तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार काही प्रश्न आहेत ते सोडवता येतील का, याचा विचार करण्याकरिता आणि पथकांवरील टीकेवर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्रातील ढोल ताशा पथकांच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे ढोल ताशा महासंघ महाराष्ट्र च्या वतीने पुण्यात आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दिनांक ४ मे रोजी सकाळी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत बीएमसीसी कॉलेज ऑफ कॉमर्स येथील टाटा हॉल मध्ये हे अधिवेशन होणार आहे, अशी माहिती महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला अनुप साठ्ये, विलास शिगवण, अॅड. शिरीष थिटे, ओंकार कलढोणकर, अमर भालेराव, अक्षय बलकवडे, प्रकाश राऊत आदी उपस्थित होते. अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे हस्ते होणार आहे. तसेच समारोप केंद्रीय राज्यमंत्री खासदार मुरलीधर मोहोळ यांचे उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात पुणे शहरातील अनेक गणेश मंडळाचे अध्यक्ष आणि प्रतिनिधी देखील उपस्थित राहणार आहेत. ढोल ताशा वादनाचा प्रचार-प्रसार उत्तमपणे कसा होईल, यावर विचार विनिमय यावेळी करण्यात येणार आहे. मडी, संबळ, नगारा, ताशा, जेंबे या वाद्यांचा तालचक्र हा कार्यक्रम सादर होणार आहे. तसेच ढोल ताशा पथकातील वादकांचे छायाचित्र प्रदर्शन आणि स्पर्धा देखील या वेळी आयोजित केले आहे. अशी विविध सत्रांची मांडणी या अधिवेशनात केली आहे. पथकांवरील टीकेवर चर्चा करण्यासाठी आप की अदालत या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. नागपूर, नाशिक, मुंबई , ठाणे , पिंपरी चिंचवड, सांगली, कोल्हापूर, सोलापूर यांसह अनेक ठिकाणच्या पथकातील दोन प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या बरोबरच गोवा, बंगळुरू , इंदूर येथील पथके देखील सहभागी होतील.

## बिल न भरल्याने मृतदेह आठ तास अडवून ठेवला

**पुणे :** दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाची घटना ताजी असतानाच आता आणखी एक प्रकार समोर आला आहे. नातेवाईकांनी बिल न अदा केल्याने मृतदेह अडवून ठेवण्याच्या घटना आजवर अनेक रुग्णालयांत घडल्या आहेत; मात्र बिल भरण्यास तयार असूनही केवळ बिलिंग करण्यासाठी कर्मचारी नसल्याने आठ तास मृतदेह अडवून ठेवल्याची धक्कादायक घटना पूना हॉस्पिटलमध्ये घडली. शुक्रवार पेठेतील महेश पाठक यांच्यावर पुना हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर नातेवाईकांनी बिल भरून मृतदेह ताब्यात घेण्यासाठी हॉस्पिटलकडे चौकशी केली असता तुमच्या रुग्णावर महापालिकेच्या शहरी गरीब योजनेअंतर्गत उपचार सुरू होते. त्यामुळे तुम्हाला सकाळी साडेआठ वाजता बिल भरून मृतदेह नेता येईल, असे हॉस्पिटलकडून सांगण्यात आले.

## शताब्दी बुद्धविहार येथे श्रामणेर शिबिराचे आयोजन

**पुणे :** रेंजहिल्स रहिवासी सभा व रेंजहिल्स रहिवासी महिला सभा, शताब्दी बुद्धविहार, रेंजहिल्स, पुणे, या संस्थांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे बौद्ध धम्मानुसार अभिप्रेत आणि अत्यावश्यक असलेले श्रामणेर शिबीर, श्रद्धावान उपासकांच्या सक्रिय सहभागा मधून आयोजित करण्यात येते. यंदाचे १५ दिवसीय निवासी श्रामणेर शिबीर ४ मे ते १८ मे दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. आदरणीय भन्ते नागघोष, महाथेरो, पुणे, आदरणीय भन्ते संघदुता, अरुणाचल प्रदेश, आदरणीय भन्ते धम्मानंद, तक्षशिला विहार, पुणे हा भिक्खू संघ मार्गदर्शक असणार आहे. तसेच आधी झालेल्या श्रामणेर शिबिरामध्ये अभ्यास वर्ग घेणारे तज्ञ मार्गदर्शक / शिक्षक / अभ्यासक यंदाही विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत, यंदाच्या शिबिरांची सुरुवात ४ मे रोजी सायंकाळी ५.३० वा, शताब्दी बुद्ध विहार, रेजहिल्स येथे प्रा. डॉ. वसंत चाबुकस्वार, प्रिन्सिपल नवरोसजी वाडिया कॉलेज, पुणे. प्रा. डॉ. विजय गायकवाड, व्हाईस प्रिन्सिपल मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स कॉमर्स, पुणे.यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

## गौरव स्त्रीच्या सौदर्याचा आणि सामर्थ्याचा...!



**पुणे** कलावर्धिनी डान्स कंपनी आणि डॉ. उषा आर.के. यांच्या संयुक्त विद्यमाने 'वनीता' हे आगळंवेगळं शास्त्रीय नृत्य सादरीकरण 'द बॉक्स', एरंडवणे येथे पार पडले.सादर केलेल्या या नृत्यातून भारतीय स्त्रीचे गुणसौंदर्य उजळले आणि उपस्थित भारावून गेले.

## नृत्यातून उजळले भारतीय स्त्रीचे गुणसौंदर्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कलावर्धिनी डान्स कंपनी आणि डॉ. उषा आर.के. यांच्या संयुक्त विद्यमाने 'वनीता' हे आगळंवेगळं शास्त्रीय नृत्य सादरीकरण पार पडले. सादर केलेल्या या नृत्यातून भारतीय स्त्रीचे गुणसौंदर्य उजळले आणि उपस्थित भारावून गेले. या कार्यक्रमास ज्येष्ठ नृत्य गुरू डॉ. सुचेता भिडे -चापेकर, स्मिता महाजन, डॉ.शारंगधर साठे आणि अरुंधती पटवर्धन उपस्थित होत्या. सागरिका पटवर्धन यांनी प्रास्ताविक केले.

विवेक, विनय, वीरता आणि विचारक या भारतीय परंपरेतील स्त्रीगुणांवर आधारित स्त्रीत्वाच्या सौंदर्य, सामर्थ्याचा गौरव झाला. श्रेयसी गोपीनाथ (महा सरस्वती), नंदिनी गणेशन (राधा), नविया नटराजन (द्रौपदी), कीर्तना रवि (गार्गी) यांच्या सादरीकरणांनी लक्ष वेधले. कार्यक्रमाची सुरुवात सायली काणे यांच्या 'श्रद्धा अर्पण' ने झाली. विद्या हरिकृष्णा (स्वर), कलिश्वरन पिल्लै (नत्तुवांगम), दक्षिणामूर्ती पिल्लै (मृदंगम) आणि रवि ए (व्हायोलिन) यांचे साथसंगीत दिले. मुद्रा सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स यांच्या पाठिंब्याने 'वनीता' ही नृत्यप्रस्तुती पारंपरिक भारतीय सौंदर्यशास्त्र, मूल्यांच्या दृष्टिकोनातून स्त्रीत्वाचा उत्सव ठरली.

# डोंगरमाथा आणि डोंगर उतारावरील बांधकामांचे होणार सर्वेक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात डोंगर माथ्यावर अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकामे वाढत असल्याने दिसून येत आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत असलेल्या जैववैविधता उद्यान (बीडीपी) तसेच डोंगरमाथा आणि डोंगर उतार यावर झालेली बांधकामे नक्की किती, याचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या माजी सनदी अधिकारी रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. डोंगरमाथा, डोंगर उतार तसेच बीडीपीच्या आरक्षाबाबत सरकारकडे आलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करून झा यांच्या नेतृत्वाखालील समिती अभिप्राय देणार आहे. समितीला एका महिन्याची मुदत दिली आहे. समितीचे सदस्य सचिवपदाची जबाबदारी महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्याकडे असून, त्यांच्या माध्यमातून समितीची बैठक घेतली जात आहे.

महापालिका आयुक्त, पीएमआरडीएचे आयुक्त, नगररचना उपसंचालक असे या समितीचे सदस्य आहेत. या बैठकीत शहराच्या, तसेच पीएमआरडीएच्या हद्दीत असलेल्या बीडीपीच्या आरक्षणामध्ये तसेच डोंगरमाथा, उतार यावर किती बांधकामे झाली आहेत, त्यांची सद्यःस्थिती काय आहे, याची पाहणी करण्यासाठी या भागांतील बांधकामांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. ड्रोनच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येईल, असे महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

आमदार, खासदार यांच्यासह वास्तुविशारदांची मते जाणून घेणार समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश नसल्याची तक्रार केली जात होती. त्यामुळे महापालिका आणि पीएमआरडीए हद्दीतील खासदार आणि आमदार यांची मते जाणून घेतली जाणार आहेत. काही वास्तुविशारदांची मतेदेखील घेण्यात येणार असून, त्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच, या आरक्षणाबाबत न्यायालयात काही तक्रारी, प्रकरणे दाखल आहेत. याची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय या समितीच्या बैठकीत घेण्यात आला.



# पीएमपीच्या ताफ्यात दीड हजार बसेस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएमपीच्या ताफ्यात लवकरच दीड हजार बसेस दाखल होणार आहेत. मेट्रो मार्गांचा विस्तार, बाह्यवर्तुळ मार्ग, बससेवांचा विस्तार आदी माध्यमांतून येथील वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासह नागरिकांना उत्तम सेवा देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

पीएमपीएमएलच्या चऱ्होली बु. येथील ई-बस डेपोचे, तसेच माण ई-बस डेपोचे (ऑनलाइन पद्धतीने) उद्घाटन व लोकार्पण उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार बापूसाहेब पठारे, पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पीएमपीएमएलच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ-मुंडे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, पीएमपीएमएलचे सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर उपस्थित होते.

माण डेपोला ३० ई-बसेस, चऱ्होली डेपोला ६० ई-बसेस ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट (जीसीसी) तत्त्वावर उपलब्ध होणार असल्याचे सांगत अजित पवार म्हणाले, पीएमपीला बसेस घेण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) २३० कोटी रुपये रक्कम दिली असून, त्यातून लवकरात लवकर ५०० सीएनजी बसेस घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच पुणे महापालिकेला १५० कोटी आणि पिंपरी- चिंचवड महापालिकेने १०० कोटी रुपये द्यावेत. त्यातून अजून ५०० सीएनजी बसेस घेण्यात येतील. त्याव्यतिरिक्त अजून ५०० इलेक्ट्रिक बसेस जीसीसी तत्त्वावर घेण्यात येणार आहेत.

दीपा मुधोळ- मुंडे म्हणाल्या, महामंडळाच्या सेवेत मोठ्या प्रमाणात बसेस याव्यात, यासाठी नियोजन सुरू आहे. आपली पीएमपीएमएल मोबाइल ॲपला नागरिकांचा चांगला प्रतिसाद आहे.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून स्मार्ट बस सिस्टीम ही कंडक्टर विरहीत सेवा सुरू करण्याचा मानस ठेवला असून, सुरक्षितता आणि अपघातविरहीत सेवा हे ध्येय ठेवून पीएमपीएमएल काम करत आहे.

# दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ ज्ञान प्रबोधिनीमध्ये सभा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पहलगाम येथील क्रूर दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, ज्ञान प्रबोधिनीमध्ये गुरुवार,दि.२४ एप्रिल रोजी सायंकाळी निषेध सभा झाली. सभेमध्ये ४०० हून अधिक नागरिक ज्ञान प्रबोधिनीतील उपासना सभागृहात एकत्र जमले.सर्वांनी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली,काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केला आणि भारताच्या नकाशावर आपले विचार लिहून राष्ट्रीय एकात्मतेशी आपले नाते दृढ केले.ज्ञान प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सचिन गाडगीळ,सहकार्यवाह आशुतोष बारमुख तसेच स्वप्नील इंदापूरकर यांची भाषणे झाली.

सभेची सुरुवात 'भारत के जवानो' या जोशपूर्ण गीताने झाली. त्यानंतर प्रबोधिनीचे कार्यकर्ते स्वप्नील इंदापूरकर यांनी या हल्ल्यामागील विचारसरणीवर कठोर शब्दांत टीका केली. "हल्ला करणारे संपले तरी विचार संपत नाही, हिंसक आणि असंस्कृत विचारांचा पूर्ण नाश आवश्यक आहे" असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सचिन गाडगीळ यांनी काश्मीरमध्ये गेल्या ३० वर्षांपासून सुरू असलेल्या प्रबोधिनीच्या कार्याचा आढावा घेतला. '१९९४ च्या काश्मीरपासून ते आज निषेध करणाऱ्या स्थानिक मुस्लिम मित्रांपर्यंतचा प्रवास देशाच्या एकात्मतेचे उदाहरण आहे',' असे त्यांनी नमूद केले.

सभेचा समारोप करताना ज्ञान प्रबोधिनीचे सहकार्यवाह व सीमावर्ती संपर्क सचिव आशुतोष बारमुख म्हणाले, "अतिरेकी दोन राष्ट्रांची भाषा बोलतात, पण भारत एक अखंड राष्ट्र आहे.

राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने देशविघातक कृत्यांना सामूहिक विरोध करणे, शत्रूबोध असणे, 'आम्हास काय त्याचे' या विचारातून बाहेर येणे, शिवछत्रपतींचा वारसा चालवण्याचा प्रयत्न करणे ही सामूहिक प्रतिज्ञा सर्वांनी केली.सभा राष्ट्रगीताने समाप्त झाली.



# नाट्यगृहासाठी 'लाडक्या बहिणी'नी दादांकडे तगादा लावावा- मकरंद अनासपुरे

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद तळेगाव शाखेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** तळेगावकरांची नाट्यगृहाची मागणी पूर्ण होणे अवघड नाही. 'तळेगाव दाभाडेमधील लाडक्या बहिणींनाच नाट्यगृह हवं आहे', असे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांना सांगा म्हणजे लवकर निधी मिळेल, अशी मिश्किल टिपणी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केली. दरम्यान, जगभरातील दहशतवाद्यांच्या धर्माविषयी कल्पना काढून टाकून त्यांचा ब्रेनवॉश करण्याचे ईश्वराला साकडे घालतो, असेही अनासपुरे म्हणाले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे तळेगाव दाभाडे शाखेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिनेते अनासपुरे बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात नांदी, गणेश वंदना व मैत्र यमन रागात सादर झालेल्या सतार वादनाने झाली. दरम्यान, यंदाचा कलागौरव पुरस्कार हास्य जत्रा फेम अभिनेत्री नम्रता संभेराव व प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक व लेखक प्रसाद खांडेकर यांना, प्रसिद्ध सतार वादक विदुर महाजन यांना जीवन गौरव पुरस्काराने, तर प्रा. नितीन फाकटकर यांना गौरव पुरस्काराने सन्मानित केले.

यावेळी आमदार सुनील शेळके, प्रगतशील शेतकरी सुनील जाधव, नंदकुमार वाळंज, नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे, कार्याध्यक्ष गणेश काकडे, प्रमुख कार्यवाह विश्वास देशपांडे, सचिव संजय वाडेकर, संचालक सुरेश दाभाडे, विलास काळोखे, तेजस धोत्रे, नंदकुमार वाळुंज, राजेश बारणे, संजय चव्हाण, सुनील जाधव, गणेश खांडगे, कृष्णा कारके, हरिश्चंद्र गडसिंग, दादासाहेब उऱ्हे, चंद्रकांत भिडे आदी उपस्थित होते.

> कामात नेहमी वैविध्य असावे, याकडे कटाक्ष असतो. मी विनोदी भूमिका करीत असले, तरी मी जास्त भावनिक आहे. आयुष्यभर रसिकांचे मनोरंजन करीत राहील, असा विश्वास देते.
>
> — **नम्रता संभेराव** ज्येष्ठ अभिनेत्री



आमदार सुनील शेळके म्हणाले, की तळेगाव दाभाडे शहरात नाट्यगृहासाठी आपण आग्रही असून, आपल्या कार्यकाळात नाट्यगृहाचे काम तडीस नेण्याचा संकल्प आहे. त्यासाठी अर्थमंत्री अजित पवार यांनी निधी देण्याचा शब्द दिला आहे.

सुरेश धोत्रे यांनी प्रास्ताविक केले;सूत्रसंचालन आकाश थिटे यांनी, तर आभार नितीन शहा यांनी मानले.

डॉ मिलिंद निकम, संग्राम जगताप, अमित बांदल, तानाजी मराठे, अशोक जाधव, नयना डोळस, दिपाली पाटील, युगंधर बढे, मीनल रणदिवे, सुमेध सोनवणे, राजेश बारवे, संजय मेहता, भूषण गायकवाड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



माहेर संस्थेच्या वतीने जळीतग्रस्त कुटुंबियांना कपडे वाटप करताना पदाधिकारी.

## चंदननगर मधील जळीत ग्रस्थांसाठी धावले माहेर

**शिक्रापूर :** चंदननगर येथे दोन दिवसांपूर्वी सिलेंडरमुळे लागलेल्या आगीमध्ये तब्बल पन्नासहून अधिक झोपड्या जळून खाक झालेल्या असताना सदर जळीत ग्रस्थांच्या मदतीसाठी अनाथांसह गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेल्या माहेर संस्थेच्या पुढाकाराने माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन यांच्या मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी सर्व जळीत ग्रस्त कुटुंबियांना कपडे वाटप करण्यात आले, यावेळी माहेर संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते रमेश चौधरी, मीना भागवत, निकोलावा डिसोजा यांसह आदींनी थेट घटनास्थळी जाऊन कुटुंबियांना कपडे वाटप केले, यावेळी अनेक गरजूंना वेळेवर कपडे मिळाल्याने नागरिकांनी देखील समाधान व्यक्त करत माहेर संस्थेचे आभार मानले आहे.

## राजगुरुनगर शहरात हिवताप दिनानिमित्त जनजागृती

**खेड :** राजगुरुनगर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शुक्रवारी ( दि २५ ) जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. चला हिवतापाला संपवुया,पुन्हा योगदान द्या,पुनर्विचार करा,सक्रिय व्हा असे या वर्षीचे हिवताप दिनाचे घोषवाक्य घेवुन विविध ठिकाणी रॅली,सभा घेऊन जनजागृती करण्यात आली. हिवतापामध्ये थंडी वाजुन ताप येणे,घाम येणे ,तीव्र डोकेदुखी ,उलट्या ही लक्षणे दिसुन येतात. ॲनोफिलिस डासाची मादी चावल्याने हा आजार होतो. या डासांची उत्पत्ती-स्वच्छ पाण्याची डबकी,तळे,कुंड्या,नाले,भात शेती यांमधे होते. आरोग्य विभागाकडुन प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये -दूषित भांडी मोकळी करणे,गप्पी मासे सोडणे,नाले,गटारे वाहती करणे, मच्छरदाणीचा वापर यांसाठी जनजागृती केली.

## विजया बारभाई यांचे निधन

**जेजुरी :** येथील श्री खंडोबा देवाचे पुजारी,ग्रामदैवत जानाई देवी मंदिर जीर्णोद्धार समितीचे पदाधिकारी



आप्पासाहेब बारभाई यांच्या पत्नी विजया बारभाई वय 72 यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

जेजुरी येथील इंडियाना कंपनीचे व्यवस्थापक शेखर बारभाई,तसेच सामाजिक कार्यकर्ते विलास बारभाई,निलेश बारभाई यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या मागे पती,तीन मुले,सूना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी वेळी श्री मार्तंड देवसंस्थान,जेजुरी नगरपरिषद, जांनाई देवी मंदिर ट्रस्ट,विविध पक्ष व ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.


## सणसवाडीत आढळला अनोळखी इसमाचा कुझलेला मृतदेह

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील रामदास गोसावी हे आनंदनगर येथील चारीजवळ गेले असता त्यांना एका इसमाचा मृतदेह निदर्शनास आला, दरम्यान याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पोलीस पाटील दत्तात्रय माने, पोलीस शिपाई अंकुश चौधरी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असता एक ३५ ते ४० वयोगटातील अनोळखी इसम, अंगात काळपट शर्ट व निळी प्यांट तसेच चेहरा ओळखून येत नसल्याचे दिसून आला, दरम्यान पोलिसांनी पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदन साठी पाठवून दिला, याबाबत पोलीस पाटील दत्तात्रय ज्ञानेश्वर माने वय ४१ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वेरणनाथ मुत्तनवार हे करत आहे.

## पिंपळे जगताप मध्ये पानटपरी चालकावर खुनी हल्ला

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप ता. शिरुर येथील एका पानटपरी चालकाने पानाचे पैसे मागितल्याने उपसरपंच महिलेच्या पतीने पानटपरी चालकाला दमदाटी करत दहशत निर्माण करुन हप्ता मागत हप्ता न दिल्याने पानटपरी चालकाच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर स्टेशन येथे पिंपळे जगतापच्या माजी उपसरपंच रेश्मा कुसेकर यांचे पती नितीन उर्फ आण्णा राजेंद्र कुसेकर, सचिन राजेंद्र कुसेकर, रवींद्र उर्फ पांडा राजाराम जगताप यांसह एक अनोळखी युवकावर खुनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे.

पिंपळे जगताप ता. शिरुर येथील चौफुला येथे शिवदरबार पान शॉपचे चालक किसन नप्ते हे रात्रीच्या सुमारास त्यांच्या दुकानात असताना पिंपळे जगतापच्या माजी उपसरपंच रेश्मा कुसेकर यांचे पती नितीन कुसेकर, सचिन कुसेकर, रवींद्र जगताप हे एका कारमधून आले त्यांनी नप्ते यांच्याकडून चार पान घेतले त्यांनतर नप्ते यांनी पैसे मागितले असता त्यांनी कसले पैसे मागतो, आमची दहशत माहित नाही का, आमची गावात दहशत आहे, लोक आम्हाला हप्ता देतात तू पण दोन हजार रुपये हप्ता दे असे म्हटले असता नप्ते यांनी तुम्हाला का हप्ता देऊ असे म्हटले असता नितीन याने त्याच्या सहकाऱ्यांना याला दुकानातून बाहेर घेऊन हिसका दाखवा असे म्हणून बाहेर घेत चौघांनी लोखंडी गजाने बेदम मारहाण करत खुनाचा प्रयत्न करत जीवघेणा हल्ला केला, सदर घटनेत किसन शिवाजी नप्ते वय ४४ वर्षे रा. नप्ते वस्ती करंदी ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पिंपळे जगतापच्या माजी उपसरपंच रेश्मा कुसेकर यांचे पती नितीन उर्फ आण्णा राजेंद्र कुसेकर, सचिन राजेंद्र कुसेकर, रवींद्र उर्फ पांडा राजाराम जगताप यांसह एक अनोळखी युवक सर्व रा. पिंपळे जगताप ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.




# आरक्षण सरपंच पदाचे... मातब्बर लागले कामाला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** उरुळी कांचन प्रतिनिधी : नुकतीच हवेली तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणाची सोडत काढण्यात आली. काही ठिकाणी अपेक्षित आरक्षण न पडल्याने 'कहीं खुशी, कहीं गम' असे चित्र पाहावयास मिळत आहे.




हवेली तालुक्याचे तहसीलदार किरण सुरवसे, अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांच्या उपस्थितीत पुढील २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधी साठी ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडती द्वारे काढण्यात आले. यावेळी अनेक इच्छुक उपस्थित होते. यामध्ये अपेक्षित आरक्षण न बसल्यामुळे काही जणांच्या पदरी निराशा आली. तर मनासारखे आरक्षण आल्यामुळे अनेक इच्छुक कामाला लागले आहेत. आरक्षण सोडतीत लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, थेऊर, कुंजीरवाडी, आळंदी म्हातोबा आदी नेहमीच राजकीयदृष्ट्या चर्चेत राहणाऱ्या गावांमध्ये सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटातील महिलेला लाभले. तर उरुळी कांचन गावाच्या सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटातील पुरुषाला मिळाले आहे, त्यामुळे अनेकांनी यासाठी दावेदारी सुरू केली आहे.

यावेळी उपस्थित नागरिकांनी आपापल्या गावातील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षणाबाबत तोंडी आक्षेप तहसीलदारांकडे नोंदवले. सर्वांचे आक्षेप ऐकून घेतले नंतर ते म्हणाले की निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन व निर्देशानुसार ही आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. याबाबतीत कुणालाही काही आक्षेप असतील तर त्यांनी माझ्याकडे किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी नोंदवावे. प्रत्येक आक्षेपाचे कायदेशीर निराकरण करण्यात येईल.

सरपंच पदाची निवड थेट जनतेतून होणार असल्याने व मतदारराजाचे मतांचे दान आपल्याच पदरात पडावे म्हणून त्याला खुश करण्यासाठी सरपंच पदाचे इच्छुकांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागणार आहे. त्याची जुळवाजुळव करण्यासाठी अनेक जण आजपासूनच कामाला लागले आहेत तर नको तो खर्च असा विचार करून काही जणांनी आताच माघार घेतली आहे. या कारणांमुळे सोडतीचे वेळी तालुक्याच्या ग्रामीण भागातून येणाऱ्या विविध राजकीय नेते मंडळीची उपस्थिती फारच कमी होती. अंदाजे दोनशे नागरिक यावेळी उपस्थित होते.

### आरक्षण सोडतीनंतर निश्चित झालेले सरपंच पदाचे आरक्षण

- **सर्वसाधारण पुरुष** - वडगांव शिंदे, फुलगाव, बहुली, अहिरे, मालखेड, खानापुर, डोणजे, गोऱ्हे खुर्द, सोनापुर, बकोरी, बिवरी, शिरसवडी, तुळापुर, पिंपरी सांडस, पेरणे, वाडेबोल्हाई, लोणीकंद, अष्टापुर, न्हावी-सांडस, उरुळीकांचन
- **सर्वसाधारण महिला** - लोणी काळभोर, थेऊर, कदमवाकवस्ती कल्याण, मांजरी खुर्द, खडकवाडी, मांडवी बुद्रुक, आर्वी, गाऊडदरा, खेड शिवापूर, श्रीरामनगर, घेरासिंहगड, आव्हाळवाडी, आळंदी म्हातोबाची, कुंजीरवाडी, , कोलवडी साष्टे, भवरापुर, हिंगणगांव, सांगवी सांडस व नायगाव.
- **नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष** - निरगुडी, मांडवी खुर्द, कुडजे, गोगलवाडी, कोंढणपुर, डोंगरगाव, खामगाव टेक, सोरतापवाडी, गोऱ्हे बुद्रुक.
- **नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला** - वडकी, जांभळी, आंबी, पेठ, प्रयागधाम, सागरुण, मणेरवाडी, शिवापूर, वढु खुर्द, कोरेगाव मुळ.
- **अनुसूचित जाती पुरुष** - खामगाव मावळ, भावडी, बुर्केगाव, शिंदवणे, तरडे
- **अनुसूचित जाती महिला** - आगळंबे, वळती, रहाटवडे, केसनंद, टिळेकरवाडी.
- **अनुसूचित जमाती पुरुष** - शिंदेवाडी
- **अनुसूचित जमाती महिला** - वरदाडे

## पाकिस्तानचा ध्वज जाळत नागरिकांनी केले उग्र निदर्शन!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात २६ निरपराध भारतीय पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार करत मारल्याच्या निषेधार्थ पाकिस्तानचा ध्वज जाळत नागरिकांनी केले उग्र निदर्शन! ध्वज जाळताना पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या.

आज सकाळी ११ च्या सुमारास उरुळी कांचन येथील राम मंदिर परिसरात हे नागरिक व सर्व पक्षीय / दलीय कार्यकर्ते एकत्र आले आणि त्यांनी उरुळी कांचनच्या वतीने पहलगाम येथील दहशतवादी कृत्याचा निषेध करत, पाकिस्तानचा ध्वज जाळला , या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याने त्याचा निषेध करत, मोठ्या आवाजात पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा दिल्या, या भ्याड कृत्याची केंद्र सरकारने गांभीर्याने दाखल घेउन पाकिस्तानी दहशतवादाचा समूळ नायनाट करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाय योजना तातडीने कराव्यात अशी मागणी केली.

याप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य काळूराम मेमाणे,माजी सरपंच दत्तात्रय शा.कांचन, भाऊसाहेब ल. कांचन, राजेंद्र ब.कांचन, माजी उपसरपंच सुनील कांचन, सागर कांचन, सदस्य मयूर कांचन, सामाजिक कार्यकर्ते शरद खेडेकर, श्रीकृष्ण बेदरे, महादेव न.कांचन, दत्ता इनामदार, मोहन कांचन, काळूराम बगाडे, रोशन वनारसे, अनिल कांचन, प्रसाद कांचन, कैलास कांचन, सचिन ननावरे, संतोष कांचन, कमलाकर अहिनवे, शंकर पाटील, गणेश ह. कांचन, गणेश उ. कांचन, सचिन राठोड आदी उपस्थित होते.

## वडगावपीर येथील पाटीलमळा येथे ओढे-नाले खोलीकरणाला सुरवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** वडगावपीर ( ता.आंबेगाव ) येथील पाटीलमळा येथे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील व माजी खासदार आणि पुणे गृहनिर्माण (म्हाडा ) चे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या संकल्पनेतून वडगावपीर येथे पाटीलमळा व इतर ठिकाणी टाटा मोटर्स व नाम फाउंडेशनच्या माध्यमातून गावांतील ओढे-नाले खोलीकरण करणे या कामाला धूमधडाक्यात सुरुवात झाली.यावेळी उद्योजक शिवाजी आदक,युवा नेते अक्षय वाळुंज,सहादू आदक,दत्ता सांडभोर,बाबा आदक,ॲड.अवधूत राजगुडे,भिमाजी रोकडे, चंद्रकांत पोखरकर,रामदास आदक,विश्वास आदक पाटील, नरहरी आदक,दत्ता आदक,दिगबर आदक,गोरक्ष पोखरकर, पंचक्रोशीतील ग्रामस्थ,ग्रामपंचायत सदस्य तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. ओढे-नाले यांचे खोलीकरण व रुंदीकरण झाल्याने पावसाचे पाणी त्यामध्ये साठवून त्यांचा फायदा शेतीला होईल असे नाम फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले.




# चाकणकर मैदानात; फास्ट ट्रॅक खटला चालणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** मांजरेवाडी (ता खेड ) येथे १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर एका नराधमाने लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पीडित कुटुंबाची शुक्रवारी (दि २५)सांत्वन भेट घेऊन हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा होईल यासाठी आयोग पाठपुरावा करेल असे असे आश्वासन दिले. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी मांजरेवाडी येथे पीडित कुटुंबियांची भेट घेतली. या घटनेचा लवकरात लवकर तपास पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी पोलिसांना दिल्या. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालावा यासाठी मी लक्ष घालणार असून आरोपीला फाशीची शिक्षा देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे चाकणकर यांनी सांगितले. तसेच पीडित कुटुंबाला मुख्यमंत्री आर्थिक सहायता निधीतून व मनोधैर्य योजनेतुन मदत दिली जाणार असल्याचेही चाकणकर यांनी जाहीर केले. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुरेखाताई मोहिते पाटील, रोहिणीताई राक्षे, वंदना सातपुते, कविता आल्हाट,रूपाली पानसरे,ॲड मनिषा टाकळकर, हेमा रिठे, माजी सरपंच भगवान मांजरे, जयसिंग मांजरे, सरपंच अनिता मांजरे, कांचन मांजरे, विलास मांजरे,गणेश मांजरे माजी उपसरपंच मयुरी मांजरे यांच्यासह महिला व ग्रामस्थ उपस्थित होते. - चौकट - आरोपी हा नराधम गावामधीलच होता.



### आरोपीला फाशी होण्यासाठी पाठपुरावा करणार

त्याला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी गावातील महिलांनी निवेदन देऊन अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यासमोर भुमिका मांडली. पिडित कुटुंबीय या घटनेतून अजून सावरले नसून आरोपीचे नातेवाईक गावात दहशत निर्माण करित आहे. पोलिसांनी त्यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा आम्हाला कायदा हातात घ्यावा लागेल.असे चाकणकर यांच्या समोरच महिलांनी ठणकावून सांगितले. चाकणकर यांनी पोलिसांना लगेचच सूचना देऊन धडक कारवाई करावी, असे सांगितले.
- फोटो - मांजरेवाडी येथे महिला आयोग अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पीडित कुटुंबाची भेट घेतली.

# २०३४ पर्यंत फडणवीसच मुख्यमंत्री

## चंद्रशेखर बावनकुळेंचे भाकीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंद्रपुर :** महायुतीचे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री पदावरून झालेले नाट्य उभ्या महाराष्ट्राने पाहिले. एकनाथ शिंदे अचानक गावी गेले. तिथून ठाण्यात आले. त्यानंतर दिल्लीतील बडे नेते आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांची चर्चा झाली. यापूर्वी मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांनी नंतर उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. महायुतीत पालकमंत्री पदावरून टोकाचे वाद दिसले. पण बडे नेते याविषयीची कोणतीही कटुता सार्वजनिकपणे न मांडण्याची प्रथा मोडत नाहीत हे विशेष. सध्या महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे भाकीत केले आहे. त्यावरून सध्या राज्यात चर्चेला उधाण आले आहे.

२०३४ पर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री असतील असे वक्तव्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. त्याला एकनाथ शिंदे यांच्या एका कृतीची किनार आहे. पहेलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जातीने तिथे हजर राहिले. त्यांनी तिथे जाऊन महाराष्ट्रातील पर्यटकांना दिलासाच दिला नाही. तर त्यांची महाराष्ट्रात परतण्याची व्यवस्था केली. जखमींची भेट घेतली. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री गिरीश महाजन यांना मदतासाठी पाठवले होते. पण ही श्रेयवादाची लढाई असल्याचे बोलले जात होते.



### कोणी जोडले हात तर कोणाचे चिमटे

● चंद्रशेखर बावनकुळे यांच्या या वक्तव्याची एकच चर्चा होत आहे. भाजपाच्या नेतृत्वातच आता यापुढे सरकार चालणार असा त्यामागे हेतू असल्याची चर्चा होत आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माध्यमांनी याविषयी विचारले असता, त्यांनी हात जोडत नमस्कार केला आणि शुभेच्छा अशा एका शब्दात प्रतिक्रिया दिली. तर शिवसेना नेते रामदास कदम यांनी यावर धडक प्रतिक्रिया दिली. २०३४ कशाला ते २०८० पर्यंत मुख्यमंत्री राहू द्या, असा चिमटा त्यांनी काढला. पण त्याचवेळी आमच्यात कोणी भांडणं लावण्याचा प्रयत्न करत असेल तर तो यशस्वी होणार नाही, असे सांगायला ते विसरले नाहीत.

“ विकसीत महाराष्ट्र हा फडणवीस यांचा संकल्प आहे. फडणवीस मुख्यमंत्री असल्याशिवाय विकसित महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण होऊ शकत नाही. फडणवीस यांच्या नेतृत्वातच आपल्याला पुढे जायचे आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांचे डबल इंजिन सरकारच राज्याचा विकास, भले करू शकतात,
- चंद्रशेखर बावनकुळे



## स्पर्धेत पहिला नंबर आल्याच्या रागामुळे फ्री स्टाईल हाणामारी

**नाशिक :** कबड्डी स्पर्धेत एक नंबर आल्याने त्याचा राग मनात धरत विद्यार्थिनींची फ्री स्टाईल हाणामारी. काल दुपारच्या सुमारास पवननगर येथील एका विद्यालयातील विद्यार्थिनींनी मिळून एका विद्यार्थिनीला मारहाण केल्याचा प्रकार घडलाय. या विद्यार्थिनींची फ्री स्टाईल हाणामारी बघण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. तीन ते चार दिवसांपूर्वी पवन नगर येथील विद्यालयात कबड्डी स्पर्धा ठेवण्यात आली होती. त्यामध्ये एक विद्यार्थिनी स्पर्धा जिंकल्याने त्याचा राग मनात ठेवून दुसऱ्या गटातील विद्यार्थिनींनी पेपर सुटल्यावर त्याचा राग काढला. हा संपूर्ण प्रकार मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद झाला. विद्यालयातील शिक्षकांना ही बाब समजताच त्यांनी पालकांना बोलून विद्यार्थिनींना समज दिली.




## ३५ तासांच्या ब्लॉकमुळे १६३ ट्रेन रद्द

**मुंबई :** मुंबईकरांसाठी आगामी दोन-तीन दिवस अडचणीचे ठरणार आहे. मुंबईतील लोकल सेवा मेगाब्लॉकमुळे विस्कळीत होणार आहे. लोकल ट्रेनच्या अनेक फेऱ्या रद्द केल्या आहे. मध्य रेल्वे मार्गावर २७ एप्रिल रोजी तर पश्चिम रेल्वेचा २६ ते २८ एप्रिल दरम्यान मेगा ब्लॉक असणार आहे. पश्चिम रेल्वेने १६३ लोकल फेऱ्या रद्द केल्या आहे.मध्य रेल्वेच्या विद्याविहार ते ठाणे दरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गावर तसेच हार्बर मार्गावरही उद्या मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी उपनगरीय विभागांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत हार्बर मार्गावरील प्रवाशांना सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मुख्य मार्ग आणि पश्चिम रेल्वेने प्रवास करण्याची परवानगी आहे. मुख्य मार्गावर विद्याविहार आणि ठाणे दरम्यान ५व्या, ६व्या मार्गावर सकाळी ८ वाजल्यापासून ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉक कालावधीत डाऊन मेल / एक्स्प्रेस विद्याविहार स्थानकात येथे डाऊन जलद मार्गावर वळविल्या जातील आणि ठाणे स्थानकात पाचव्या मार्गावर पुन्हा वळवल्या जातील. अप मेल-एक्स्प्रेस ठाणे स्थानकात अप जलदमार्गावर वळविल्या जातील. तसेच विद्याविहारजवळ सहाव्या मार्गावर पुन्हा वळविल्या जातील.

## थेट 'एसपीं'नाच शिवीगाळ; पोलिस निरीक्षक बडतर्फ

**बीड :** रणजीत कासलेनंतर आता बीडच्या सायबर विभागातील आणखी एका पोलीस अधिकाऱ्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आलं आहे. बीड पोलीस अधीक्षक ते पोलीस खात्यातील वरिष्ठांसह बीडचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे, वाल्मिक कराडवर आरोप केल्याप्रकरणी बीडच्या सायबर विभागातील पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासलेला आधीच खाकी वर्दी कायमची गमवावी लागली. आणि आता त्याच सायबर विभागातील पोलीस निरीक्षकालाही सेवेतून बडतर्फ करण्यात आलं आहे. सुनील नागरगोजे असे बडतर्फ केलेल्या या पोलीस निरीक्षकाचे नाव आहे. नागरगोजे हे सध्या नियंत्रण कक्षात कार्यरत होते. बीडमधील सायबर विभागाच्या पोलीस निरीक्षकपदी कार्यरत असताना सुनील नागरगोजे यांनी बीडचे तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना शिवीगाळ केली होती. तसेच बीड येथे नियुक्त असताना एका कार्यालयीन कर्मचाऱ्यालाही धमकी दिली होती. शिवाय, सातत्याने बराच काळ ते पोस्टिंगनंतर कर्तव्यावर म्हणजे ऑनड्युटी येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या गैरवर्तणुकीचा अहवाल नंदकुमार ठाकूर यांनी वरिष्ठांना पाठवला होता. त्यामुळे तत्कालीन पोलीस अधीक्षकांना शिवीगाळ करणे, कर्मचाऱ्यांना धमकावणे यावरुन पोलीस महासंचालक कार्यालयाने सुनावणी घेतल्यानंतर सुनील नागरगोजे यांना सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय घेतला आहे.

## पुण्यात हुल्लडबाजांकडून एअरगनने गोळीबार



**पुणे :** पुण्यात हुल्लडबाजांकडून मनोरंजनासाठी एअरगनने गोळीबार केला आहे. पुण्यातील कोंढवा परिसरात ही घटना घडली आहे. या घटनेमुळे साळुंखे विहार परिसरात एका इमारतीच्या घराच्या २ काचा फुटल्या आहे.

# दिल्लीपर्यंतचे १५ हजारांचे तिकिट दर ६५ हजारांवर..

एकीकडे जम्मू-काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात २७ पर्यटकांनी आपला जीव गमावला असून देश दुःखात बुडाला आहे. त्याचवेळी दुसरीकडे देशातील विमान कंपन्यांनी या हल्ल्यामध्ये लालचीपणाची संधी शोधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे. श्रीनगर ते नवी दिल्ली या मार्गावरील नेहमीचं विमान तिकीट हे १२ ते १५ हजार इतकं असतं. मात्र हल्ल्यानंतर पर्यटकांची वाढती संख्या पाहता विमान कंपन्यांनी तिकीट दर तब्बल ६५ हजारांपर्यंत नेऊन ठेवलं आहे. यावरुन देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे.

१) श्रीनगर ते दिल्ली एक मार्गी विमान तिकिटाची किंमत ६५,००० रुपयांपर्यंत गेली होती.

२) सामान्य दिवसांमध्ये त्याच तिकिटांची किंमत ही १२,००० ते १५,००० रुपयांदरम्यान होती.




अचानक झालेल्या या तिकीच दर वाढीमुळे सोशल मीडियावर लोक संतापले. 'देश संकटात असताना नफा कमावण्याचा' आरोप केला. 'श्रीनगर-दिल्ली फ्लाइटचे भाडे नेहमीपेक्षा ४ ते ६ पटीने जास्त आहे. हा संकटाचा काळ आहे आणि अशा परिस्थितीत खासगी क्षेत्रात खुलेआम लूट सुरू आहे. - प्रवाशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आधीच संकटात सापडलेल्या पर्यटकांसमोर विमान कंपन्यांनी त्यांची लालचीपणाची हद्द केली आहे, प्रवाशांपुढे आणखी एक संकट उभं केलं. श्रीनगरहून दिल्लीला जाणाऱ्या विमानाच्या तिकिटात चौपट ते पाचपट वाढ करत फायदा कमावण्याचा प्रयत्न केला आहे. पहलगाममध्ये २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर श्रीनगर ते दिल्ली आणि इतर शहरांच्या विमान तिकिटांच्या किमतीत अचानक वाढ झाली होती. २६ पर्यटकांचा बळी घेणाऱ्या हल्ल्यानंतर, संकटातून बाहेर पडण्यासाठी गर्दी झाली होती. त्याचा फायदा घेऊन विमान कंपन्यांनी तिकीट दरात अनेक पट वाढ केली होती.

## एकीकडे ऑरेंज अलर्ट, दुसरीकडे गारपीटचा अंदाज



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुबई :** महाराष्ट्रातील वातावरणात मोठे बदल होणार आहे. राज्यात उष्णतेचा अलर्ट दिला आहे. त्याचवेळी काही भागांत गारपीट आणि पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे एकीकडे उन्हाचा तडाखा अनुभवताना पावसाचे संकटही राज्यावर असणार आहे. मुंबईतील तापमानात वाढ होत आहे. तसेच मुंबईतील काही भागांमध्ये हलक्या सरी कोसळण्याच्या अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

राज्यात सध्या सर्वत्र उन्हाचा तडाखा आहे. अनेक ठिकाणी तापमान ४० अंशाच्या वर आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तापमान ४२ अंशावर पोहचले आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना २७ एप्रिलला उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील इतर काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी दिला आहे. भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांना २८ एप्रिलला ऑरेंज अलर्ट दिला आहे.

### नागपूर @४४

● नागपुरात गेल्या चार दिवसांपासून पारा ४४ अंशावर आहे. वातावरणातील कोरडेपणामुळे उन्हाची तीव्रता अधिक आहे. २६ ते २९ एप्रिल दरम्यान ढगाळ वातावरणामुळे नागपुरातील तापमानात एक किंवा दोन अंशाची घसरण होण्याची शक्यता आहे. विदर्भातील चंद्रपुरात ४५.४ आणि अकोल्यात ४५.१ अंश सेल्सियस कमाल तापमान नोंदविण्यात आले.

### विदर्भात गारपीट होण्याचा अंदाज

● राज्याच्या बहुतांश भागांमध्ये उष्ण व दमट हवामान राहील. तसेच पाऊस पडण्याचीही शक्यता आहे. लातूर, धाराशिव, सोलापूर आणि नांदेड या भागामध्ये पावसाची शक्यता जास्त आहे. यामध्ये मुंबई शहर आणि उपनगर या ठिकाणी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. विदर्भात २७ आणि २८ एप्रिलला गारपीट होईल, असा अंदाज हवामान विभागाचा आहे. राज्याच्या इतरही जिल्ह्यांमध्ये पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# पुष्पगुच्छ आणणाऱ्या कार्यकर्त्यांना अजित पवार यांनी दटावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** जागतिक पुस्तक दिनाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ‘ग्रंथ प्रेम’ उजागर झाले असून नांदेड विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी पुष्पगुच्छ घेऊन गेलेल्या पक्ष कार्यकर्त्यांना दटावत पुस्तक देण्याचा सल्ला त्यांनी दिला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मात्र पुस्तक देऊन उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत केले.

परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील नियोजित कार्यक्रमांना जाण्यासाठी पवार शनिवारी सकाळी विशेष विमानाने नांदेडला आले. विमानतळावर प्रमुख अधिकारी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आ.विक्रम काळे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते हजर होते.

विमानातून उतरल्यानंतर पवार यांनी विमानतळ इमारतीत प्रवेश केला. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी उपमुख्यमंत्र्यांना ‘छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथ’ भेट देऊन त्यांचे स्वागत केले; पण आजी-माजी आमदारांसह पक्ष पदाधिकाऱ्यांनी स्वागतासाठी पुष्पगुच्छ आणल्याचे पाहून पवार यांनी साऱ्यांनाच फटकारले. यापुढे हे पुष्पगुच्छ आणणे बंद करा, त्याऐवजी पुस्तकं देऊन स्वागत करण्याचा सल्ला त्यांनी सर्वांनाच दिला.



# बाप्पा घडविणाऱ्या हातांचेच एकमेकांशी 'दोन हात'




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पर्यावरणपूरक सण साजरा करण्यासाठी मुंबई महापालिकेने बोलवलेल्या मूर्तिकारांची बैठकीत हाणामारी झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. बैठकीत पाण्याच्या बाटल्या, खुर्च्या एकमेकांवर फेकण्यात आल्यानंतर हा वाद अधिकच चिघळला. पीओपी मूर्तींच्याविरोधात भूमिका घेणाऱ्या कार्यकर्त्याला बैठकीनंतर रस्त्यावर मारहाण करण्यात आली. याप्रकरणी शाडू मूर्तींसाठी लढा देणारे वसंत राजे या मारहाणीत जखमी झाले असून याप्रकरणी त्यांनी भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने पीओपी (प्लास्टर ऑफ पॅरिस) मूर्तींवर बंदी घालण्याचे आदेश दिल्यानंतर मुंबई महापालिका आणि पोलिसांनी यंदाच्या माघी गणेशोत्सवात त्याची अंमलबजावणी केली. ही बंदी येत्या ऑगस्ट-सप्टेंबरमधील गणेशोत्सवातही लागू राहणार असून त्यानुसार आतापासूनच मुंबई महापालिकेने कंबर कसली आहे.

**बैठकीत हाणामारी :** गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासनाने मूर्तिकारांची बैठक बोलवली होती. परळ येथील पालिकेच्या एफ दक्षिण कार्यालयात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत केवळ मुंबईतील शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकारणारे मूर्तिकार आणि पीओपी मूर्तींचे निर्माते यांना बोलावण्यात आले होते. मात्र या बैठकीत हाणामारी झाली.

### याचिकांवर ५ मे रोजी अंतिम सुनावणी-

● तुम्ही पीओपी मूर्तींचा पर्यायच ठेवला नाही तर लोक शाडूच्या मातीच्याच मूर्ती विकत घेतील. त्यामुळे उच्च न्यायालयातील सुनावणीत काय होते, याची प्रतीक्षा न करता तुम्ही आताच पीओपीला असलेल्या पर्यायांचा अवलंब करायला हवा. दूरदर्शी व जबाबदार नागरिक म्हणून तुम्ही हे करायला हवे. कारण ते भावी पिढ्यांसाठीही चांगले ठरेल, असा सल्लाही मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारच्या सुनावणीत पीओपी समर्थक याचिकाकर्त्या मूर्तिकारांना दिला. तसेच याप्रश्नी सर्व याचिकांवर ५ मे रोजी एकत्रित अंतिम सुनावणी घेण्याचे संकेतही न्यायालयाने दिले.

rashtrasanchar.com

SPORTS

RASHTRA SANCHAR/ PUNE/ Marathi/ RNI Reg. No. MAHMAR/2023/89220

रविवार, २७ एप्रिल २०२५

राष्ट्रसंचार

BREAKING NEWS AND MORE www.rashtrasanchar.com @rashtrasanchar







# चेन्नईचे धुरंधर चेपॉकवर पुन्हा ढेपाळले

## हैदराबादच्या गोलंदाजांनी काव्या मारनच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चेन्नई :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्स फलंदाजीत सुरुवातीपासूनच संघर्ष करताना दिसले आहे. त्यांच्या संघाकडून आक्रमक खेळ अद्यापही पाहायला मिळालेला नाही. हीच गोष्ट शुक्रवारी (२५ एप्रिल) सनरायझर्स हैदराबाद विरूद्धच्या सामन्यातही दिसली. चेपॉकवर होत असलेल्या या सामन्यात चेन्नईचा संघ २० षटके पूर्ण होण्यापूर्वीच सर्वबाद झाला. चेन्नईने हैदराबादसमोर विजयासाठी १५५ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. हा सामना स्पर्धेतील आव्हान राखण्यासाठी दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा आहे. दरम्यान, या सामन्याच्या पहिल्या डावात तरी हैदराबादच्या गोलंदाजांनी वर्चस्व ठेवल्याचे दिसले, त्यामुळे संघमालकीण काव्या मारन खूश दिसत होती.

या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्स प्रथम फलंदाजीला उतरले. त्यांच्याकडून सलामीला फलंदाजीसाठी युवा खेळाडू शेख राशीद आणि आयुष म्हात्रे फलंदाजीला आले.

मात्र डावाच्या पहिल्याच चेंडूवर मोहम्मद शमीने २० वर्षीय राशीदला चकवले. त्याचा झेल स्लीपमध्ये अभिषेक शर्माने पकडला. पण नंतर सॅम करन आयुष म्हात्रेला चांगली साथ देत होता. आयुषने त्याचा आक्रमक पवित्रा कायम ठेवला होता.

मात्र ५ व्या षटकात सॅम करनला ९ धावांवर हर्षल पटेलने अनिकेत वर्माच्या हातून झेलबाद केले. पुढच्याच षटकात आयुषचा अडथळा हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने दूर केला. त्याने आयुषला इशान किशनकडे झेल देण्यास भाग पाडले. आयुषने १९ चेंडूत ६ चौकारांसह ३० धावा केल्या.

नंतर रवींद्र जडेजा आणि डेवाल्ड ब्रेव्हिस डाव सांभाळत होते. ब्रेव्हिस सुरुवातीला संयमी खेळ करत होता. त्यांची भागीदारी रंगतेय असं वाटत असतानाच जडेजाला कामिंडू मेंडिसने १० व्या षटकात अफलातून चेंडू टाकून २१ धावांवर त्रिफळाचीत केले.

नंतर शिवम दुबे ब्रेविसची साथ देण्यासाठी आला होता. यावेळी ब्रेव्हिसनेही टॉप गिअर टाकला आणि मेंडिसने गोलंदाजी केलेल्या १२ व्या षटकात तीन षटकार ठोकत धावगती वाढवली. परंतु मेंडिसनेच पुढच्या षटकात त्याचा हर्षल पटेलच्या गोलंदाजीवर अफलातून झेल घेतला.

त्यामुळे ब्रेव्हिसला २५ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ४२ धावांवर माघारी परतावे लागले. दुबेही फार काहीकरू शकला नाही. तो १२ धावांवर बाद झाला. नंतर फलंदाजीला आलेले एमएस धोनी (६), अंशुल कंबोज (२) आणि नूर अहमदही (२) स्वस्तात बाद झाले. अखेप दीपक हुडा आणि खलील अहमद यांनी चेन्नईला १५० धावांच्या पार पोहचवले. मात्र शेवटच्या षटकाच्या ५ व्या चेंडूवर दीपक हुडा बाद झाला.

# आयसीसी स्पर्धांमध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध खेळू नये




**नवी दिल्ली :** बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली म्हणाले की, भारताने आयसीसी आणि आशियाई चॅम्पियनशिपमध्येही पाकिस्तानविरुद्ध खेळू नये. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचे नाव समोर आल्यानंतर त्यांनी हे म्हटले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. एजन्सीशी बोलताना गांगुली म्हणाले की, टीम इंडियाने कठोर कारवाई करावी आणि आयसीसीच्या स्पर्धांमध्येही पाकिस्तानविरुद्ध खेळू नये. खरं तर, २०१३ पासून, बिघडत्या राजकीय संबंधांमुळे, दोन्ही देशांमधील द्विपक्षीय मालिका थांबल्या. भारत फक्त आयसीसी स्पर्धांमध्ये किंवा आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत पाकिस्तानशी खेळतो. पाकिस्तानने शेवटचा २०१२-१३ मध्ये द्विपक्षीय मालिकेसाठी भारताचा दौरा केला होता. त्या दौऱ्यात ३ एकदिवसीय आणि २ टी२० सामन्यांची द्विपक्षीय मालिका खेळवण्यात आली. पाकिस्तानने एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली, तर टी-२० मालिका १-१ ने बरोबरीत राहिली. टीम इंडियाने शेवटचा पाकिस्तान दौरा २००८ मध्ये केला होता. भारतीय संघाने ती ३ कसोटी सामन्यांची मालिका १-० ने जिंकली. या मालिकेतील २ सामने अनिर्णित राहिले. या वर्षी मार्चमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताने पाकिस्तानचा दौरा केला नव्हता. भारताने अंतिम सामन्यासह सर्व सामने दुबईमध्ये खेळले. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडला हरवून भारताने १२ वर्षांनी विजेतेपद पटकावले.

# अनुष्का-विराटने घेतला लंडनला स्थायिक होण्याचा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतातील सगळ्यात लोकप्रिय सेलिब्रिटी जोडी म्हणजे विराट कोहली आणि अनुष्का शर्मा. बॉलिवूड आणि क्रिकेटविश्वातील चाहत्यांना आवडणारी ही जबरदस्त जोडीची लोकप्रियता अफाट आहे. काही काळापूर्वी या जोडीने कायमचा लंडनला शिफ्ट होण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. याबद्दल त्यांनी अधिकृत वक्तव्य केलं नसलं तरीही नुकतंच एका दिग्गज व्यक्तीने त्यांच्या या निर्णयावर महत्त्वपूर्ण खुलासा केला.

ही व्यक्ती आहे अभिनेत्री माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेने. श्रीराम यांनी नुकतीच रणवीर अलाहबादियाची त्यांच्या पॉडकास्ट चॅनेलवर मुलाखत घेतली. यावेळी त्यांनी विराट कोहलीवर चर्चा केली. त्यावेळी श्रीराम यांनी ते दोघंही कायमचे लंडनला का स्थायिक झाले यावर खुलासा केला.

काही काळापूर्वी श्रीराम यांची अनुष्काशी भेट झाली होती. त्याचा अनुभव त्यांनी यावेळी शेअर केला. ते म्हणाले,"ती खूप मजेदार आहे. त्यावेळी ते दोघं लंडनला जाणार होते कारण त्यांना इथे मजा करता यायची नाही. यासाठी आम्ही त्यांचं कौतुक करतो. ते दोघं जे काही करतात त्यामुळे लोकांचं लक्ष त्यांच्याकडे जातं तर आमच्याकडे कुणीच पाहत नाही. " "अनुष्का आणि विराट लंडनला गेले कारण त्यांना त्यांच्या मुलांना या ग्लॅमरपासून दूर वाढवायचं आहे. ते सगळ्यांसोबत मिसळतात, ते बिनधास्त आहेत पण इथे त्यांना ते करताना अडचण येते. कारण इकडे लगेच ती सेल्फी मुमेंट बनते.

# चॅम्प्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत २२ यार्डस क्रिकेट अकादमी संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक 16 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत आरव सिद(2-18 व 16) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर 22यार्डस क्रिकेट अकादमी संघाने पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाचा 5 गडी राखून पराभव करत विजेतेपद संपादन केले.

व्हिजन क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत 22यार्डस क्रिकेट अकादमीच्या रिशांत निंबोळकर 3-37, श्रीकृष्ण मराठे 2-19, आरव सिद 2-18, संकल्प शेडगे 2-25)यांनी केलेल्या अचूक गोलंदाजीपुढे पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाचा डाव 36.2षटकात सर्व बाद 129धावावर संपुष्टात आला. यात यश कुंटे 65, हर्ष नलावडे 10, अधिराज कंधारे 10 यांनी धावा केल्या.

हे आव्हान 22यार्डस क्रिकेट अकादमी संघाने 25.3षटकात 5बाद 135धावा करून पूर्ण केले. यात ओम पवार नाबाद 28, यशराज सोळंकी 23, रीवान रजत 16, आरव सिद 16, अब्रिश पाठक 15 यांनी छोटी पण महत्वपूर्ण खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण अमित कुस्ते आणि स्पर्धा संचालक गोविंद पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

# केकेआरच्या फलंदाजांची फौज फक्त कागदावर



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीग २०२५ च्या प्ले ऑफची शर्यत आता रंगतदार बनली आहे. गुजरात टायटन्स, दिल्ली कॅपिटल्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे संघ प्रत्येकी १२ गुणांसह आघाडीवर आहेत, परंतु तरीही त्यांचे प्ले ऑफचे स्थान पक्के नाही. आज पंजाब किंग्स विरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स यांच्यात लढत होणार आहे. पंजाब १० गुणांसह पाचव्या क्रमांकावर आहे, तर केकेआर ६ गुणांसह सातवा आहे. त्यामुळे आजचा सामना कोलकातासाठी महत्त्वाचा आहे. पण, या सामन्यापूर्वी भारताचा व आरसीबी चा माजी खेळाडू आर पी सिंग याने कोलकाताला ट्रोल केले आहे. जिओ स्टारच्या रिवेंज विकच्या निमित्ताने आर पी सिंग याच्यासोबत गप्पा मारल्या गेल्या. आर पी हा जिओस्टारवर एक्स्पर्ट व समालोचक आहे. तो म्हणाला, पंजाब किंग्स विरुद्ध कोलकाता नाइट रायडर्समधील आजचा सामना महत्त्वाचा आहे. कारण, उभय संघांमधील मागील लढतीत पंजाबने कमी धावांचा यशस्वी बचाव केला होता. त्यांच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली होती. आता पंजाबचा संघ कोलकातात आलाय आणि माजी कर्णधार श्रेयस अय्यर त्यांच्याविरोधात उभा राहणार आहे. त्यामुळे या सामन्यात कट्टर ठसन पाहायला मिळेल. आर पी सिंग पुढे म्हणाला, कोलकाता एवढी चांगली कामगिरी का करत नाही, हा कळीचा मुद्दा आहे. त्यांच्याकडे ९व्या क्रमावर फलंदाजी करू शकतील असे फलंदाज आहे. कागदावर हे दिसत असले तरी त्यांचे टॉप ऑर्डर अपयशी ठरले आहेत. त्यांना फलंदाजीचा योग्य क्रम लावता येत नाहीए. आंद्रे रसेल व रिंकू सिंग यांचा फॉर्म या आयपीएलमध्ये चांगला राहिलेला नाही. कोलकाताच्या आघाडीच्या फलंदाजांनी चांगली कामगिरी करणे महत्त्वाचे आहे आणि ही त्यांची समस्या राहिलेली आहे.

# आंतरराष्ट्रीय ओपन ग्रँड मास्टर बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात सात खेळाडू संयुक्तरीत्या आघाडीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए) यांच्या वतीने तिसऱ्या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय ओपन ग्रँड मास्टर बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात नितीश बेलूरकर, पेट्रोस्यान मॅन्युएल, पँटसुलिया लेवान, दीपन चक्रवर्ती जे., नीलाश साहा, सावचेन्को बोरिस, सानिकिडझे टॉर्निके या खेळाडूंनी 5.5 गुणांसह संयुक्तरीत्या आघाडी प्राप्त केली आहे

अमनोरा हॉल येथील हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत सातव्या फेरीत अ गटात पहिल्या पटावर अर्मेनियाच्या पेट्रोस्यान मॅन्युएल याने आघाडीवर असलेल्या

गोव्याच्या नितीश बेलूरकरचा पराभव करून 5.5गुणांची कमाई केली. तर, दुसऱ्या पटावरील लढतीत जॉर्जियाच्या पँटसुलिया लेवानने मध्यप्रदेशाच्या आयुष शर्माचा तर, आरएसपीबी च्या दीपन चक्रवर्ती जे. याने पश्चिम बंगालच्या संदिपन चंदाचा पराभव करून 5.5गुण प्राप्त केले.

ब गटात गोपीनाथ पी, कुशाग्र पालीवाल, रवींद्र निकम, धूत विनित, अक्षज पाटील, दुर्वा बोंबले यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजयी सलामी दिली.

# आम्ही ऑक्शनमध्ये 'माती' खाल्ली!; फ्लेमिंगने मान्य केली चूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्सला इंडियन प्रीमिअर लीग २०२५ मध्ये घरच्या मैदानावर आणखी एक पराभव पत्करावा लागला. सनरायझर्स हैदराबादने करो वा मरो लढतीत बाजी मारून चेन्नई चे प्ले ऑफचे स्वप्न जवळपास संपुष्टात आणले आहे. चेपॉकवरील हा चेन्नईचा सलग चौथा पराभव ठरला. यापूर्वी २००८च्या आयपीएलचे शेवटचे दोन आणि २०१०च्या पर्वाचे सुरुवातीचे दोन असे घरच्या मैदानावरील सलग चार सामने CSK ने गमावले होते. चेन्नईला यंदाच्या पर्वात ९ सामन्यांत २ विजय मिळवता आले आहेत आणि उर्वरित ५ सामने जिंकून ते फक्त १४ गुणांपर्यंतच पोहोचू शकतील. अशात त्यांचे प्ले ऑफचे स्वप्न संपल्यात जमाच म्हणावे लागेल.

संघ खूप तणावात होता, ज्यामुळे गोलंदाजांवर दबाव आला आणि गडी बाद झाले, हे सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या लढतीवर बोलताना फ्लेमिंग म्हणाले. "हा सामना हंगामाचे सारांश सांगतो. मला वाटले की आज फलंदाजीत अधिक चांगला दृष्टिकोन होता, आणि हेच आम्ही शोधत होतो, की मुक्तपणे खेळावे. आम्ही तणावात होतो, त्यामुळे आम्ही गोलंदाजांवर दबाव टाकू शकलो नाही आणि गडीही गमावले," असे ते पुढे म्हणाले. "आम्हाला मिळणाऱ्या समर्थनाची जाणीव आहे आणि ती फक्त घरीच नाही, तर संपूर्ण भारतात पसरलेली आहे.

# पाकिस्तानची मलेशिया हॉकी फेडरेशनने केली कोंडी! पैसे भरा अन्यथा स्पर्धेला...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पाकिस्तान हॉकी संघ सध्या फार काही चांगली कामगिरी करत नाहीये. त्यातच आता पाकिस्तान हॉकी फेडरेशन मोठ्या संकटात सापडले आहेत. मलेशिया हॉकी फेडरेशनकडून त्यांची कोंडी करण्यात आली आहे. आगामी सुलतान अझलान शाह कप २०२५ स्पर्धेसाठी त्यांना आमंत्रित करण्यात आलेले नाही. त्यांचे आमंत्रण स्थगित करण्यात आले आहे. ही स्पर्धा यावर्षीच्या अखेरीस २२ ते २९ नोव्हेंबर दरम्यान मलेशियातील इफोह येथे खेळवली जाणार आहे.

पाकिस्तानला आमंत्रित न करण्यामागे थकबाकी कारण आहे. जोहर हॉकी असोसिएशना १०, ३४९ अमेरिकन डॉलर पाकिस्तानला द्यावे लागणार आहेत. ऑक्टोबर २०२३ मध्ये जोहर हॉकी कप झाला होता.

यावेळी मलेशिया दौऱ्यादरम्यान पाकिस्तान हॉकी फेडरेशनचे अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या निवास, प्रवास आणि अतिरिक्त खर्चाचे पैसे जोहर हॉकी फेडरेशनला पाकिस्तानकडून अद्याप मिळाले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार सुत्राने माहिती दिली आहे की 'संघाच्या रहाण्याची आणि इतर खर्चाची जबाबदारी आयोजकांनी घेतली होती. पण पाकिस्तान हॉकी फेडरेशनच्या अधिकाऱ्यांना आणि माजी अध्यक्षांना स्पष्टपणे सांगण्यात आले होते की त्यांचा खर्च त्यांनाच करावा लागेल. अधिकारी त्यावेळी संघ थांबलेल्याच महागड्या हॉटेलमध्ये थांबले होते.'

## 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत

# स्वानिका रॉय हिला दुहेरी मुकुटाची संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हॉटेल रवाईन यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए हॉटेल रवाईन अखिल भारतीय मानांकन राष्ट्रीय सिरीज 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या गटात स्वानिका रॉय हिने एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात अंतिम फेरीत प्रवेश करत दुहेरी मुकुटाकडे वाटचाल केली आहे.

पाचगणी येथील हॉटेल रवाईन टेनिस कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉ मध्ये एकेरीत उपांत्य फेरीत मुलांच्या गटात पाचव्या मानांकित पुण्याच्या आराध्य म्हसदे याने आपला शहर सहकारी राघव सरोदेचा 7-5, 6-3 असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

मुलींच्या गटात अव्वल मानांकित पार्थसारथी मुंढे हिने सहाव्या मानांकित रिशीता पाटीलचा 6-2, 6-1 असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

दुसऱ्या मानांकित स्वानिका रॉयने अकराव्या मानांकित व्रण्डिका राजपूतचा 6-0, 6-3 असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

दुहेरीत उपांत्य फेरीत मुलींच्या गटात अव्वल मानांकित स्वनिका रॉयने पार्थसारथी मुंढेच्या साथीत श्रावी देवरे व प्रार्थना खेडेकर यांचा 6-0, 6-1 असा तर, तिसऱ्या मानांकित रिशिता पाटील व मेहा पाटील यांनी रिया रॉय व इंद्रक्षी भट्टाचार्य यांचा 6-4, 6-1 असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

#रा